
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं. 233



# सागरी किनारा
# काल, आज व उद्या

REFBK-0010197

लेखक
श्री. ना. ग. मुसळे

२

# रत्नागिरी जिल्हा

## काल, आज व उद्यां

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23060 वि: ...
क्रमांक ... नों: दि: 24/3/58

REFBK-0010197

: लेखक :
श्री. नारायण गणेश मुसळे

१०१९७

अभिनव प्रकाशन, मुंबई १२
किंमत सव्वा रुपया

स्थापना १९३३

फोन : ६१८७५ ग्रॅम्स : 'भाई'

भारत सरकारचे प्रमुख महाराष्ट्रीय कॉन्ट्रॅक्टर

# पालव ॲण्ड ब्रदर्स

## टेलर्स

卐

बॉम्बे पोर्ट ट्रस्ट, स्टेट ट्रॅन्सपोर्ट, बी. ई. एस. टी., **ग्रेटर बॉम्बे** आणि **बॉम्बे स्टेट पोलीस फोर्स** यांचे युनिफॉर्म क्लोदिंग कॉन्ट्रॅक्टर्स,

अम्ब्रेला मॅन्युफॅक्चरर्स ॲंड जनरल मर्चंट्स. सिस्टर

कन्सर्न—**पालव ॲंड कंपनी**, शिपओनर्स.

प्रोप्रायटर : **श्री. शिवराम तुकाराम पालव**

पालव सदन, भोईवाडा, परळ, मुंबई १२.

शाखा : राधाकृष्ण निवास, व्हिन्सेंट रोड, मुंबई १४.

2

# रत्नागिरी जिल्हा

## काल, आज व उद्यां

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23080 वि: 3.4
क्रमांक 233 नों: दि: 24/3/58

REFBK-0010197

REFBK-0010197

: लेखक :

श्री. नारायण गणेश मुसळे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०१९७

अभिनव प्रकाशन, मुंबई १२

किंमत सव्वा रुपया

( सर्वाधिकार लेखकाधीन )

प्रथमावृत्ति, फेब्रुवारी १९७८

प्रकाशक : वामन विष्णु भट **अभिनव प्रकाशन**, ७ अंबा सदन,
जेरबाई वाडिया रोड, परळ, मुंबई १२.

मुद्रक : पांडुरंग सिताराम गोडे, **नॅशनल प्रिंटिंग ब्युरो**,
३५२/५४ गिरगांव रोड, मुंबई २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23060 दि: 26-5-77
क्रमांक 233 पुस्तकाची नों: दि: 29/3/81

'नवाकाळ' दैनिकाच्या संपादकीय वर्गापैकीं श्री. ना. ग. मुसळे यानीं रत्नागिरी जिल्ह्याची माहिति 'शल्यें व मूल्यें' या मथळ्याची लेखमाला गुंफून नवाकाळद्वारां लोकांना सादर केली. ही लेखमाला वृत्तपत्राच्या रकान्यांतच न रहातां पुस्तकरूपानें जनतेपुढें ठेवल्यास ती उपयुक्त ठरेल असें श्री. मुसळे यांच्या मित्रवर्गाकडून प्रोत्साहन मिळाल्यामुळें आतां तिचें पुस्तक तयार झालें आहे. पुस्तकांतील मजकुराचें स्वरूप समजण्यासाठीं 'काल', 'आज' आणि 'उद्यां' असे शब्द लेखकानें आरंभीं ठेवले आहेत व त्यावरून इतिहास, आजची स्थिति व भविष्याविषयीं आकांक्षा यांचा वाचकांना बोध होण्याला हरकत नाहीं. एखाद्या भूभागाचें ज्ञान करून देतांना अक्षांश–रेखांश व त्याला जखडणाऱ्या सीमा दर्शविणारी शास्त्रीय पद्धति सोडून लेखकानें हा प्रदेश लोकांच्या परिचयाचा आहे, या खात्रीनें एकदम त्याच्या वर्णनाला प्रारंभ केला आहे. ही खात्री अगदीं गैरवाजवी समजली जाऊं नये, कारण मराठीच्या वाचकांना रत्नागिरीचें भूगोलशास्त्रानुसार वर्णन केलें नाहीं म्हणून कसल्याहि तऱ्हेची अडचण वाटणार नाहीं.

रत्नागिरी जिल्ह्याचा यादवकालीन, मुसलमानांच्या राजवटींतला किंवा मराठेशाहींतला इतिहास अवगत नसला तरी इंग्रजांच्या कारकिर्दीत त्या जिल्ह्यांतील ब्राह्मणांनीं जी अनेकविध राष्ट्रीय स्वरुपाची कामगिरी बजावली आहे, ती सदैव लक्षांत रहाणारी आहे. शिवाजी महाराजांमागून राजाराम छत्रपतींच्या कारभारांत चित्पावन किंवा कोंकणस्थ ब्राह्मण शिरले व शाहू महाराजांनीं भट घराण्याच्या बाळाजी विश्वनाथला पेशवाई दिल्यानंतर या ब्राह्मणांच्या उत्कर्षाला प्रारंभ झाला. पेशवाईमध्यें पुष्कळ व्यक्तींनीं रत्नागिरीच्या बाहेर पडून केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर साऱ्या भारतांत आपलें नांव गाजविलें. कऱ्हाडे ब्राह्मण हे देखील कोंकणचे व बहुतांशीं रत्नागिरी जिल्ह्याचे रहिवासी. कोंकणस्थांमागून ते मराठेशाहीनें उघडलेल्या पराक्रमाच्या आखाड्यांत उतरले पण त्यांची कामगिरी कोंकणस्थांच्या बरोबरीची आहे. पेशवाईनें राजकारणाची

कोंकणस्थांना जी संवय लागली ती इंग्रजांच्या कारकिर्दीमध्यें कायम राहिली. इंग्रजी राज्य स्थिरावतांनाच त्या राज्याचा शेवट चिंतिणाऱ्या लोकहितवादी-सारख्या पुरुषांचें स्मरण बाळगल्यास वरील विधानाची यथार्थता पटेल. टिळक, गोखले या शुद्ध राजकारणाच्या व्यक्ती तर रानडे हे देशाच्या सर्वांगीण उन्नतीचे प्रयत्नशील पुरस्कर्ते. अर्वाचीन महाराष्ट्राची निरनिराळ्या संस्था निर्माण करून संघटना सिद्धीस नेणारांत कोंकणांतील, विशेषतः रत्नागिरी-कडील कोंकणस्थांचा भरणा फार मोठ्या संख्येनें दृष्टीस पडतो. मराठेशाहींतील दर्यावर्दी शिपाईगिरीला व अर्वाचीन काळीं मुंबई शहराच्या कारखानदारीला रत्नागिरीच्या सामान्य अब्राह्मण जनतेनें फार मोठा हातभार लावलेला आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत मोडणाऱ्या कांहीं भागांतील कायस्थ प्रभूंचा येथें उल्लेख करणें अवश्य आहे पेशवाईच्या संदर्भांत कऱ्हाडे ब्राह्मणांचा जो निर्देश आला तो विद्यमान परिस्थितीलाहि लागू पडणारा आहे. थोडक्यांत म्हणजे इतर भूमिज पिकांच्या दृष्टीनें रत्नागिरी जिल्हा मागासलेला म्हणतां आला तरी माणसांच्या बुद्धीचें पीक जातपात न पहातां तेथें उदंड पिकतें असा निष्कर्ष अतिशयोक्तीचा ठरत नाहीं.

अशा रत्नागिरी जिल्ह्याचे भौगोलिक विशेष—डोंगर नद्या समुद्र वगैरे; माणसें वगळून बाकीचे जीव विशेष, वनस्पति विशेष, माणसाच्या पराक्रमानें अस्तित्वांत आणलेले किल्ले, देवस्थानें इत्यादि विशेष, यांची माहिती सांगण्याचा श्री. मुसळे यांचा प्रयत्न अभिनंदनीय वाटेल. हा जिल्हा सह्याद्री व समुद्र यांच्या चिमट्यांत असल्यानें त्याची पूर्वीच्या काळीं जी उपेक्षा झाली ती सध्यां देखील चालू आहे. या उपेक्षेमुळें त्या जिल्ह्याचा विकास होण्याला संधी मिळाली नाहीं, हें गाऱ्हाणें श्री. मुसळे यांनीं आपल्या छोटेखानी पुस्तकाच्या शेवटीं नमूद केलें आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील खडकाळ भूमीच्या पोटांत जी संपत्ति असेल तिची शास्त्रीय तपासणी केलेली नाहीं आणि ह्या भूमीवरील डोंगराळ भागांत कोणते नवे पदार्थ निर्माण करणें शक्य आहे, याचा मनापासून गंभीरपणें विचार झालेला नाही. समुद्रमार्ग व भूमार्ग हे दोन्ही वाहतुकीचीं साधनें लक्षांत घेतल्यास अपुरे वाटतात. या भागांत लोहमार्ग झाला पाहिजे. कडेकपारींतील निरोगी वातावरणाच्या जागांचा उद्धार करण्याला त्या जिल्ह्यांत अवकाश आहे. या सुधारणांची

वाच्यता केव्हां केव्हां स्वतंत्रपणें कळकळीनें घडली असून तिकडे राज्यकर्त्यांनीं लक्ष दिलें नाहीं. श्री. मुसळे यानीं याप्रमाणें पुष्कळशा गरजांचा आपल्या पुस्तकांत समावेश केलेला असून तिकडे जनतेच्या पुढाऱ्यांनीं जागृत प्रेरणाशील दृष्टिक्षेप केल्यास या जिल्ह्याचें आजचें रुक्ष स्वरूप पालटेल. प्रस्तुत जिल्ह्यांतील जनता कष्टाळू व बुद्धिमान् आहे, यामुळें तिला प्रोत्साहन मिळाल्यास ती आपल्या नशीबाला नवें वळण लावील. ही जनता अन्यत्र राबून होणाऱ्या कमाईचा थोडा हिस्सा आपल्या गांवीं पाठविते, हें तिच्या स्वाभिमानाचें प्रमाण आहे.

श्री. मुसळे यांनीं पुस्तकाच्या शेवटीं अन्नधान्याची, झाडाझुडपांची, औषधी वनस्पतींची, दगड, धोंडे, माती वगैरेची जी माहिती दिलेली आहे तिच्याकडे लक्ष पुरविल्यास जिल्ह्याच्या विकासाची दिशा कळेल. श्री. मुसळे यानीं जिल्ह्याची माहिती परिश्रमपूर्वक जमविलेली असून तिचें योग्यप्रकारें चीज व्हावें अशी इच्छा दर्शवून लेखकाला धन्यवाद देऊन हा पुरस्कार थांबवितों.

**न. र. फाटक**

--*०*--


# चंद्रप्रकाश विविध वस्तु संग्रहालय

**शालोपयोगी सर्व वस्तु व पुस्तकें, सौंदर्य-साधनें, स्टेशनरी, कटलरी,**

आणि

**आयुर्वेदिक औषधें स्वस्त दरांत मिळण्याचें एकच ठिकाण —**

**चं द्र प्र का श वि वि ध व स्तु सं ग्र हा ल य**

कॉमरेड चेंबर, ( डॉ. गद्रे बिल्डिंग ) गोविंदजी केणी रोड,

हिंदमाता सिनेमाच्या मागें, दादर मुंबई १४.

प्रो. वि. ना. पाथरे

# लेखकाचे चार शब्द

कोंकण प्रांताचा सविस्तर इतिहास अद्याप लिहिला न गेल्यामुळें कोंकणांतील बरीच माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाहीं. कोंकणचा सविस्तर इतिहास लिहिला जाणें आवश्यक असलें तरी तें संशोधनाचें फार मोठें कार्य आहे. निदान रत्नागिरी जिल्ह्यावर सविस्तर पुस्तक असावें असें मला वाटत होतें. परंतु अशा तऱ्हेचें पुस्तक लिहिणें माझ्यासारख्या नवोदित लेखकाच्या आवाक्याबाहेरचें वाटलें, तेव्हां रत्नागिरी जिल्ह्याची थोडक्यांत माहिती लोकांपुढें ठेवावी या दृष्टीनें 'नवाकाळ' दैनिकांतून 'रत्नागिरी जिल्हा- मूल्यें व शल्यें' या शीर्षकाखालीं गेल्या जुलै ते आक्टोबरपर्यंत क्रमशः आठवड्यांतून एकदां याप्रमाणें सतरा लेखांक लिहिले. लेखांक चालू असतांच ते लेखांक पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावे अशी कांहीं मित्रमंडळींनीं सूचना केली. त्याप्रमाणें मूळ लेखांकांत योग्य त्या ठिकाणीं फेरफार करून व कांही नवीन अधिक माहिती घालून हें पुस्तक तयार केलें आहे.

'नवाकाळ'चे संपादक श्री. य. कृ. ऊर्फ अप्पासाहेब खाडिलकर व त्यांचे चिरंजीव श्री. नी. य. खाडिलकर यांनीं माझ्याकडून लेखांक आग्रहानें लिहून घेतले म्हणूनच ते पुस्तकरूपानें इतक्या लवकर सादर करितां येत आहेत. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तवढे थोडेच. त्याशिवाय प्रा. न. र. फाटक यांनीं वेळ नसतांनाहि त्यांतच वेळ काढून या पुस्तकास मार्गदर्शन केलें व प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल त्यांचा व **अभिनव प्रकाशन**चे मालक श्री. वामन विष्णु भट यांनीं मूळ लेखांतील मजकुराची पुस्तकाला पाहिजे तशी जुळणी करून घेऊन पुस्तक प्रकाशित केलें त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

कणकवलीचे आमदार श्री. बी. बी. सावंत, बी.ए., एल्.एल्.बी., धनुर्धारीचे संपादक श्री. अ. सी. केळुसकर, नवाकाळ मधील माझे एक सहकारी श्री. मधुकर देशपांडे, लोकमान्याचे सहसंपादक श्री. अ. ना. परांजपे, श्री. या. ना. मुळे, श्री. पां. रा. मुळे बी.ए. श्री. मु. म. दांडेकर, सदर पुस्तकांतील रत्नागिरी जिल्ह्याचा नकाशा काढून देणारे श्री. स. मो. तांबोटकर,

श्री. राजाभाऊ टुकरुल, श्री.चंद्रकांत देसाई इत्यादि मंडळींनीं या पुस्तकाच्या कामीं जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.कुळेवाशी (ता. संगमेश्वर) येथील रहिवाशी व **नॅशनल प्रिंटिंग ब्यूरोचे** मालक श्री. सिताराम गोविंद गोडे यांनी अल्पावधींत पुस्तकाच्या छपाईचें काम आपलेपणानें करून दिलें त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतों. जाहिराती देऊन व अन्यप्रकारें आर्थिक मदत करून ज्यांनीं आम्हांस मदत केली त्यांचे या ठिकाणीं मनापासून आभार मानतों. वाचकवृंदाच्या हातांत हें छोटें पुस्तक देतांना एवढेंच सांगायचें कीं तें संपूर्ण निदोष आहे असा आमचा दावा नाहीं. यांत कांहीं दोष राहिले असल्यास अगर कांहीं नवीन माहिती उपलब्ध झाल्यास व ती आम्हांस कळविल्यास या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आला तर नवीन माहिती घालून दोष सुधारण्याची दक्षता घेऊं एवढें आश्वासन देतों. उशीरा मिळालेली माहिती परिशिष्टांत दिली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जनता या पुस्तकाचें स्वागत कराल अशी आशा बाळगतों.

५७ ई, पहिली खत्तर गल्ली,
क्रॉस लेन, मुंबई २
तारीख २८-१-१९५८.

**नारायण गणेश मुसळे**

**चुकीची दुरुस्ती--**

पान नं. ५२ ओळ ११ मध्यें इ. स. १६०२ ऐवजीं १५०२ असें वाचावें.

## देणगीदार

श्री. बा. वि. तांबे, श्री. पर्शरामभाऊ महाजन, श्री. बापूसाहेब साटे, श्री. एस. व्ही. सोवनी, ॲड. वाय्. एम. रेगे, ॲड. एन. के. सावंत, डॉ. बी. आर. सामंत, डॉ. आर. बी. मोरे, डॉ. जे. आर. चव्हाण, श्री य. वा. खडपे, वैद्य कृ. के. कानिटकर, श्री. वि. र. पडवळे, श्री. रा. रा. साळवी.

**मराठी भाषेंतील**

**कोणत्याहि पुस्तकासाठीं**

**प्रथम आम्हांस लिहा**

**बलवंत पुस्तक भाण्डार, मुंबई ४**

## अर्पण पत्रिका

कै. तीर्थरुप **गणेश विनायक मुसळे**

**दादा** यांच्या चरणीं सादर समर्पण

— लेखक

## अनुक्रमणिका


| | | पान |
|---|---|---|
| १ | ऐतिहासिक पीठिका | ५ |
| २ | ऐतिहासिक घराणीं | २८ |
| ३ | ऐतिहासिक स्थळें, किल्ले व देवस्थानें | ३५ |
| ४ | रत्नागिरी जिल्ह्याची निर्मिती व भौगोलिक स्थिति | ४३ |
| ५ | जाती–जमाती | ५७ |
| ६ | सांस्कृतिक परंपरा | ६४ |
| ७ | आजच्या गरजा | ७१ |
| ८ | परिशिष्ट | ७७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23070 वि: 25-4-91
क्रमांक 223 नों दि 22-3-46
संग्रहालय ठाणे 10920

# रत्नागिरी जिल्हा

## काल, आज व उद्यां

### प्रास्ताविक

भारतांत सृष्टिसौन्दर्याविषयीं कश्मीर, कामरूप, केरळ व कोंकण हे देश प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्राच्या दृष्टीनें म्हणायचें तर कोंकण हेंच सृष्टिसौन्दर्याचें स्थळ म्हणतां येईल. मुंबईसारख्या शहरांतून शेकडों लोक प्रवासासाठीं कश्मीर, केरळ वगैरे भागांत जातात, परंतु मुंबईला लागून असलेल्या कोंकणकडे त्या दृष्टीनें पहाणारे लोक कमी आहेत. जवळच्या वस्तूला मोल नाहीं हें एक कारण आहेच, शिवाय दळणवळणाच्या सोईच्या दृष्टीनें हा मागासलेला प्रदेश आहे. मुंबईतील एकूण लोकसंख्येच्या ५० टक्यापेक्षां अधिक म्हणजे सुमारें १५ लाखांवर कोंकणी लोकांची मुंबईत वस्ती आहे.

आपण कोंकण म्हणजे ठाणें, कुलाबा, रत्नागिरी एवढच जिल्हे समजतो. परंतु कोंकण देशाची पूर्वीची व्याप्ती पहातां उत्तरेस सध्यांच्या सुरत जिल्ह्यापासून दक्षिणेस कारवारपर्यंत आढळते. तथापि आपल्या लोकांच्या बोलण्यांत कोंकण या शब्दाचा अर्थ सध्यांचा रत्नागिरी जिल्हा असाच करण्यांत येतो.

कोंकण निर्मितीसंबंधी अशी पौराणीक कथा आहे कीं, परशुरामानें जिंकलेली सर्व पृथ्वी ब्राह्मणांना दान दिली; त्यामुळें दान दिलेल्या प्रदेशांत राहतां येत नाहीं, त्यावर आपली सत्ता नाहीं, असा परशुरामाच्यापुढें प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळीं सह्याद्री पर्वताला समुद्र भिडला होता. तेव्हां स्वतःला राहण्यासाठीं सह्याद्री पर्वतावर बाण मारून परशुरामानें समुद्र हटविला व राहण्यास जागा निर्माण केली. याबाबत अशीहि एक कथा आहे

कीं, वाळवीवर समुद्रानें उपकार केले होते. तेव्हां समुद्राचे उपकार फेडण्यासाठीं वाळवी संधी पहात होती. परशुराम बाणानें समुद्र हटविणार हें तिला समजलें तेव्हां तिनें परशुरामाचें धनुष्य पोकळ करून ठेवलें. परशुरामानें धनुष्याला बाण लावून तो जोरानें ओढतांच धनुष्य मोडलें, परंतु बाण उडाला व समुद्र हटविला गेला. जर वाळवीनें धनुष्य पोखरलें नसतें तर अनेक योजनापर्यंत समुद्र मागें जाऊन जमीन झाली असती.

परशुरामाच्या आईचें नांव कोंकणा असें होतें. त्यामुळें परशुरामानें समुद्र दूर हटविल्यावर आपल्या आईच्या स्मरणार्थ या नवीन प्रदेशाला कोंकण असें नांव दिलें अशीहि एक पौराणीक आख्यायिका आहे.

प्राचीन ग्रंथांत परशुराम व कोंकण यांचा संबंध दर्शविणाऱ्या अनेक कथा आहेत. कोंकणातले कांहीं लोक कोंकणाचा उल्लेख ‘ पर्शुराम क्षेत्र ’ असाही करतात. कांहीं ग्रंथांतून कोंकणाला ‘ अपरान्ह ’ असेंही नांव आढळतें.

भूगर्भशास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं फार प्राचीन काळीं या भागांत ज्वालामुखी होते. त्यांतून शिलारस ( लाव्हा ) बाहेर पडून सह्याद्री पर्वत बनला व त्याच्या पश्चिमेस जी उतरण तयार झाली तोच हा कोंकण प्रांत बनला.

चिपळूण व कोल येथील लेण्यांवरून रत्नागिरीच्या उत्तर विभागांत बौद्धांच्या वसाहती होत्या असें दिसून येतें. इसवीसनाच्या पहिल्या शतकाच्या शेवटीं रुद्रदमण महाक्षात्रप याची सत्ता सिंध, मारवाड, माळवा व कोंकण ते दक्षिण कारवारपर्यंत होती. सहाव्या शतकाच्या अखेरीस रत्नागिरी जिल्ह्याचा दक्षिण भाग चालुक्यांनीं जिंकला. सातव्या शतकाच्या मध्यास चालुक्यांनीं मौर्यांना हांकून दिलें. पुढें चालुक्य कोल्हापूराहून संगमेश्वरला येऊन त्यांनीं संगमेश्वर शहर वसविलें व याच वेळीं कर्णेश्वराचें देऊळ त्यांनीं बांधलें किंवा दुरुस्त केलें असावें. नवव्या व दहाव्या शतकांत या भागावर हैद्राबाद जवळील मालखेत येथील राठोड यांची सत्ता होती. इ. स. १०२५ मध्यें हा विभाग जयसिंग उर्फ जगदेव मल्ल यानें चालुक्यांकडून जिंकला. नंतर त्याच्या वतीनें गोव्याचा सिलाहार पन्नास वर्षे व्यवस्था पहात असे, त्यानंतर कदंबांकडे सत्ता आली. १२ व्या शतकाच्या प्रारंभास देवगिरीच्या यादवांनीं हा भाग जिंकला. या यादवांपैकी सिंदेव यानें कोल्हापूरजवळील पन्हाळा हस्तगत केला व

नंतर कोंकणप्रांत सत्तेखालीं आणला. यादवांकडे हा प्रदेश फार दिवस नव्हता. इ. स. १०७७ च्या सुमारास पुन्हां चालुक्य घराण्यांतील ४ था विक्रमादित्य यानें हा प्रदेश जिंकला. चालुक्यांकडे ११२८ पर्यंत या प्रदेशाची सत्ता होती. १०५० ते १३१० या दरम्यान कांहीं भागांत गोव्याचा विजयार्कदेव याचा मुलगा भोजदेव याची सत्ता होती. हा किल्ले वगैरे बांधण्यांत पटाईत होता. त्याची सत्ता कारवारपर्यंत असून राजधानी पन्हाळा ( कोल्हापूरजवळ ) होती. त्याचेवर सिंधण राजानें स्वारी करून त्याचा कांही प्रदेश जिंकला. १३ व्या शतकांत म्हैसूर प्रांतांतील द्वारासमुद्र येथील होशाळ बल्लाळ याची सत्ता येथील कांहीं भागांत होती.

१४ व्या शतकाच्या प्रारंभाला मुसलमानी सत्तेला सुरवात झाली. त्यावेळीं दाभोळ हें या भागांतील मोठें केंद्र झालें होतें इ. स. १३४७ ते १५०० पर्यंत बहामनी राजांची सत्ता होती. नंतर इ. स. १५०० ते साधारणतः १६०० पर्यंत विजापूरच्या अदिलशाहीची सत्ता होती. अदिलशाहीपैकीं युसुफ अदिलशहा यानें इ. स. १०५२ च्या सुमारास या भागांतील महसूलाची वसुली व्हावी व शेतीचें उत्पादन व्हावें या हेतूनें खोती हक्क लोकांना दिले. त्यावेळीं उत्तरेस बाणकोटपर्यंत, ( सावित्री नदी ) युसुफ अदिलशहाच्या सत्तेखालीं प्रदेश होता.

विजापूरच्या अदिलशहानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी हा प्रदेश काबीज केला.

# ऐतिहासिक पीठिका

## शिवाजी महाराज व दक्षिण कोंकण

शिवाजी महाराजांच्या वेळीं सुद्धां सध्याच्या रत्नागिरी जिल्ह्यांत अनेक बडामोडी झाल्या. त्यावेळीं हा भाग विजापूरच्या आदिलशहांच्या ताब्यांत असून साधारणतः रत्नागिरी ते कारवारपर्यंत प्रदेश धाकटा रणदुल्लाखान ऊर्फ रुस्तुमिजान याच्याकडे जहागीर म्हणून असून त्यांत राजापूर, कारवार हीं मोठीं बंदरें होतीं. इंग्रज व फ्रेंचांच्या त्या ठिकाणीं वखारी होत्या.

दाभोळ, राजापूर, कारवार हीं त्या काळांतील प्रसिद्ध बंदरें असल्यामुळें परदेशांतून मालाची आयात व आपल्या देशांतून मालाची निर्यात याच बंदरातून मोठ्या प्रमाणांत होई व त्यामुळें जंजिऱ्याच्या सिद्दीला व्यापाऱ्यांकडून जकातीच्या

रूपानें वरीच प्राप्ती होत असे, यामुळें शिवाजीला तो या भागांत वस्तान बसविण्यास विरोध करीत होता. परंतु रुस्तुमिजानशीं शिवाजीचें सूत असल्यामुळें त्या प्रदेशांत शिरकाव करून वस्तान बसविणें त्याला सोपें गेलें. शिवाजीचा जम या भागांत बसूं लागला तेव्हां त्याच्यापासून आपणांस त्रास होऊं नये म्हणून इथले सरदारलोक त्याच्याशीं स्नेह ठेवीत असत. कारण त्या काळांत कांहीं सरदार आपलें भांडवल व्यापारांत गुंतवीत असत. त्यांचीं स्वतःचीं गलबतेंही असत.

## अफझुलखानाचीं गलबतें

दाभोळ येथें अफझुलखानाचीं तीन जहाजें असल्याचें शिवाजीला समजलें तेव्हां तीं ताब्यांत घेण्यासाठीं त्यानें आपला अधिकारी दोराजी याला पाठविलें, परंतु अफझुलखानाचा अंमलदार अहंमद शरीफ तीं गलबतें घेऊन राजापूरास गेला व तेथील अधिकारी अब्दुल करीम यास तीं जहाजें आपल्या ताब्यांत ठेवण्यास त्यानें सांगितलें. दोराजीही त्याच्या मागोमाग राजापूरास गेला. तेव्हां अब्दुल करीमनें तीं जहाजें इंग्रज वखारवाल्यांच्या ताब्यांत दिलीं. इंग्रजांजवळ तीं जहाजें दोराजी मागूं लागला तेव्हां ते सांगूं लागले कीं अब्दुल करीमकडे आमचें कर्ज येणें असल्यामुळें त्याच्या मोबदल्यांत हीं जहाजें आमच्या ताब्यांत आहेत. या जहाजांच्या प्रकरणांत अखेर तंटा सुरू झाला व आपण पकडले जाऊं नये म्हणून इंग्रजांच्या वखारीचा मुख्य रेव्हिंग्टन, अब्दुल करीमसह गलबतांतून पळून गेला. दोराजीनें दुसरा इंग्रज व्यापारी गिफर्ड याला कैद करून ठेवलें.( २० जानेवारी १६६० इ. ) या घटनेपूर्वी म्हणजे १६५९ सालीं शिवाजीनें प्रतापगडच्या पायथ्याशीं अफझुलखानाचा वध केला होता. अफझुलखानाचा मुलगा फाजलखान यानेंहि अब्दुल करीमला जहाजें आपल्या ताब्यांत ठेवण्यास कळविलें. त्यावेळीं रुस्तमिजानेंच इंग्रज व शिवाजी या दोघांशीं संबंध चांगले असल्यामुळें त्यानें मध्यस्थी केली आणि शिवाजीनें गिफर्डला सोडलें व त्याचा जप्त केलेला मालहि परत केला.

पन्हाळगडच्या वेढ्यानंतर सन १६६१ मध्यें शिवाजीनें दक्षिण कोंकणकडे मोर्चा वळविला. त्यानें प्रथम दापोलीच्या उत्तरेस पालवण येथील यशवंतरावावर स्वारी केली, कारण त्यानें पन्हाळगडच्या वेढ्यांत मुसलमानांना मदत केली होती. यशवंतराव त्यावेळीं पळून संगमेश्वरजवळील शृंगारपूरच्या सुर्व्यांकडे आश्रयास

गेला. शिवाजीनें पालवण काबीज करून नंतर दळवींच्या ताब्यांतील दाभोळहि कबजांत घेतलें व पर्शुरामाचें दर्शन घेऊन तेथून सावर्ड्यावरून तो संगमेश्वरला गेला. या ठिकाणीं एक मुसलमान अंमलदार होता. तो शिवाजीच्या आगमनाची बातमी ऐकतांच पळून गेला. शिवाजीनें संगमेश्वरचा ताबा घेतला व तेथें बंदोबस्तासाठीं तानाजी मालुसरे व पिलाजी निळकंठ यांना ठेवून आपण देवरुखवरून राजापूर गांठलें.

राजापूरच्या इंग्रज व्यापाऱ्यांना येथील भांडणांत न पडण्यासंबंधीं शिवाजीनें बजावलें असतांहि पन्हाळगडच्या वेढ्याच्या प्रसंगीं सिद्दी जोहरनें इंग्रजांची मदत मागितली तेव्हां रेव्हिंग्टन, मिरॅम गिफर्ड हे वेलजी नांवाच्या दुभाषासह राजापूराहून १ तोफ व ५० गोळे घेऊन पन्हाळगडास गेले होते आणि तेथें इंग्रजांचें निशाण दाखवून सिद्दीकडून तोफांचे गोळे उडविण्यांत आले होते, हा प्रकार शिवाजी विसरलेला नव्हता. शिवाजीनें त्यांना नरम करायचें ठरविलें होतें. यावेळीं एक हजार स्वार व तीन हजार पायदळ अगोदर राजापूरास शिवाजीनें पाठविलें होतें. स्वतः तेथें गेल्यावर राजापूरच्या प्रमुख इंग्रज लोकांना त्यानें भेटावयास बोलावलें. तेव्हां रेव्हिंग्टन, रॅंडाल्फ टेलर, रिचर्ड टेलर, गिफर्ड, फेरांड, रिचर्ड नेपीयर, सॅम्युएल बर्नाड हे इंग्रज व्यापारी त्याला भेटावयास गेले. शिवाजीनें ताबडतोब त्यांना कैद करून त्यांची मालमत्ता जप्त केली. त्यापैकीं बर्नाड व नेपीयर हे एक महिन्यांत राजापूर येथें मरण पावले. बाकीच्यापैकीं कांहींना महाड जवळ सोनगड व कांहींना वासोटा किल्ल्यावर कैदेंत ठेवलें होतें. रेव्हिंग्टन कैदेंत आजारी पडला त्याला ता. १७-१०-१६६१ रोजीं सोडण्यांत आलें. तो सुरतेला गेला. तेथें कांहीं दिवसांनी तो मरण पावला. कैदेंत असतांना कैद्यांची व्यवस्था चांगली ठेवण्यांत आली होती. शेवटीं १७ जानेवारी १६६३ सालीं त्या सर्व इंग्रज कैद्यांना शिवाजीचा अधिकारी रावजी सोमनाथ पंडीत यानें सोडलें.

या प्रकरणांत आपलें २४ हजार होन नुकसान झालें, दोन इसम मरण पावले व दोन वर्षें कैद सहन करावी लागली, असें एका इंग्रजानें सुरतेला कळविलें. यावेळीं झालेली नुकसानी परत मिळण्यासाठीं शिवाजीकडे इंग्रजांनीं प्रयत्न केले. पण त्याचा उपयोग झाला नाहीं.

राजापूरला जम बसवून शिवाजीनें खारेपाटण कबजांत घेतल व तेथें

अधिकारी नेमले. इतक्यांत शृंगारपूरच्या सुर्व्यांनीं नानाजीवर हल्ला केल्याची बातमी आली. तेव्हां तो तसाच शृंगारपूरला गेला.

## शृंगारपूरचे सुर्वे

शृंगारपूर येथें त्यावेळीं सूर्यराव सुर्वे होता. त्यानें जावळीच्या मोऱ्यांना शिवाजीविरुद्ध मदत करून व अन्यप्रकारेंही अनेक वेळां त्रास दिला होता. त्यामुळें त्याला जरब बसविणें आवश्यक होतें. शिवाजी शृंगारपूरला येतांच सूर्यराव पळून गेला. शिवाजी महाराजानीं शृंगारपूर ताब्यांत घेतलें व तेथें त्रिंबक भास्कर याला बंदोबस्तासाठीं ठेवलें. ( २९ मार्च १६६१ )

शृंगारपूरच्या सुर्व्यांजवळ शिर्के नांवाचा कारभारी होता, त्याला शिवाजी महाराजानीं आपल्या पथकांत ठेवून घेतलें होतें व पुढें कांहीं दिवसानीं त्याची मुलगी सोयराबाई हिच्याशीं लग्न केलें.

वाडीकर लखम सावंत यानें शिवाजीशीं इ. सं. १६५९ मार्चमध्यें एक करार करून शिवाजीचा आश्रय पत्करला होता. हें सावंताचें कृत्य आदिलशहाला पसंत पडलें नाहीं. त्याला राग आला. पन्हाळगडच्या वेढ्याच्या वेळीं आदिलशहानें शिवाजीला कोंकणांत पायबंद घालण्यासाठीं काजी अब्दुला याची रवानगी तिकडे केली. वेंगुर्ले प्रांत त्यावेळीं वजीरखवासखान याचेकडे जहागीर म्हणून होता. त्याच्या मदतीसाठीं काजी अब्दुला हा १४ फेब्रुवारी १६६० ला आला. त्याच अवधींत शिवाजीच्या लोकांनीं कुडाळवर स्वारी करून कुडाळ काबीज केलें. पण लखम सावंतानें तें पुन्हा १८ मार्च १६६० रोजीं ताब्यांत घेतलें. त्यामुळें तेथें शिवाजीचा अंमल त्यावेळीं बसला नाहीं. नंतर १६६१ मध्यें शिवाजीनें उंबरखिंडीत मोंगलांचा पराभव केल्यावर दाभोळ व राजापूर हीं काबीज केलीं.

शिवाजीनें २३ मे १६६० त पुन्हां कुडाळवर स्वारी करून तें हस्तगत केलें. त्यावेळीं वाडीकर सावंत आदिलशहास सामील झाले होते. या प्रसंगीं सावंतानी वेंगुर्ल्यांच्या डच, पोर्तुगीजांची मदत मागितली. त्याचवेळीं कुडाळ प्रांत आपणांस आदिलशहानें दिला आहे असें शिवाजीनें डच व पोर्तुगीजांना कळविले त्यामुळें त्यांनीं सावंतांना मदत केली नाहीं. उलट डच अधिकाऱ्यानें कांहीं चीजा शिवाजीला नजर केल्या. परंतु त्यांचा त्यानें स्वीकार केला नाहीं. तेथून शिवाजी बांद्यास गेला, तेव्हां पोर्तुगीजांनीं रामाजी कोठारी या आपल्या वकीलाला ४२००

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमत.
अनुक्रम 23060 वि: ...
क्रमांक 233 नों: दि: 20/3/48



होन व पत्र नजराण्यादाखल देऊन शिवाजीकडे पाठविले, परंतु रामाजी यांच्यास येऊन पोहोंचण्यापूर्वीच शिवाजी कुडाळ प्रांताचा बंदोबस्त करून निघून गेला होता. नंतर हा प्रांत घेण्यासाठीं सिद्दी जोहरचा मुलगा सिद्दी अजीज व जांवई सिद्दी मसूद यांना आदिलशहानें पाठविलें. सिद्दी अजीज १० जून १६६३ रोजीं विषप्रयोगानें मरण पावला.

कुडाळ प्रांताच्या बंदोबस्तासाठीं शिवाजीनें रावजी सोमनाथ पंडित याला ठेवलें व त्याचवेळीं वेंगुर्ल्यावर हल्ला करून तें जाळून टाकलें. त्यामुळें पोर्तुगीजांनाही जरब बसली. त्यावेळीं कुडाळ व फोंडे प्रांतावर रावजी सोमनाथ पंडित व प्रभावळी प्रांतावर पिलाजी निलकंठ सरनाईक हे अधिकारी होते.

## सिंधुदुर्गाचें बांधकाम

सिंधुदुर्ग किल्ला २५ नोव्हेंबर १६६४ ( मार्गशीर्ष वद्य २ शके १५८६ ) रोजीं बांधण्याची सुरवात शिवाजी महाराजांनीं केली. तो किल्ला बांधण्याचें काम पूर्ण होण्यास सुमारें तीन वर्षे लागलीं. हें बांधकाम गोविंद विश्वनाथ प्रभू सुभेदार कुंभारजुवे यांच्या देखरेखीखालीं झालें. या किल्ल्यावर कांहीं पोर्तुगीजही कारागीर कामास होते. या ठिकाणीं आरमाराचें ठाणें करण्यांत आलें व येथील मालवण बंदरहि नंतर भरभराटीला आलें.

सिंधुदुर्ग किल्ल्याची जागा शिवाजी महाराजांना एका कोळ्यानें दाखविली व त्या कोळ्याला तेथें जवळच समुद्र किनाऱ्यावर जमीन शिवाजी महाराजांनीं इनाम दिली असें सांगतात.

विजयदुर्ग किल्ला शिवाजीनेंच बांधला. तो किल्ला बांधला त्या वर्षाच्या संवत्सराचे नांवावरून ( विजयनाम संवत्सर ) त्याला विजयदुर्ग नांव देण्यांत आलें.

याशिवाय प्रचितगड, पालगड (दापोलीजवळ) मंडणगड हे किल्ले शिवाजीनें कोंकणांत बांधले. त्याशिवाय इतर दुरुस्त केले. पूर्णगड किल्ला हा सर्व किल्ल्यांच्या शेवटीं बांधल्यामुळें त्याला शिवाजीनें पूर्णगड नांव दिलें असें म्हणतात.

साधारणतः सध्यांच्या रत्नागिरी जिल्ह्याच्या भागासच दक्षिण कोंकण त्या काळांत म्हणत असत. या भागांत शिवाजीचे एकुण ५८ किल्ले होते.

## मराठ्यांचें आरमार

शिवाजी महाराज शस्त्रास्त्रें इंग्रज व फ्रेंचांकडून विकत घेत असत. त्यांची राजधानी रायगड ही कोंकण व देश यांच्या सरहद्दीवर असल्यामुळें त्यांचे देशावरील व कोंकणांतील राजकीय घडामोडींशीं निकटचें संबंध येत आणि त्यामुळें कोंकणांतील इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी यांच्या हालचाली त्यांच्या लक्षांत पूर्णपणें आल्या होत्या. यांना केव्हांना केव्हां तरी तोंड द्यावें लागणार व त्यासाठीं आरमाराची आवश्यकता आहे हेंहि त्यानीं जाणलें व त्याप्रमाणें आरमार तयार केलें. त्यांच्या आरमारांत भिवजी गुजर हा मुख्य असून त्याचे हाताखालीं तुकोजी आंग्रे व त्याचा मुलगा कान्होजी आंग्रे हे होते. शिवाजीनंतर गुजर व आंग्रे यांचें बांकडें आलें व आंगऱ्यानें गुजर यांस अटकेंत टाकलें. अटकेंत गुजर मरण पावला व कान्होजी आंग्रे आरमाराचा प्रमुख झाला. रायगड पडल्यावरहि मुसलमानांचा अंमल कान्होजीनें स्थिर होऊं दिला नाहीं. या आंगऱ्यांचा मूळ गांव हर्णेजवळील आंगरवाडी हा होय आंगऱ्यांचा दरारा पश्चिम समुद्रांत मुंबईपासून मंगळूरपर्यंत चालत असे. इंग्रजांचें जहाज सुखरूप बंदरांत पोहोचविण्याबद्दल आंगऱ्यांना जहाजामागें पांच हजार रुपये इंग्रज देत असत. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, अगर इंग्रज यांपैकीं कोणाचेंहि समुद्रावर कांहीं चालत नसे. एका इंग्रज गृहस्थाचें कान्होजी आंग्रे यांचेबद्दल मत पुढील उतारा वाचून लक्षांत येईल. सदर इंग्रज गृहस्थ कान्होजीबद्दल म्हणतो—

'दर्यावर लूट करणाऱ्या या सरदाराची हांव विजयदुर्ग हस्तगत करून थांबली नाहीं. पोर्तुगीज व इतर व्यापाऱ्यांस घालवून देऊन पश्चिम किनाऱ्यावर बंदरें व किल्ले बांधून तो एक स्वतंत्र राजाच बनला. एकदां सुंदर अरबी घोड्यांनीं भरलेलें जहाज सहज त्याला हस्तगत झालें. तेणेंकरून नवीन घोडेस्वारांची फौज त्यानें तयार केली. हिंदु, मुसलमान, डच, पोर्तुगीज, फ्रेंच इत्यादी अठरा पगड जातीचे लोक रक्तानें डागळलेल्या या चोराच्या निशाणाला मान देत. अर्थात असे लोक निष्ठुर व बेपर्वा असायचे. त्यांस बऱ्यावाईटाची चाड थोडीच असणार ?'

## विजयदुर्ग येथें इंग्रजांचा पराभव

मुंबईला असलेला इंग्रजांचा गव्हर्नर बून यानें आंगऱ्यांची खोड जिरविण्याचा निश्चय केला होता. तो इ. स. १७१५ त मुंबईत आला व त्यानें दोन

वर्षांत नऊ उत्कृष्ट लढाऊ जहाजें मुंबईच्या बंदरांत नवीन तयार केलीं. ब्रिटानिया, व्हिक्टरी ( विजय ), डिफेन्स ( संरक्षण ), रिव्हेंज ( सूड ), फेम ( कीर्ती ) हंटर ( चाबूक ), हंक ( ससा ), ईगल ( गरुड ) व प्रिन्सेस अमिलिया अशीं त्या जहाजांचीं नांवें होतीं. या सर्वांवर मिळून १४८ तोफा व १२५० लढाऊ खलाशी होते. याशिवाय जमिनीवरून लढण्यासाठीं अडीच हजार युरोपियन व दीड हजार एतद्देशीय एवढी फौज त्यानें तयार केली व १७ एप्रिल १७१७ रोजीं या आरमारानें आंगऱ्याच्या विजयदुर्ग किल्ल्यावर हल्ला केला व तो किल्ला हस्तगत करण्याचा करून प्रयत्न केला. पण कान्होजी आंगऱ्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. इंग्रजांना मुठींत नाक घेऊन मुंबईला जावें लागलें. या लढाईत इंग्रजांचे २०० लोक मेले व ३०० जखमी झाले.

यानंतर यापेक्षां अधिक तयारी करून इंग्रजांनीं पोर्तुगीजांच्या मदतीनें खांदेरी व अलिबाग येथील कुलाबा किल्ल्यावर १७२१ मध्यें स्वारी केली. परन्तु या दोन्ही वेळींहि इंग्रजांचा पराभव झाला. नंतर कान्होजीचा मुलगा संभाजी यानेंहि वसईच्या स्वारींत चिमाजी आप्पाला चांगली मदत केली. राजाराम चंदीहून आल्यावर त्यानें कान्होजीस सरखेल हा किताब दिला. सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हीं त्यावेळीं सर्व आरमारी साहित्याचीं कोठारें असून कुलाबा हें आरमाराचें मुख्य ठाणें होतें.

संभाजी महाराजांच्या वेळीं कोंकण किनाऱ्यावरील हा भाग कान्होजी आंग्रे यांच्या ताब्यांत होता. परन्तु रायगड किल्ला मोंगलांनीं काबीज केला व संभाजीला ठार मारलें. या काळांत आंग्र्यांचेंहि फार नुकसान झालें. महाड, नागोठणें ( जिल्हा कुलाबा ) मंडणगड, सुवर्णदुर्ग महाल, अंजनवेल महाल, ( हल्लींचे मंडणगड, खेड. चिपळूण गुहागर तालुके ) जंजिऱ्याच्या सिद्दीनें आंगऱ्यांपासून हस्तगत केले होते.

## संभाजीला अटक

संगमेश्वरला सरदेसायांचा सध्यां एक वाडा आहे. या वाड्यांत छत्रपती संभाजी राजे. कलुषा कब्जीसह राहिले असतांना त्यांचेवर औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान यानें अचानक हल्ला करून त्यांना १ फेब्रुवारी १६८९ रोजीं अटक केली.

## मराठ्यांचें आरमार

शिवाजी महाराज शस्त्रास्त्रें इंग्रज व फ्रेंचांकडून विकत घेत असत. त्यांची राजधानी रायगड ही कोंकण व देश यांच्या सरहद्दीवर असल्यामुळें त्यांचे देशावरील व कोंकणांतील राजकीय घडामोडींशीं निकटचें संबंध येत आणि त्यामुळें कोंकणांतील इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी यांच्या हालचाली त्यांच्या लक्षांत पूर्णपणें आल्या होत्या. यांना केव्हांना केव्हां तरी तोंड द्यावें लागणार व त्यासाठीं आरमाराची आवश्यकता आहे हेंहि त्यानीं जाणलें व त्याप्रमाणें आरमार तयार केलें. त्यांच्या आरमारांत भिवजी गुजर हा मुख्य असून त्याचे हाताखालीं तुकोजी आंग्रे व त्याचा मुलगा कान्होजी आंग्रे हे होते. शिवाजीनंतर गुजर व आंग्रे यांचें वांकडें आलें व आंगऱ्यानें गुजर यांस अटकेंत टाकलें. अटकेंत गुजर मरण पावला व कान्होजी आंग्रे आरमाराचा प्रमुख झाला. रायगड पडल्यावरहि मुसलमानांचा अंमल कान्होजीनें स्थिर होऊं दिला नाहीं. या आंग्र्यांचा मूळ गांव हर्णैजवळील आंगरवाडी हा होय आंगऱ्यांचा दरारा पश्चिम समुद्रांत मुंबईपासून मंगळूरपर्यंत चालत असे. इंग्रजांचें जहाज सुखरूप बंदरांत पोहोचविण्याबद्दल आंगऱ्यांना जहाजामागें पांच हजार रुपये इंग्रज देत असत. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, अगर इंग्रज यांपैकीं कोणाचेंहि समुद्रावर कांहीं चालत नसे. एका इंग्रज गृहस्थाचें कान्होजी आंग्रे यांचेबद्दल मत पुढील उतारा वाचून लक्षांत येईल. सदर इंग्रज गृहस्थ कान्होजीबद्दल म्हणतो—

'दर्यावर लूट करणाऱ्या या सरदाराची हांव विजयदुर्ग हस्तगत करून थांबली नाहीं. पोर्तुगीज व इतर व्यापाऱ्यांस घालवून देऊन पश्चिम किनाऱ्यावर बंदरें व किल्ले बांधून तो एक स्वतंत्र राजाच बनला. एकदां सुंदर अरबी घोड्यांनीं भरलेलें जहाज सहज त्याला हस्तगत झालें. तेणेंकरून नवीन घोडेस्वारांची फौज त्यानें तयार केली. हिंदु, मुसलमान, डच, पोर्तुगीज, फ्रेंच इत्यादी अठरा पगड जातीचे लोक रक्तानें डागळलेल्या या चोराच्या निशाणाला मान देत. अर्थात असे लोक निष्ठुर व बेपर्वा असायचे. त्यांस बऱ्यावाईटाची चाड थोडीच असणार ?'

## विजयदुर्ग येथें इंग्रजांचा पराभव

मुंबईला असलेला इंग्रजांचा गव्हर्नर बून यानें आंगऱ्यांची खोड जिरविण्याचा निश्चय केला होता. तो इ. स. १७१५ त मुंबईत आला व त्यानें दोन

वर्षांत नऊ उत्कृष्ट लढाऊ जहाजें मुंबईच्या बंदरांत नवीन तयार केलीं. ब्रिटानिया, व्हिक्टरी ( विजय ), डिफेन्स ( संरक्षण ), रिव्हेंज ( सूड ), फेम ( कीर्ती ) हंटर ( चाबूक ), हंक ( ससा ), ईगल ( गरुड ) व प्रिन्सेस अमिलिया अशीं त्या जहाजांचीं नांवें होतीं. या सर्वांवर मिळून १४८ तोफा व १२५० लढाऊ खलाशी होते. याशिवाय जमिनीवरून लढण्यासाठीं अडीच हजार युरोपियन व दीड हजार एतद्देशीय एवढी फौज त्यानें तयार केली व १७ एप्रिल १७१७ रोजीं या आरमारानें आंगऱ्याच्या विजयदुर्ग किल्ल्यावर हल्ला केला व तो किल्ला हस्तगत करण्याचा कसून प्रयत्न केला. पण कान्होजी आंगऱ्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. इंग्रजांना मुटींत नाक घेऊन मुंबईला जावें लागलें. या लढाईत इंग्रजांचे २०० लोक मेले व ३०० जखमी झाले.

यानंतर यापेक्षां अधिक तयारी करून इंग्रजांनीं पोर्तुगीजांच्या मदतीनें खांदेरी व अलिबाग येथील कुलाबा किल्ल्यावर १७२१ मध्यें स्वारी केली. परन्तु या दोन्ही वेळींहि इंग्रजांचा पराभव झाला. नंतर कान्होजीचा मुलगा संभाजी यानेंहि वसईच्या स्वारींत चिमाजी आप्पाला चांगली मदत केली. राजाराम चंदीहून आल्यावर त्यानें कान्होजीस सरखेल हा किताब दिला. सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हीं त्यावेळीं सर्व आरमारी साहित्याचीं कोठारें असून कुलाबा हें आरमाराचें मुख्य ठाणें होतें.

संभाजी महाराजांच्या वेळीं कोंकण किनाऱ्यावरील हा भाग कान्होजी आंग्रे यांच्या ताब्यांत होता. परन्तु रायगड किल्ला मोंगलांनीं काबीज केला व संभाजीला ठार मारलें. या काळांत आंग्र्यांचेंहि फार नुकसान झालें. महाड, नागोठणें ( जिल्हा कुलाबा ) मंडणगड, सुवर्णदुर्ग महाल, अंजनवेल महाल, ( हल्लींचे मंडणगड, खेड. चिपळूण गुहागर तालुके ) जंजिऱ्याच्या सिद्दीनें आंगऱ्यांपासून हस्तगत केले होते.

## संभाजीला अटक

संगमेश्वरला सरदेसायांचा सध्यां एक वाडा आहे. या वाड्यांत छत्रपती संभाजी राजे. कलुषा कब्जीसह राहिले असतांना त्यांचेवर औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान यानें अचानक हल्ला करून त्यांना १ फेब्रुवारी १६८९ रोजीं अटक केली.

याबाबत अशी माहिती मिळते कीं त्यावेळीं रायगडावरून विशाळगडास जाण्याचा रस्ता संगमेश्वरावरून होता. तेव्हां संगमेश्वर हें ठिकाण पसंत पडल्यामुळें तेथें कब्जीनें राहण्यासाठीं इमारती वगैरे बांधल्या होत्या. आज त्यापैकीं तेथें कांहीं नाहीं. मात्र सरदेसायांचा वाडा अद्याप आहे. रायगडला जातांना त्या वेळीं संभाजीनें संगमेश्वरला मुक्काम केला होता. त्यावेळीं मुकर्रबखान कोल्हापूरला होता. त्याला ही बातमी समजतांच एक हजार स्वार व तीन हजार पायदळ घेऊन आंबाघाटानें तो आला व सरदेसायांच्या वाड्याला त्यानें वेढा दिला. त्या ठिकाणीं संभाजीजवळ असलेल्या थोड्याशा लोकांची व मोंगल सैन्याची चकमक झाली. कब्जी त्यांत जखमी झाला. मोंगलांचें सैनिक मुकर्रबखानासह वाड्यांत घुसले आणि त्यांनीं संभाजी व कब्जीला अटक करून नेलें.

छत्रपती शाहू गादीवर आल्यावर आंग्रे हे शाहूच्या पक्षास न मिळतां ताराबाईच्या पक्षाला मिळाले होते. त्यांना बाळाजी विश्वनाथ ( पेशवे ) यानीं शाहूच्या पक्षाकडे वळवून ' सरखेलीचें पद ' दिलें. हा प्रकार इ. स. १७१३ त घडला. नंतर जंजिऱ्याच्या सिद्दीचा टापू सोडला तर मुंबईपासून खारेपाटणपर्यंतचा मुलूख आंगऱ्यांकडे होता. मुंबईजवळ कुर्ल्यापर्यंत आंगऱ्यांची हद्द येऊन भिडली होती.

सुवर्णदुर्ग व अंजनवेल हे महाल जिंकावेत असें शाहूला वाटत होतें, त्यापेक्षां ब्रम्हेंद्रस्वामी यांची तशी इच्छा होती. त्यानीं शाहू, बाजीराव व आंगरे यांच्याशीं तसा आग्रह धरला होता. त्यावेळीं सिद्दी हा प्रबळ आहे व त्याला इंग्रजांची मदत असल्यामुळें हें काम आपल्याला एकट्याला जमणार नाहीं हें आंगरे जाणून होते. आंगरे याची सत्ता मजबूत होऊं नये म्हणून सिद्दीला मुंबईचे इंग्रज नेहमीं मदत करीत असत. इ. स. ७३३ ते ४५ च्या दरम्यान दोन तीन वेळां मराठ्यांच्या सिद्दीशीं लढाया झाल्या. पहिल्या वेळीं खुद्द बाजीराव पेशवे यानीं स्वारी केली व कांहीं प्रदेश जिंकला. नंतरच्या गोवळकोटा-वरील स्वारींत श्रीपतराव प्रतिनिधीहि होते. सखोजी आंगऱ्यांचा सरदार बंकाजी नाईक महाडिक यानें बाणकोट व मंडणगड हे किल्ले १७३३ सालीं काबीज केले. नंतरच्या १७३६ च्या स्वारींत अंजनवेल व गोवळकोट हे किल्ले मराठ्यांना जिंकतां आले नाहींत. पण सिद्दीला त्यांनीं जर्जर केलें. नंतर तुळोजी आंग्रे

यानें २३-१-१७४५ रोजीं अंजनवेल काबीज केला. गोवळकोट त्या सुमारास किंवा नंतर मराठ्यांनीं काबीज केला असावा. (बाणकोट किल्ला पिलाजी जाधवानें इ. स. १७३५ च्या दरम्यान काबीज केला असाहि एका ऐतिहासिक पत्रांत उल्लेख सांपडतो.)

विद्यमान रत्नागिरी जिल्ह्यांतील पूर्वींचे विभाग म्हणजे सुवर्णदुर्ग महाल (हल्लींचे मंडणगड, खेड, दापोली तालुके), अंजनवेल महाल (हल्लींचा चिपळूणचा कांही भाग व गुहागर तालुका) रत्नागिरी महाल (रत्नागिरी, संगमेश्वर तालुके व लांजे पेटा) व विजयदुर्ग महाल (हल्लींचे देवगड, राजापूर तालुके व कणकवली पेटा) एवढा प्रदेश शाहूच्या अधिपत्याखालीं आंगऱ्यांकडे, मालवण तालुका व वेंगुर्ला पेटा हा भाग कोल्हापूरकर छत्रपतींच्या ताब्यांत व सध्यांचा सावंतवाडी तालुका व कुडाळ पेटा हा भाग वाडीकर सावंत यांच्या ताब्यांत होता.

## ब्रह्मेंद्रस्वामी

परशुराम हें चिपळूणपासून उत्तरेकडे दोन मैलांवर देवस्थान असून तें या भागांतील मोठें देवस्थान मानलें जातें. येथें ब्रह्मेंद्र स्वामी १६९८ पासून उदयास आले त्यांना बाळाजी विश्वनाथ पेशवे, नंतर बाजीराव, चिमाजी अप्पा, आंगरे, प्रतिनिधी, आणि खुद्द शाहू हे पूज्य मानीत असत. जवळजवळ गुरु शिष्यांचें त्यांचें नातें होतें, इतकेंच नव्हे तर जंजिऱ्याचा अधिकारी सिद्दी रसुल याकूदखान हाहि स्वामींना अत्यंत मान देत असे. त्यानें परशुरामजवळील पेढें व आंबडस हे गांव स्वामींच्या देवस्थानाला नाम दिले होते. धामणी नांवाचा गांव छत्रपती राजाराम यानें इनाम दिला होता. परशुराम पंतप्रतिनिधीनें डोरलें व महाळुंगे हे गांव आणि शाहूनें धावडशी (देशावर) हे गांव स्वामींना इनाम दिलेले होते. याशिवाय आंग्रे व पेशवे यांनींहि त्यांना गांव इनाम दिलेले असावेत. हे स्वामी सावकारीचा धंदा करीत. त्यांचें बाजीरावावर चांगलें प्रेम होतें. त्यानीं बाजीरावाला आर्थिक मदतही बरीच केली होती.

## हत्तीचें प्रकरण

इ. स. १७२६ च्या सुमारास ब्रह्मेंद्र स्वामी कर्नाटकांत गेले होते. तेथें सावनूरच्या नबाबानें जंजिऱ्याच्या सिद्दी साताला एक हत्ती दिला. तो हत्ती कोंकणांत आणण्याची कामगिरी त्यानें स्वामींवर सोंपवली. स्वामींनीं ती

मान्य केली. त्यावेळीं ज्या प्रदेशांतून माल, जनावरें, फौज न्यावयाची तेथील राजांच्या अधिकाऱ्यांचे परवाने लागत. हा हत्ती विशाळगड मार्गानें संगमेश्वर पर्यंत आणण्यांत आला. वाटेंत कोल्हापूरचा प्रतिनिधी व संभाजी यांचा मुलुख लागतो. त्या दोघांकडूनही त्यानीं परवाने घेतले. नंतर संगमेश्वरवरून माखजन येथें हत्ती येतांच माखजनच्या चौकीवरील आंगऱ्याच्या लोकांनीं अटकाव केला व तो हत्ती पडावांतून जयगडला पाठविला. कान्होजी आंगरे स्वामींचा शिष्य असल्यामुळें त्याच्या परवान्याची गरज त्यांना वाटली नव्हती. आपला हत्ती आंगऱ्याच्या लोकांनीं नेला हें ऐकून सिद्दी सात खवळला आणि जबरदस्तीनें हत्ती आणण्यासाठीं कांहीं फौज अंजनवेलहून जयगडकडे त्यानें रवाना केली. त्या लोकांना आंगऱ्याच्या लोकांनीं हांकून दिलें. माखजनच्या चौकीवर हत्तीला अटक झाल्याचें स्वामींना कळतांच त्यांनीं कान्होजी आंगऱ्याला पत्र लिहिलें. कान्होजीनें लगेच जयगडला पत्र पाठवून हत्ती सोडून दिला. इकडे हत्ती घेतल्याशिवाय लोक परत आले म्हणून सिद्दी सात जास्त चिडला व हें कृत्य स्वामींच्या मसलतीनें घडलें असा बहाणा करून त्यानें स्वामींच्या परशुराम देवालयावर स्वारी करून इ. स. १७२७ मध्यें शिवरात्रीच्या दिवशीं त्या पवित्र स्थानाचा विध्वंस केला, देवालयाची व ब्राम्हणांची संपत्ति लुटली, अनेकांना मारहाण केली. हा प्रकार पाहून स्वामींना अत्यंत दुःख झालें. स्वामींनी जयगडाहून चिपळूणाजवळ गोवळकोट येथें हत्ती आणला व सिद्दीसातला निरोप पाठवून तो त्याच्या स्वाधीन केला.

त्यानंतर स्वामींनीं तेथें न रहाण्याचें ठरविलें. त्यावेळीं जंजिऱ्याचा मुख्य कारभारी सिद्दी रसूल यानें स्वामींना तेथून न जाण्याविषयीं विनविलें. त्यांना आणखी दोन गांवें इनाम देऊं केलीं. आंगऱ्यांनीं पण तेथें रहाण्याचा स्वामींना आग्रह केला. पण स्वामी कोणाचें न ऐकतां इ. स. १७२८ पासून धावडशी येथें राहूं लागले. धावडशी येथें गेल्यावर त्यानीं गोवळकोट व अंजनवेल हे किल्ले जिंकण्यासाठीं शाहू, आंगरे व पेशव्यांजवळ आग्रह धरला व त्याप्रमाणें मराठ्यांनीं सिद्दीवर स्वाऱ्या केल्या हें मागें आलेंच आहे. एकंदरींत बऱ्याच घडामोडी होण्यास व लढाया होण्यास हें हत्तीचें प्रकरण बऱ्याच प्रमाणांत कारणीभूत आहे.

यावेळीं सिद्दी सातनें पर्शुरामाचें देवालय पाडलें होतें तें जंजिऱ्याच्या सिद्दीनें पुन्हां बांधून दिलें असेंहि म्हणतात.

## आंगऱ्यांचा गृहकलह

कान्होजीचे मुलगे संभाजी, मानाजी यांच्यांत तंटा लागला होता व तो अखेरपर्यंत मिटला नाहीं. मानाजीची बाजू पेशव्यांनीं घेतली होती. संभाजी इ. स. १७४१ त मरण पावला. पण त्याचा दुसरा एक सावत्र भाऊ तुळाजी व मानाजी यांचा तंटा चालूच होता. मानाजीला शाहूनें 'वजीरतमाब' हा किताब देऊन कुलाब्याचा अधिकार दिला व तुळाजीला सरखेल हा किताब देऊन सुवर्णदुर्ग ते दक्षिण कोंकणची हद्द दिली. अंजनवेल किल्ला घेईल त्याला सरखेल हें पद देऊं अशी शाहूनें अट घातली होती व त्याप्रमाणें अंजनवेल सिद्दी-जवळून तुळाजीनें जिंकला व सरखेलपद मिळविलें असाहि इतिहासांत उल्लेख दिसतो.

शाहूनें नानासाहेब पेशव्याला कायमचे जादा अधिकार दिले. तेव्हांपासून पेशवे मराठी राज्याचे मुख्य सूत्रधार झाले. परंतु त्यांना तुळोजी आंगरे मानीत नसे. तुळाजीचा दरारा फार होता व तो शूरहि होता यांत शंका नाहीं.

इंग्रज आंगऱ्यांवर जळत होते. ते आंगऱ्यांचें वर्चस्व कमी करण्यासाठीं संधीच पहात होते. अशा परिस्थितींत नानासाहेब पेशव्यानें आंगऱ्यांवर स्वारी करण्याचें ठरविलें. परंतु आंगरे बलाढ्य असून त्यांची समुद्रांत जोरदार शक्ति आहे हें पेशवा जाणून होता व त्यानें इंग्रजांची याबाबत मदत घेण्याचें ठरविलें. रामाजी महादेव बिवलकर कोंकणच्या सुभ्यावर सरसुभेदार होता व त्याचेवर नाना-साहेबाचा विश्वास होता. तो कल्याण येथें रहात असे. त्याच्या मदतीनें इंग्रजांशीं करार झाला. ( आंगऱ्यांचे कारभारी बिवलकर व रामाजीपंत हे निराळे. त्यांचा यांचा कांहीं संबंध नव्हता. ) याचवेळीं पेशव्यानीं सुवर्णदुर्ग व रत्नागिरी हे दोन्ही किल्ले तुळाजीजवळ मागितले तेव्हां मुईच्या अग्राइतकी मृत्तिकाही देणार नाहीं असें तुळाजीनें उत्तर दिल्यामुळें पेशवे जास्तच चिडले व त्यानीं इंग्रजांशीं संगन-मत करून आंगऱ्यांवर स्वारी करण्याचें ठरविलें. त्यावेळीं रिचर्ड बुर्शियर हा मुंब-ईचा गव्हर्नर होता. सुवर्णदुर्ग काबीज करण्यासंबंधीं पेशव्यांचा रामाजीपंत व बुर्शियर यांच्यांत पुढीलप्रमाणें तह ठरला—

(१) सर्व आरमार इंग्रजांच्या ताब्यांत असावें, परन्तु कारभार उभयतांच्या संमतीनें व्हावा. (२) तुळाजी आंगऱ्याकडून जीं जहाजें मिळतील तीं इंग्रज व मराठ्यांनीं निम्मेनिम्मी घ्यावीं. (३) बाणकोट व हिंमतगड आणि नदीच्या दक्षिण कांठावरील पांच गांवें इंग्रजांना मराठ्यांनीं द्यावीं. (४) आंगऱ्यांच्या किल्ल्यांत जें द्रव्य दारुगोळा, तोफा सांपडतील तें सर्व मराठ्यांना द्यावें, या प्रमुख अटी होत्या.

## सुवर्णदुर्ग काबीज

कमांडर वुल्यम जेम्स याच्या नेतृत्वाखालीं इंग्रजांचें आरमार सुवर्ण दुर्गावर २२ मार्च १७५५ ला आलें व पेशव्यांची फौज समशेर बहाद्दर ( पहिल्या बाजीरावाचा मस्तानीपासून झालेला मुलगा ) व दिनकर पंत यांच्या आधिपत्याखालीं किनाऱ्यावरून आली. त्यांनीं जमिनीवरून मारा केला. या स्वारींत इंग्रज आरमाराबरोबर मराठ्यांचें आरमार घेऊन आरमाराचा मुख्य नानापंत व त्याचेबरोबर रामाजी महादेव होता. ३ एप्रिल १७५५ रोजीं किल्ला ताब्यांत आला. मध्यंतरी बऱ्याच चकमकी झाल्या. या किल्ल्याचें वर्णन जेम्सनें मुंबईला गव्हर्नरला पाठविलेल्या पत्रांत केलें आहे कीं, ' सुवर्णदुर्ग आपणांस वाटला त्यापेक्षां बळकट आहे. त्याच्या तटाला ४ फूट लांबीरुंदीचे दगड आहेत. आमच्या तोफांचे गोळे दगडावर आपटून ठिकऱ्या होऊन खालीं पडत पण दगडास भंग होत नसे. १२५ वर तोफा किल्ल्यांत आहेत. लोकवस्ती दाट आहे .. आमचे एकंदर सातशें नव्वद गोळे व चाळीस दारूची पिंपें खर्च झालीं. सकाळीं ९ ते १२ पर्यंत तोफांचा मारा चालू होता. '

यावेळीं आंगरे यांच्या जहाजांचा इंग्रजांनीं जयगडपर्यंत पाठलाग केला, पण तीं त्यांच्या हातीं लागलीं नाहींत.

सुवर्णदुर्ग घेतल्यानंतर तावडतोब दुसरे सहा किल्ले पेशव्यांनीं काबीज केले. अंजनवेल किल्ला रामाजी पंतानें काबीज केला. रत्नागिरीच्या किल्ल्यास समशेर बहाद्दरानें वेढा घालून तो किल्ला त्यानें जिंकला. त्यावेळीं इंग्रज आरमार पावसाळा जवळ आला असें सांगून परत मुंबईला गेलें. त्या आरमाराला मुंबईला येण्याचा निरोप आला होता. पेशव्याचे मनांत याचवेळीं विजयदुर्ग जिंकावयाचा होता, पण तें जमलें नाहीं. तें काम पुढील वर्षावर गेलें.

# विजयदुर्गावर स्वारी

इंग्रजांचें मद्रास येथील आरमार वॉटसन व कर्नल क्लाईव्ह यांच्या हाताखालीं देऊन त्यांना विजयदुर्गावर पाठविण्यांत आलें. ते ७ फेब्रुवारी १७५६ ला निघून ११ फेब्रुवारीला विजयदुर्ग बंदरांत दाखल झाले व १३ फेब्रुवारीला विजयदुर्ग किल्ला त्यांनीं ताब्यांत घेतला.

लढाईपूर्वी नोव्हेंबर १७५५ पासून खंडोजी माणकर याच्या हाताखालीं पेशव्यांची फौज आंगऱ्यांच्या मुलखांत शिरून रामाजीपंतांच्या सल्ल्यानें प्रदेश काबीज करीत होती. डिसेंबर, जानेवारी १७५६ पर्यंत विजयदुर्ग किल्ल्याखेरीज सर्व प्रदेश या फौजेनें काबीज केला.

याच दरम्यान इंग्रजांचें जहाज विजयदुर्ग बंदरांत आल्याचें तुळाजीनें दुर्बिणीनें पाहिलें. त्यानें त्या जहाजाचा पाठलाग केला पण तें हातीं लागलें नाहीं. या जहाजांत सर विल्यम ह्यूएट (वॉटसनचा विश्वासू मदतनीस) होता. तो विजयदुर्गाची पहाणी करून गेला.

आपला प्रदेश पेशव्यांच्या फौजेनें जिंकला असून समोर इंग्रजांचें आरमार येत आहे हें दुहेरी संकट ओळखून तुळाजी आंग्रे रामाजी पंतांकडे येऊन पेशव्यांशीं गोडी करण्याची खटपट करूं लागला होता, ही गोष्ट इंग्रजांच्या लक्षांत आली. ही गोडी झाली तर विजयदुर्गचा लाभ आपल्या हातून जाईल ही भीति त्यांस होती. शिवाय 'तुळाजी जिवंत सांपडला तर त्याला मुंबईस आणावा. पेशव्यांच्या ताब्यांत देऊं नये,' असा गव्हर्नरचा वॉटसन व क्लाईव्हला हुकूम होता. बाणकोट–हिंमतगड मागच्या वर्षी पेशव्यानीं इंग्रजांना दिले पण त्या प्रदेशाची हद्द ठरलेली नव्हती. ती ठरवून मिळाल्याशिवाय विजयदुर्ग पेशव्यांच्या ताब्यांत देऊं नये असाहि त्यांना हुकूम होता.

मराठ्यानीं विचारल्याशिवाय परस्पर तुळाजीजवळ बोलणीं सुरूं केलीं हा करारभंग आहे असें निमित्त करून इंग्रजांनीं विजयदूर्गला वेढा दिला. वॉटसननें समुद्रांतून व क्लाईव्हनें जमिनीवरून मारा सुरू केला. सदर वेढा उठविण्यासाठीं रामाजी पंतानें पुष्कळ प्रयत्न केले पण त्याला यश आलें नाहीं. इंग्रजांना किल्ल्यांत दहा लक्षांची मालमत्ता मिळाली, ती त्यांनी एकट्यानींच स्वाहा केली. हा इंग्रजांचा मराठ्यांच्या व्यवहारांत प्रथम प्रवेश होय.

या लढाईच्या वेळीं पेशव्यांची १० हजार फौज किनाऱ्यावर व ४०-५० जहाजें इंग्रजांच्या आरमाराबरोबर होतीं. इंग्रजांच्या आरमारावर सातशें युरोपियन, तीनशें गोलंदाज व तीस एतद्देशीय फौज होती.

१३ तारखेला किल्ला सर झाला. नंतर १५ तारखेला रामाजीपंत किल्ल्यावर गेला व इंग्रजांच्या निशाणाबरोबर तथें पेशव्यांचें निशाण लावावें व आपली फौज किल्ल्यांत घ्यावी असें त्यानें वॉटसनला सांगितलें. निशाण लावण्याचें वॉटसननें कबूल केलें पण फौजा किल्ल्यांत घेण्यास तो तयार होईना. 'तुम्ही तुळाजीशीं संधान ठेवून आमचा करार मोडलात, लढाईला मदत केली नाहीं,' असा त्यानें रामाजीपंतास जबाब दिला. फौज किल्ल्यांत घेण्यासाठीं रामाजीपंतानें लांच देण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाहीं.

## तुळोजी स्वाधीन झाला

पेशव्यांच्या फौजेवर खंडोजी माणकर हा मुख्य सरदार होता. त्याच्या स्वाधीन तुळाजी झाला. त्यावेळीं तुळोजीला आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं इंग्रजांनीं हरतऱ्हा केल्या पण तो त्यांचा बेत सिद्धीस गेला नाहीं. मुंबईचा प्रेसिडेंट म्हणूं लागला कीं, विजयदुर्ग आम्हांस द्या व बाणकोट तुम्ही घ्या म्हणजे तुळोजी तुम्हीं ताब्यांत ठेवला तरी चालेल. असें सांगून विजयदुर्ग किल्ला ते पेशव्यांस देईनात. विजयदुर्ग किल्ला आपल्या हातांत रहावा म्हणून रामाजीपंतानें पांच हजार रुपयांचें बक्षीस देऊ केलें होतें पण इंग्रज अधिकाऱ्यानें तें मान्य केलें नाहीं, हें नानासाहेब पेशव्यांना सहन झालें नाहीं.

इंग्रज म्हणत, विजयदुर्ग किल्ला पोर्तुगीजांवर दाब ठेवण्यास आम्हांस उपयोगी आहे. त्यावर नानासाहेब पेशव्यानें इंग्रजांना सणसणीत पत्र पाठविलें कीं, 'आंगऱ्यांशीं आम्ही युद्ध केलें तें विजयदुर्ग घेण्याकरीतां. तोच किल्ला तुम्हास दिला तर लोक काय म्हणतील ?' (११ जुलई १७५६)

यानंतर टॉमस वायफिल्ड व जॉन स्पेन्सर हे दोन इंग्रजांचे वकील पुण्यास आले व त्यांच पेशव्यांशीं बोलणीं होऊन १२ ऑक्टोबर १७५६ रोजी १८ कलमांचा ठराव त्यांच्यात झाला. त्याचा मतितार्थ असा कीं. स्पेन्सर पुण्याहून निघाल्यापासून २४ दिवसांनीं विजयदुर्ग पेशव्यांच्या ताब्यांत द्यावा, बाणकोट वगैरे दहा गांवें इंग्रजांस पेशव्यांनीं द्यावीं तुळाजीला घाटाचे खालीं मुलूख वगैरे

देऊं नये, इंग्रजांकडून पूर्वी ठरल्यापेक्षां अधिक जकात घेऊं नये. नंतर ठरल्याप्रमाणें विजयदुर्ग पेशव्यांच्या ताब्यांत आला.

तुळोजी आंगरे १७६९ पर्यंत विसापूर, नगर, चाकण, दौलताबाद इत्यादि ठिकाणीं पेशव्यांच्या कैदेंत होता. त्याच्या बायका व मुलगे बरोबर असत. १७६९ मध्यें तो सोलापूर किल्ल्यांत वारला. त्याचे दोन मुलगे पळून मुंबईला आले. त्यांचा प्रतिपाळ इंग्रजांनीं केला असें ग्रँट डफ म्हणतो.

विजयदुर्ग किल्ल्यांत ८ इंग्रज, दोन स्कॉट, तीन डच तुळोजीनें कैदेत ठेवलेले वॉटसनला आढळले. त्यांची त्यावेळीं सुटका करण्यांत आली.

तुळोजीनें कैदेंत असतांना फंदफितुरीचे प्रयत्न केले असें म्हणतात.

१७६१ त निजाम पुण्यावर चालून आला त्यावेळीं पेशव्यांनीं इंग्रजांचीं मदत मागितली तेव्हां त्यांनीं ज्या अटी घातल्या त्यावरून व जंजिऱ्यावर पेशव्यांनीं स्वारी केली त्यावेळीं त्यानीं जंजिऱ्याच्या सिद्दीला मदत केली, इत्यादि प्रकारावरून इंग्रजांचे डाव नानासाहेब पेशव्यांच्या व सदाशिवरावभाऊंच्या ध्यानांत आले होते. फ्रेंचांची मदत घेऊन पोर्तुगीज, इंग्रज या सर्वांना हाकलून द्यावें असें पेशव्यांना वाटत होतें. परंतु तेवढ्यांत पानपतचा प्रसंग आला व अब्दालीचा समाचार घेतल्यावर इकडे पाहूं असें त्यांनीं ठरविलें. पण पानपतास महाराष्ट्राची पिढीच कापली गेली. त्यामुळें सारेंच पारडें उलटें फिरलें व सर्व बेत मनांत राहिले. इंग्रजांवर चरफडण्याखेरीज आतां मार्ग नव्हता.

वसई व साष्टी प्रयत्न करून मिळत नाहीं असें पाहून इंग्रजांनीं मालवण जवळच्या सिंधुदुर्ग या कोल्हापूरच्या छत्रपतींच्या किल्ल्यावर इ. स. १७६५ मध्यें अचानक हल्ला केला व तो किल्ला काबीज केला. त्याचें ‘ फोर्ट ऑगस्ट ’ असें नांव त्यांनीं ठेवलें.

सावंतवाडीच्या सावंतावर इंग्रजांनीं जबरदस्ती चालविली. मालवणापासून रांगण्यापावेतों मुलूख द्यावा, सर्व गलबतें द्यावीं, अशी सावंताकडे इंग्रजांनीं मागणी केली. ती सावंतानीं नाकारल्यावर त्यांनीं सावंत यांचा रेडी येथील किल्ला यशवंतगड हल्ला करून हस्तगत केला, त्यामुळें छत्रपती कोल्हापूरकर व सावंत चिडून गेले. यावेळीं पेशव्यांचें प्रत्यक्ष नुकसान झालेलें नसलें तरी त्यांना शह बसल्यामुळें त्यांच्याहि ही गोष्ट लक्षांत आली.

## धुळप

तुळोजी आंगऱ्याचा पाडाव करण्यापूर्वीं नानासाहेब पेशव्यानें शाहू हयात असतांनाच सुभा आरमार म्हणून स्वतंत्र आरमार तयार केलें होतें. त्याचेवर बाजीराव बेकरी नांवाचा मनुष्य प्रमुख होता.तो इ.स. १७४९ सालीं मरण पावल्या-नंतर त्याचा मुलगा कांहीं दिवस त्याचे जागीं होता. परंतु नंतर त्या अधिकारावर धुळपांची नेमणूक झाली. तुळोजी आंगरे यांस १७५६ मध्यें कैद केल्यावर किंवा पूर्वीं धुळपांची नेमणूक आहे.पुढें १७६३ सालीं आनंदराव धुळपांची नेमणूक झाली. १७६४ त आरमाराचा खर्च थोरले माधवराव पेशव्यानीं आनंदरावास बांधून दिला. १७६७ त चांगल्या कामगिरीबद्दल माधवरावानीं बक्षीसेंहि धुळपांना दिलीं. इ. स. १७६३ त हैदरावरील स्वारींत रुद्राजी धुळप, जानोजी धुळप यांनीं होनावर बंदरांत आरमार नेऊन व हैदराच्या प्रदेशावर हल्ला करून माधवरावाला महत्वाची मदत केली. जानोजी धुळपावर माधवरावाचा फार विश्वास होता.

धुळपांचें विजयदुर्ग येथें मोठें ठाणें होतें. इ. स. १७७३ च्या जानेवारींत इंग्रजांनीं या धुळपांच्या आरमारावर विजयदुर्ग येथें हल्ला केला. त्यावेळीं पेशव्यांनीं सरसुभा–त्रिंबक विनायक यास धुळपांच्या मदतीस पाठविला. गारद्यांची फौज त्याच्या बरोबर दिली, शिवाय पांच गलबतें दिलीं. कृष्णाजी धुळप व त्रिंबक विना-यक या दोघांनीं रत्नागिरी ते विजयदुर्गच्या दरम्यान इंग्रजांना गांठून त्यांचेशीं सामना केला व त्यांना पिटाळून लावलें. अद्याप विजयदुर्गच्या आसपास धुळप घराण्यांतील इनामदार आहेत.

रत्नागिरी येथील किल्ला बावडेकर अमात्यांच्या ताब्यांत होता तो तुळोजी आंगऱ्यानें हस्तगत केला होता. तुळोजीवर पेशव्यांनीं स्वारी केली त्यावेळीं तुळोजीचा पराभव होऊन तो पेशव्यांच्या ताब्यांत आला होता. इ. स. १७७६ सालीं रत्नागिरी येथें रामचंद्र नाईक परांजपे हा पेशव्यांचा आप्त मामलेदार होता. तो त्या भागांत श्रीमान सावकार होता.

## तोतयाचें बंड

पानपतच्या युद्धांत सदाशिवराव भाऊ मृत्यु पावले. नंतर त्यांचे नांव धारण करून एक तोतया थोरल्या माधवराव पेशव्यांच्या वेळीं निर्माण झाला होता. त्याला नाना फडणिसांनीं रत्नागिरीच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें होतें.

त्यानें इ. स. १७७६ च्या जून ते सप्टेंबर या काळांत कोंकणांत धुमाकूळ उडविला होता. तोतयाचें प्रकरण कोंकणांतहि बरेंच गाजलें होतें.

मामलेदार रामचंद्र नाईक परांजपे हा त्या तोतयाला सामील झाला व या संधींत आपणांस पैसा मिळवितां येईल, या दृष्टीनें त्यानें तोतयाची सुटका केली. यावेळीं पेशव्यांच्या फौजा चोहोंकडे गुंतलेल्या होत्या. त्यामुळें रामचंद्र नाईक परांजपे यांनीं तोतया हे खरे भाऊसाहेब आहेत असें सांगून त्यांच्या नांवाची चोहोंकडे द्वाही फिरविली. हां हां म्हणतां चोहोंकडे ही बातमी पसरली व अनेक शिलेदार, बारगीर तोतयाला येऊन मिळाले. पेशव्यांचें आरमारहि तोतयाला सामील झालें. तोतयानें ताबडतोब देवरुखचें ठाणें हस्तगत केलें. नंतर इतर ठिकाणेंहि त्याच्या ताब्यांत येऊं लागलीं. अवघ्या चार महिन्यांत त्यानें विजयदुर्ग ते उत्तरेस–बोरघाटापर्यंत प्रदेश हस्तगत केला. बोरघाटवर चढून राजमाचीपर्यंत तोतयाच्या चौक्या बसल्या व तो पुण्यावर चाल करण्याच्या गोष्टी करूं लागला.

या तोतयाचा निकाल लावण्याचा प्रश्न मोठा बिकट झाला होता. खुद्द पेशव्यांची कांही मंडळी तोतयाच्या बाजूची झाली होती. व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर, पार्वतीबाईचा भाऊ लक्ष्मण कृष्ण कोल्हटकर, चुलत। रघुनाथराव कोल्हटकर, गंगाबाईचा मामा नारो शंकर हे तोतयाला वश झाले होते.

लक्ष्मण कृष्ण कोल्हटकर यांना तर या तोतयाच्या प्रकरणांत कुलाबा येथें कैदेंत ठेवण्यांत आलें होतें. तोतयाचें बंड संपल्यावर त्यांची सुटका झाली. खुद्द पार्वतीबाईलाही हा आपला नवरा नसेल कशावरून असा संभ्रम निर्माण झाला होता.

नाना फडणिसांनीं भिवराव पानसे यांना सहा हजार फौज देऊन तोतयावर पाठविलें. त्यांच्या चार पांच लढाया होऊन तोतयाचा जोर बराच कमी झाला. नंतर महादजी शिंदे पानश्यांच्या मदतीला आले व एक मोठी लढाई होऊन तोतयाचा पराभव झाला व त्याच्या फौजेची दाणादाण झाली. त्यामुळें तो जहाजानें मुंबईला इंग्रजांकडे पळून जात होता. त्याला रघोजी आंग्र्यानें पकडून पुण्यास रवाना केलें.

पेशव्यांचा जोर कमी करण्यासाठीं हैदर व इंग्रजांनींहि तोतयाला मदत देण्याची तयारी दाखविली होती, परंतु त्यांचा हेतु साध्य झाला नाहीं.

पुण्याला आल्यावर तोतयाची चौकशी झाली. त्या तोतयानें आपण कनोजी ब्राह्मण, आपलें नांव सुखलाल, बापाचें नांव महानंदा, आईचें नांव अन्नपूर्णा वगैरे माहिती सांगितली. सदर इसम तोतयाच असल्याचें खात्रीत झाल्यावर लोकांची खात्री पटावी म्हणून त्याला गाड्यावर घालून बाजारांतून फिरविण्यांत आलें व सर्व लोकांचा संशय दूर करण्यांत आला. नंतर १८ डिसेंबर रोजीं त्याला उंटावरून फिरविण्यांत येऊन त्याच दिवशीं चार घटका दिवसा मेखसूनें डोकें फोडून ठार मारण्यांत आलें.

तोतयाचा अशाप्रकारें निकाल लागल्यावर तोतयाच्या बंडांत सामील झालेल्यांचा समाचार घेण्यांत येऊं लागला. बंडखोर ब्राह्मण असले तरी त्यांस दया न दाखविण्याचे हुकूम होते. व्यंकटराव घोरपडे हे बाळाजी विश्वनाथाचे पणतु. परंतु त्यांचेकडून या बंडांत सामील झाल्यामुळें एक सालीं ६० हजार रुपये व गुन्हेगारीबद्दल सव्वा लक्ष रुपये दंड नानांनीं वसूल केला.

रामचंद्र नाईक मामलेदाराची परिस्थिती काय झाली त्याचें वर्णन करतां येत नाहीं. त्याची सर्व मालमत्ता सरकारजमा होऊन कुटुंबांतील मुलांमाणसांसह सर्वांच्या पायांत बिड्या पडल्या. ज्यांचा तोतयाशीं संबंध होता त्या सर्वांना त्यांच्या गुन्ह्याच्या प्रमाणांत प्रायश्चित मिळालें. कोणींहि त्यांतून सुटला नाहीं.

## बावडेकर अमात्य

बावडेकर अमात्यांचा कोंकणांत छत्रपती राजाराम महाराजांच्या वेळेपासून संबंध दिसतो.

रामचंद्रपंत अमात्य यांची पहिली बायको जानकीबाई ही पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांची मुलगी. हिच्या नांवानें रामचंद्रपंतांच्या कामगिरीबद्दल ' मुरबाड ता. संगमेश्वर ' हा गांव छत्रपती राजाराममहाराज यांनीं इनाम दिला होता व रामचंद्र पंताची मुलगी ठकूबाई हिला दूधभातासाठीं मौजे कडवे, ता. संगमेश्वर हा गांव इनाम दिल्याचा उल्लेख आहे. संगमेश्वर तालुक्यांत हल्लीं बुरंबाड व बुरंबाड पासून पांचसहा मैलावर कदवई म्हणून गांव आहे. वर निर्दिष्ट केलेल्या

मुरबाड व कडवे याच गांवांना हल्लीं अनुक्रमें बुरंबाड व कढवई ही नावें आहेत. रामचंद्र पंताच्या आईचें वृन्दावन. देवरुख येथें आहे. हा गांव अन्नछत्रासाठीं शिवाजीनें ( राजारामाचा मुलगा ) पंतांना इनाम दिला. रामचंद्रपंत वृद्धापकाळीं विजयदुर्ग येथें आपला मुलगा शिवरामपंडित याचेजवळ रहात असत. कुणकेश्वर येथें त्यांचें देहावसान झालें.

रामचंद्रपंत व त्याचे चिरंजीव आणि आंगरे यांचे मैत्रीचे संबंध होते. रामचंद्रपंताचे दुसरे चिरंजीव मोरेश्वर रामचंद्र हे सिंधुदुर्गावर सबनीस होते. ( इ. स. १७१५ )

मुरबाड, कढवईखेरीज पुढील ३८ गांवें ( कोंकणांत ) अमात्याकडे होतीं. नादगांव, निवळी, पालवण, अडरें, गोवळ, ( ता. चिपळूण ) तुरळ, कळंबुशी, सरंद, कळंबस्ते, कुरधुंडे, ( ता. संगमेश्वर ), आडिवरें, नाटें, गोठणें, दोनिवडें, कसेली, गोळप, कोलंबे, कसबा प्रभावळी, कसबा नेवरें, पुसाळें, कोतवडें, कसबा, देवरुख, मुरादपूर, सोमेश्वर, असोंदे, निवसर, केळें, माजगांव, तिथवली, दिगस, हरचें, भडे, खावडी, गव्हाणे, डोंगर, कलंबोली, आंगले, मोरोसी.

## सावंतवाडी

सध्यां सावंतवाडी तालुका नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भागावरहि चालुक्य, यादव, विजयनगरचे राजे यांची सत्ता होती. नंतर विजापूरच्या आदिलशाहीची सत्ता सोळाव्या शतकांत होती. सोळाव्या शतकांत मांग सावंत यानें तेथें आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाहीं. पुढें खेम सावंत, लखम सावंत व सोम सावंत यांनीं या प्रांतावर सत्ता प्रस्थापित करण्याचें काम १७ व्या शतकांत केलें. त्यांचा प्रदेश सह्याद्रीच्या पूर्वेस चन्दगड, पश्चिमेस सध्यांचा वेंगुर्ले पेटा हा होता. मध्यंतरी शिवाजी महाराजांनीं वाडीच्या सावंताची भेट घेतली व कणकवली, मालवणपर्यंत प्रदेश काबीज केला. त्यावेळीं भेट म्हणून सावंत यांनीं शिवाजी महाराजांना एक तलवार दिली. तीच भवानी तलवार म्हणून प्रसिद्ध आहे असें म्हणतात.

इ. स. १७५५ मध्यें ब्रिटिशांनीं हल्ला करून यशवंतगड (रेडीचा किल्ला) काबीज केला. त्याचवेळीं सध्यांचा वेंगुर्ले पेटा हा सावंताचा भाग ब्रिटीशांच्या ताब्यांत गेला.

सावंतवाडीचे सावंत हे अत्यंत शूर होते. त्यांचे पोर्तुगीज, आंग्रे, कोल्हापूरकर यांच्याशीं कांहींना कांहीं कारणावरून तंटे निर्माण होत असत व त्यांना त्यांचेशीं सामना द्यावा लागत असे. अनेकांशीं झगडून त्यांनीं आपलें छोटें राज्य टिकविलें होतें. त्यांचें राज्य लहान असल्यामुळें त्यांचेवर हल्लाहि आजूबाजूचे प्रबळ राजे करीत. परंतु शत्रूंना त्यांनीं चांगलेंच पाणी अखेरपर्यंत दाखविलें. इ. स. १७५५ नंतर सध्यांचा सावंतवाडी ( कुडाळ पेटा धरून ) तालुका आहे तेवढेंच सावंतांचें राज्य होतें. इ. स. १८१८ मध्यें पेशव्यांना जिंकल्यावर ब्रिटीशांनीं सावंतवाडी जिंकून तें संस्थान केलें. हें संस्थान म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत होतें. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतांतील सर्व संस्थानें विलीन झालीं त्यावेळीं हेंहि संस्थान विलीन करण्यांत आलें.

मराठ्यांच्या अमदानींत कोंकणकडे पाहिल्यास असें दिसून येतें कीं शिवाजी मूळचा रहाणारा देशावरचा व विशेष हालचाली त्याच्या देशावर असूनहि त्यानें कोंकणकडे अधिक लक्ष पुरविलें. या उलट पेशवे मूळचे कोंकणांतले होते, त्यांना कोंकणाबद्दल प्रेम वाटत होतें. त्यांचें मूळ गांव जंजिऱ्याच्या सिद्दीच्या राज्यांत राहूं नये म्हणून सर्व पेशव्यांनीं तें जिंकण्याचा प्रयत्न केला, पण तें साध्य झालें नाहीं. सिद्दीला जिंकण्याचे संभाजी व पेशव्यांनीं प्रयत्न केले ते व्यर्थ गेले. पेशव्यांच्या वेळीं तर इंग्रज सिद्दीला दोस्त म्हणून मदत करीत. सिद्दी जिंकला गेला तर मराठ्यांचें वर्चस्व अधिक वाढेल म्हणून इंग्रज ही दक्षता घेत असत.

शिवाजी महाराजांनीं स्वराज्य स्थापलें तेव्हां त्यांचा प्रदेश लहान असून त्यावेळीं ताब्यांत असलेल्या प्रदेशाच्या सरहद्दी विजापूरकर, सिद्दी, मोगल यांच्याशीं मुत्सद्देगिरीनें तोंड देऊन कशा मजबूत करतां येतील. याकडे व कोणता शत्रू आपल्या प्रदेशावर केव्हां स्वारी करील याचा नेम नसल्यामुळें ताब्यांतील प्रदेशाचा चांगला बंदोबस्त करण्याकडे त्यांचें लक्ष केंद्रित झालें होतें. शिवाय त्यावेळीं राजधानी रायगड असल्यामुळें ( रायगड कोंकण व देश यांच्या हद्दीवर आहे. ) कोंकण व देश या दोन्हीं भागांतून सैन्यांचें दळणवळण चालत असे. याशिवाय इंग्रज, सिद्दी, पोर्तुगीज यांची बरोबर कल्पना शिवाजी महाराजांना आली असावी म्हणून त्यांनीं देशाइतकेंच कोंकणकडेहि लक्ष पुरविलें.

पेशव्यांच्या वेळीं राज्याचा व्याप वाढला, दिल्ली हातांत येण्याचीं चिन्हें

दिसूं लागलीं व अखेर दिल्ली हातांत आली. परंतु त्याचबरोबर राज्यांतील प्रश्न वाढले. विशेषतः उत्तरेंतील मोहिमावर त्यांना अधिक लक्ष द्यावें लागलें, दक्षिणेंत हैदर, निजामासारख्या प्रबळ शत्रूंशीं सारखें झगडावें लागलें; राजधानी देशावर पुणे येथें, त्यांतच पानपतची लढाई व घरगुती कलह यामुळें द्यावयास पाहिजे तितकें प्रत्यक्ष लक्ष कोंकणांत पुरविणें त्यांना शक्य झालें नसावें.


पेशव्यांचेंच सूत्र पुढें चालवून ब्रिटीश अधिकाऱ्यांनींहि रत्नागिरी जिल्ह्याकडे द्यावें तितकें लक्ष दिलें नाहीं व एका कालीं महत्त्वाच्या ऐतिहासिक घडामोडींचा साक्षीदार ठरलेला हा जिल्हा पुढील काळांत बऱ्याच अंशीं उपेक्षित ठरला.

—o×o—

दिव्य दृष्टीसाठीं—

Gram—DIVYANETRA
(BOM-DADAR)

शिसा ऑप्टिशिअन्स्



चष्म्याचे व्यापारी

छबिलदास रोड, दादर, (प. रे.) मुंबई २८.

येथें डोळ्यांच्या तज्ञ डॉक्टरकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

# ऐतिहासिक घराणीं

मराठी राज्याच्या वेळीं विशेषत: पेशवाईंत कोंकणांतील अनेक घराणीं गरीबीमुळें तर कांहीं अन्य कारणांनीं देशावर गेलीं व तीं स्वपराक्रमावर पुढें आलीं. अशा कांहीं प्रमुख घराण्यांचा परामर्ष या प्रकरणांत घेण्यांत आला आहे.

## वरवडेकर जोशी

सध्यांचे इचलकरंजीकर घोरपडे हे मूळचे रत्नागिरी तालुक्यांतील जयगड जवळच्या वरवडे गांवचे जोशी. त्या गांवांत छत्रपती राजाराम महाराजांच्या वेळीं महादजीपंत जोशी नांवाचे गृहस्थ रहात असत. ते वारले तेव्हां त्यांचा नारायण उर्फ नारोपंत नांवाचा मुलगा चार पांच वर्षांचा होता.

घरच्या गरीबीमुळें महादजीपंतांच्या बायकोनें कोंकण सोडलें. मुलाला घेऊन ती देशावर आली व संताजी घोरपडे यांच्या आश्रयाला राहिली. पुढें नारोपंतांच्या अंगांत चांगली शिपाईगिरी निर्माण झाली. त्यांची कर्तबगारी पाहून नारोपंतांवर संताजीची मर्जी बसली. नारोपंत व संताजी यांच्या निकट प्रेमामुळें नारोपंतहि आपलें नांव घोरपडे लावूं लागला व पुढें तो घोरपडे याच नांवानें प्रसिद्धीस आला. नारोपंत संताजीच्या आश्रयाखालीं कापशी येथें रहात असे. संताजीचा खून झाल्यावर संताजीचा मुलगा पिराजी याचा कारभार नारोपंतानें पाहिला. नारोपंतांचा मुलगा व्यंकटराव याचें लग्न बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची मुलगी अनुबाई हिच्याशीं झालें.

नारोपंतानें इ. स. १७११ च्या सुमारास हरभट पटवर्धनास आश्रय देऊन त्यांना आपले घरचें उपाध्येपण दिलें. नारोपंतास कोल्हापूरचें सचिवपदहि मिळालें होतें.

व्यंकटराव हाहि पराक्रमी होता. १७३९ सालीं चिमाजी अप्पानें वसईवर स्वारी केली त्याचवेळीं यानें गोव्यावर स्वारी करून पोर्तुगीजांना जर्जर करून सोडलें. नंतर कांहीं दिवसांनीं छत्रपती शाहूनें कोल्हापुरकरांकडून त्यांना इचलकरंजी येथें जहागीर देवविली व तेथें ते राहूं लागले.

## नाना फडणीस

पेशवाईतील प्रमुख मुत्सद्दी नाना फडणीस यांचें मूळ गांव बाणकोट ( ता. मण्डणगड ) जवळ वेळास हें असून तेथें नानांनी कालभैरवाचें देवालय बांधलें आहे. नाना फडणिसांचे आजोबा हे बाळाजी विश्वनाथबरोबर देशावर तिवरा घाटानें गेले. जातांना सिद्दीच्या अंमलदारांनी बाळाजीला पकडून अंजनवेलला नेलें, परंतु श्री, भानूनीं खटपट करून त्यांना सोडविलें. नंतर ते देशावर गेले अशी माहिती मिळते. त्यापूर्वी बाळाजी विश्वनाथ हा चिपळूण येथें मिठागरावर जकातीच्या कामावर कारकून होता. त्यावेळीं ब्रम्हेंद्र-स्वामीशीं त्याची ओळख झाली. चिपळूण येथेंहि वाडा बांधण्यास बाळाजी विश्वनाथला शाहूनें परवानगी दिल्याचा उल्लेख आहे.

## शिर्क्यांची राजधानी

चिपळूणच्या आग्नेय दिशेस सुमारें २० मैलावर सह्याद्रीच्या पायथ्याशीं प्रसिद्ध मोंगल सरदार गणोजी शिर्के यांच्या राजधानीचें गांव 'कुटरें' हें आहे. छत्रपति राजाराम याची आई सोयराबाई, ( ही शिवाजीची तिसरी बायको ) संभाजीची बायको येसूबाई व शाहूची तिसरी बायको सकवारबाई या तिन्ही शिर्के घराण्यांतील होत्या.

संभाजीनें या ( शिर्के ) घराण्यांतील पुरुषांचें शिरकाण केलें. या गांवांत अद्याप शिर्क्यांच्या वंशजांची वस्ती असून तेथें त्यांच्या पूर्वीच्या इमारतींहि आहेत. या शिर्क्यांना तेथें "राजे शिर्के" असें संबोधतात. या गांवांत शिर्के घराणीं बरींच आहेत.

## नेवऱ्याचीं घराणीं

पेशव्यांच्या काळांत नेवरें ( ता. रत्नागिरी ) या एकाच गांवांतील तीन घराणीं देशावर जाऊन चांगलीं उदयास आल्याचें दिसतें.

नेवरें येथें जोगदेव भट बर्वे म्हणून रहात असे. अद्याप नेवरें येथें 'आगर जोगदेव भट' म्हणून एका ठिकाणाचें नांव आहे. त्याचा नातू मल्हारराव हा बाळाजी विश्वनाथबरोबरच देशावर गेला. मल्हाररावाची बहीण राधाबाई हिच्याशीं बाळाजी विश्वनाथाचें लग्न झालें. मल्हाररावाचा मुलगा

अंताजी ऊर्फ बाबुराव मल्हार हा पेशव्यांच्या वतीनें कांहीं दिवस निजामाच्या दरबारीं व नंतर दिल्लीला वकील होता.

गोविंदपंत बुंदेले हे मूळ नेवऱ्याचे. त्याचें खरें आडनांव खेर. नेवरें येथील कुळकर्णीपण त्यांचेकडे होतें, पण तें काम त्यांना जमेना. ते लहानपणीं फार खेळाडू असल्यामुळें कामाकडे त्यांचें लक्ष नसे. ते देशावर गेले व सुदैवानें पहिल्या बाजीरावाजवळ शागीर्द म्हणून राहिले. त्याची हुषारी पाहून बुंदेलखंड बाजीरावानें मिळाल्यावर त्या प्रांतांत बंदोबस्तासाठीं गोविंदपंताना ठेवलें. बुंदेलखंडांत त्यांची नेमणूक झाली व तेथें ते राहूं लागले त्यामुळें बुंदेले नांव पडलें.

नागपूरकर पहिले रघुजी भोसले यांचे बंगालवर स्वारी करणारे सेनापती भास्करराव कोल्हटकर हे मूळचे नेवऱ्याचे. भास्करराव बंगालच्या स्वारींत ठार झाले. त्यांचा भाऊ कान्हेरपंत किंवा कोन्हेरराम हाहि राघोजी भोसल्यांच्या दरबारांत असून त्याचेवर भोसल्यांचा अत्यंत विश्वास होता. भास्कररावाचे वडील रामजी नाईक कोल्हटकर ऊर्फ रामजी नारायण हे संभाजीच्या कारकीर्दीच्या अखेर नेवऱ्याहून देशावर येऊन वाईजवळील पांडववाडी येथें शेती व सावकारी करून राहूं लागले. ते देशमुख असल्याचा उल्लेख आढळतो. रामाजीपंत आपल्या हयातींत नेवरें येथें जात येत असत. त्यांचा व हिंगणीकर भोसलेबंधु बापूजी, परसोजी व साबाजी यांचा अत्यंत स्नेह होता. पहिला राघोजी भोसले नागपूरकर हा बापूजी भोसल्यांचा ( बिंबाजीचा मुलगा ) नातू होय कोल्हटकर व भोसले यांचा स्नेह नागपूर येथें अखेरपर्यंत होता.

सदाशिवराव भाऊ पेशवे यांची पत्नी पार्वतीबाई ही कोल्हटकर घराण्यांतील. पार्वतीबाईचा भाऊ लक्ष्मण कृष्ण, चुलते रघुनाथ मोरेश्वर हे भाऊसाहेबांच्या तोतयाच्या प्रकरणांत तोतयाच्या बाजूचे होते.

नेवऱ्यांतील कोल्हटकर घराण्यांतील बरेच पुरुष त्या काळांत आंगरे, पेशवे, भोसले यांच्याकडे मोठ्या जागांपर्यंत गेले होते.

नेवरें हा गांव रत्नागिरीच्या उत्तरेस सुमारें १० मैलावर आहे. गणपतिपुळें हा नेवऱ्याचा एक विभाग आहे.

## कोतवड्याचे हरभटजी पटवर्धन

गणपतिपुळ्याजवळच कोतवडें नांवाचा गांव आहे. तेथें हरभटजी पटवर्धन नांवाचे गृहस्थ रहात असत. त्यांना गणपती पुळ्याचे पुराणिक शेंडे शास्त्री यांची मुलगी गौरबाई दिली होती. घरची अत्यंत गरीबी होती. हरभटजी रोज गणपती-पुळ्यास येऊन गणपतीची उपासना करूं लागले. एके दिवशीं 'देशावर जा' म्हणून त्यांना दृष्टांत झाला. त्याप्रमाणें ते देशावर गेले व तेथें संताजी घोरपड्याचे अश्रित नारो महादेव जोशी वरवडेकर यांचेकडे कापशीस राहिले. नंतर नारोपंतांनीं त्यांना आपल्या घरचें उपाध्येपण दिलें व त्यांची बहिरवाडी येथें राहाण्याची सोय केली. पुढें हरभटजींचे मुलगे गोविंदपंत, रामचंद्रपंत, भास्करपंत यांचा बाजीराव पेशव्यांशीं संबंध आला आणि रामचंद्रपंत व गोविंदपंत सरदार झाले. नानाफडणीसांच्या वेळीं प्रसिद्धीस आलेले सरदार परशुरामभाऊ पटवर्धन हे रामचंद्र पंताचे चिरंजीव. सवाई माधवरावास लहानपणीं सांभाळण्याचें काम करणारा पुरुषोत्तमराव दाजी हा या पटवर्धन घराण्यापैकींच होता. बारभाईचें कारस्थान लवकर सफल होण्यांत या पटवर्धन सरदारांचा मोठा वांटा आहे. पटवर्धन व पेशवे यांचे अत्यंत घरोब्याचे संबंध असून या पटवर्धन घराण्यानें (दुसऱ्या बाजीरावाच्या वेळपर्यंत) महाराष्ट्राची बहुमोल सेवा केली आहे.

## गणेश संभाजी

थोरले माधवराव पेशव्यांचे वेळीं उदयास आलेले गणेश संभाजी व गोपाळ संभाजी यांचें आडनांव खांडेकर असून ते संगमेश्वर तालुक्यांतील बुरंबाड गांवचे राहणारे. गोविंदपंत बुन्देले यांचेबरोबर त्यांचें घराणें देशावर गेलें. त्यांना पंथपिंपळोदा येथें माळव्यांत माधवरावाच्या वेळीं जहागीर होती. भाऊसाहेबांच्या तोतयाच्या प्रकरणांत गणेश संभाजीनें तोतयाला सहाय्य केल्यामुळें माधवरावांची त्याचेवर गैरमर्जी झाली होती. नंतर गणेश संभाजी नागपूरकर भोसल्यांच्या दरबारांत चांगला पुढें आला होता. त्याची ओरिसा प्रांताच्या सुभ्यावर नेमणूक झाली होती.

या खांडेकर घराण्याकडे बुरंबाड व जवळच्या पांच गांवचें कुळकर्णीपण होतें. राजापूर प्रांतांतला महादजी बल्लाळ करकरे हा माधवराव यांच्यावेळीं दफ्तरदारीवर होता. माधवराव त्याचा उल्लेख गुरुजी म्हणून करीत. तो

माधवरावांचा प्रथम शिक्षक असावा. माधवराव त्याला अत्यंत मान देत असत.

### बिनीवाले

विसाजी कृष्ण बिनीवाले हेहि माधवराव पेशव्यांच्या वेळीं प्रसिद्धीला आले. त्यांचें खरें नांव विसाजी कृष्ण चिंचाळकर. ते मूळचे राजापूर प्रांतांतील (आतां त्या तालुक्यांतील) तेरवण गांवचे रहाणारे. त्यांचे वडील कृष्णाजीपंत हे कोंकणांतून आले ते पुरंदऱ्यांकडे आश्रयाला राहिले. विसाजीपंत पुढें बळवंतराव मेहेंदळे यांचे हाताखालीं राहून पुढें आले. नंतर बिनीवर त्यांची नेमणूक झाल्यावर बिनीवाले हें नांव त्यांना पडलें. ते इ. स. १७८५ मध्यें मरण पावले.

### बारामतीकर

पेशवाईंत प्रसिद्ध असलेले बाबूजी नाईक बारामतीकर हे मूळचे दापोली तालुक्यांतील केळशी गांवचे. त्यांचे आजोबा केशव नाईक काशीस जाऊन सावकारी करूं लागले. त्यांचें आडनांव जोशी. केशव नाईक हा शिवाजीच्या समकालीन असावा. त्याला सदाशिव, कृष्ण व अंतोबा असे तीन मुलगे होते. त्यापैकीं कृष्णाजी नाईक हा शाहूबरोबर दक्षिणेंत आला. त्याच्यामागून त्याचे भाऊ आले. शाहूला त्यानें त्यावेळीं आर्थिक मदत चांगली केली, त्यामुळें शाहूचा त्या घराण्यावर लोभ होता. सदाशिवचा मुलगा महादबा हाच बाबूजी नाईक म्हणून प्रसिद्ध आहे. या घराण्यांत कर्तबगार पुरुष निर्माण झाले. नागपूरकर भोसल्यांच्या दरबारांत त्यापैकीं कांहींजण होते. याच बाबूजी नाईकांचा कवि मोरोपंत यांना आश्रय होता.

### रास्ते

रास्ते हे गुहागरजवळ वेळणेश्वर गावांत रहाणारे गोखले. ते कांहीं काळ आदिलशाहींत दाभोळ भागावर व नंतर विजापूरला नोकरीला होते. त्यांना 'रसदे' असें नांव मिळालें होतें. या घराण्यांतील श्यामजीपंत याला शाहूनें साताऱ्यास आणलें व त्याचा मुलगा भिकाजीपंत याची व्यापारांतील हुषारी व सचोटीची वागणूक पाहून त्याला रास्ते (रास्त वागणारे) हें नांव दिलें. या भिकाजीपंतांची पहिली मुलगी गोपिकाबाई हिचें नानासाहेब पेशव्यांशीं लग्न झालें. नंतर रास्ते पुण्यांत राहूं लागले.

अनुक्रम ..२३०५०.... दि: ..२-४-५२...
क्रमांक ....२३३...... नों: दि: ..२९/३/५८



## रामाजी अनंत

रामाजी अनंत दाभोळकर यांचें मूळचें आडनांव काळे. ते रत्नागिरी तालुक्यांतील बसणी गांवचे रहिवासी. ते नानासाहेब पेशव्यांकडे कारकून होते. नगर जिल्ह्यांत अकोलनेर येथें त्यांची जहागीर होती. तेथें त्यांचे वंशज आहेत. ते नानाफडणीसासह पानपतवरून पळून येत असतांना त्यांना शत्रूच्या लोकांनीं ठार केलें.

## नारोराम मंत्री

त्या काळांत सारस्वत कुटुंबेंहि बरींच देशावर जाऊन पुढें आलेलीं दिसतात. नारोपंत मंत्री हा मूळचा सावंतवाडी नजीक कोचरे गांवचा कुळकर्णी. तो सारस्वत ब्राह्मण. त्याला नारवा मंत्री म्हणत. तो इ. स. १७०७ च्या सुमारास धनाजीजवळ राहिला. १७३३ त्याला शाहूनें मंत्रीपदाचा अधिकार दिला. तो मागणी ( जि. सातारा ) येथे रहात असे.

## विसाजी नारायण

विसाजी नारायण जाखी हे सारस्वत ब्राह्मण. ते प्रतिनिधींचे चिटणीस होते. विशाळगडाला मोंगलांचा वेढा पडला त्यावळीं त्यांनीं परशुराम प्रतिनिधीला फार मदत केली. त्यांना ब्रामणोली ( जि. रत्नागिरी ) हें गांव इनाम होतें.

## अंताजी दामोदर शितूत

अंताजी दामोदर शितूत नांवाचे जांबरूण (ता. रत्नागिरी) गांवचे गृहस्थ उत्तरेंत ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारच्या दरबारीं होते. ते स्वपराक्रमावर पुढें आले. त्यांच्या नांवाचीं नाणीं पाडण्यांत आलीं होतीं. त्या नाण्याला अंतुशाही नाणें (रुपया) म्हणत. पंचमहाल वगैरे भागांत हें नाणें कांहीं काळ चालू होतें. त्या भागांत त्यांचा चांगला दरारा होता. त्यांनी कोंकण व देश मिळून १०८ शिवालयें बांधली.

## शिवभट साठे

नागपूरकर रघूजी भोसले (पहिले) यांनीं शिवभट साठे याला कटक (ओरिसा) प्रांतावर सुभेदार नेमलें होतें. नंतर रघूजीच्या पश्चात त्याचे मुलगे जानोजी व मुधोजी यांच्यांत तंटा लागला त्यावेळीं शिवभट साठे जानोजीच्या बाजूचा असल्यामुळें पुढें जानोजीनें (इ. स. १७५५–५६ च्या सुमारास)

कटकच्या सुभेदारीवर कायम केलें. शिवभटानें १७६१ त मिदनापूर येथें इंग्रजांवर हल्ला केला होता. त्याचें व जानोजीचें हिशेबावरून बिनसलें तेव्हां जानोजीनें त्याला सुभेदारीवरून काढून टाकलें. (इ. स. १७६१) नंतर त्यानें कांहीं काळ तेथें बंडाळी केली. त्याचा कारभार चांगला होता, त्यामुळें तेथील प्रजेंत त्याच्याबद्दल चांगलें मत होतें पुढें इ.स.१७६५–६६ च्या सुमारास तो पेशव्यांकडे गेला व पेशव्यांचा सरदार म्हणून त्यानें कामगिरी बजाविली. श्री. शिवभट साठे यांचा मूळ गांव संगमेश्वर तालुक्यांतील बुरंबाड. त्यांच्या कारभाराबद्दल इंग्रजांनीही स्तुति केली असल्याचें आढळतें.

## मोरोपंत पराडकर

सुप्रसिद्ध पंडित कवि मोरोपंत पराडकर हे मूळचे राजापूर तालुक्यांतील सौंदळ गांवचे. या ठिकाणीं त्यांचा चौथरा वगैरे असल्यास त्याची माहिती मिळवून तेथें या महान कवीचें स्मारक होणें अवश्य आहे.

—–०×०—–


# के. एस् देवरुखकर आणि काशिनाथ नारायण परांजपे

**सोनें, चांदीच्या व मोत्यांच्या दागिन्यांचे व्यापारी**

**घाटकोपरवाला चाळ, मुगभाट मुंबई नं. ४**

चोख सोनें व चांदीचा माल व उंची कल्चर्ड मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें वक्तशीर तयार करून दिले जातील.

**सकाळीं ८ ते ११ व दुपारीं २-३० ते ७-३० दुकान उघडें राहील.**

# ऐतिहासिक स्थळें, किल्ले व देवस्थानें

रत्नागिरी जिल्ह्यांत ऐतिहासिक काळांत अनेक घडामोडी झाल्या त्यामुळें कांहीं स्थळांची प्रसिद्धी झाली. तसेंच त्यावेळीं संरक्षणाच्या दृष्टीनें किल्ल्यांना अत्यंत महत्त्व होतें. या भागांतील कांहीं ऐतिहासिक स्थळें, किल्ले, देवस्थानें वगैरेंची माहिती या प्रकरणांत देत आहे.

## सुवर्णदुर्ग

सुवर्णदुर्ग हा किल्ला हर्णै बंदरांत अजूनहि चांगल्या स्थितींत आहे. हा किल्ला समुद्रांत आहे. आतां त्या किल्ल्यांत वस्ती नाहीं. आंगऱ्यांचें या ठिकाणीं मोठें आरमाराचें ठाणें होतें. बोट बंदरांत उभी राहिली कीं हा किल्ला चांगल्या प्रकारें दिसतो.

दाभोळ बंदर हें फार पूर्वीपासून मोठें बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. परदेशाशीं या बंदरांतून व्यापार चालत असे. बहामनी राज्याचा प्रधान महंमद गवान हा याच बंदरांत प्रथम उतरला व देशावर गेला. या बंदराजवळ खंडो बल्लाळ चिटणीस याचें वतन होतें. १६९८ मध्यें जिंजीला मोंगलांचा वेढा पडला असतांना मोंगल सरदार गणोजी शिर्के याचें मन खंडो बल्लाळनें वळविलें व तेथून राजारामाची सुटका करून घेतली. परंतु त्यावेळीं, दाभोळचें वतन दिलेंस तर राजारामाची सुटका करून देतों, असें गणोजी शिर्क्यानें खंडो बल्लाळला सांगितलें. तेव्हां तें खंडो बल्लाळनें मान्य केलें व आपलें वतन त्यावेळीं शिर्क्यांना दिलें.

दाभोळच्या समोर अंजनवेलचा किल्ला आहे. आतां हा किल्ला पडक्या स्थितींत दिसतो. या किल्ल्यांत तुळोजी आंगऱ्यानें फ्रेंच लोक नोकरीस ठेवून तोफा गाळण्याचा कारखाना सुरू केला होता.

## गुहागर

चिपळूणच्या पश्चिमेस २६ मैलांवर व अंजनवेलच्या दक्षिणेस ८ मैलांवर समुद्र किनाऱ्यावर गुहागर शहर आहे. हल्लीं तें तालुक्याचें ठाणें आहे. येथें व्याडेश्वर म्हणून शंकराचें प्राचीन देवस्थान आहे. या ठिकाणीं रामलक्ष्मण


वनवासांत असतांना दर्शनास आले होते असा रामायणांत उल्लेख आहे. याच ठिकाणीं रघुनाथराव पेशवे यांची पत्नी आनंदीबाई हिचें माहेर होतें. तिच्या 'घराचा चौथरा' तेथील लोक दाखवितात. गुहागरला दक्षिणेस लागून असलेल्या 'असगोली' गांवांत बाजीरावाची भिंत म्हणून एक पडकी इमारत तेथील लोक दाखवितात. ही इमारत डोंगर उतरणीवर व समुद्रानजीक हवेशीर ठिकाणावर बांधलेली होती. ती दुसऱ्या बाजीरावानें (आपल्या आजोळीं) बांधली होती असें म्हणतात.

## जयगड

जयगड ( ता. रत्नागिरी ) येथें आंगऱ्यांचे ठाणें होतें. हा किल्ला अद्याप चांगल्या स्थितींत असून त्यांत वस्ती आहे. हा किल्ला किनाऱ्यावर आहे. जयगड बंदरांत बोटी खाडींत शिरतांना या किल्याजवळून आंत शिरतात. हा किल्ला कान्होजी आंगरे यांचा सरदार दत्ताजी कनोज यानें बांधला. ( १७२४ ) याचे दोन भाग असून खालच्या भागांत वस्ती आहे. बाकाजी नाईक प्रभृतींनी गोवळकोटवर स्वारी केली त्यावेळीं 'जयगडहून तोफा व जमाव' तेथें आला होता असा उल्लेख आहे. जयगडच्या समोर तवसाळ ( ता. गुहागर ) येथेंहि डोंगरावरुन एक तट बांधलेला दिसतो. तेथेंहि शत्रूवर मारा करण्यासाठीं जागा तयार केलेली असावी असें वाटतें. ब्रम्हेन्द्र स्वामींच्या हत्ती प्रकरणांत जयगडांत आंगरे व सिद्दी यांची थोडीशी चकमक झाली व तींत सिद्दीच्या लोकांना पळ काढावा लागला.

## गोवळकोट

गोवळकोट किल्ला अजून चांगल्या स्थितींत असून तो चिपळूणजवळील माप नांवाच्या बेटांत आहे. हें बेट वाशिष्ठी नदींत आहे. गोवळकोट हें हल्लीं दाभोळ खाडीतील लॉंचचें बंदर आहे. माप बेटांत वस्ती बरीच आहे. परशुराम हें उंचावर असून गोवा–मुंबई रोडच्या रस्त्याला आहे. ( मोटारी परशुरामच्या डोंगरांतूनच जातात ) इथून मोटारनें जातांना गोवळकोट स्पष्ट दिसतो व त्या ठिकाणाहून श्रीपतराव प्रतिनिधीनें, बांकाजी नाईकानें गोवळकोटावर स्वारी केली त्यावेळची लढाई पहिली.


जिल्हा रत्नागिरी
मंडणगड
दापोली
हर्णे (सुवर्णदुर्ग)
आंजर्ले
खेड
दाभोळ
अंजनवेल
गुहागर
परशुराम
चिपळूण
पालशेत
कोरया
सावर्डे
कुंभारली घाट
जैगड
संगमेश्वर
पुळे
नेवरे
रत्नागिरी
आंबा घाट
विशाळगड
लांजे
पूर्णगड
राजापूर
जैतापूर
विजयदुर्ग
देवगड
फोंडा घाट
कणकवली
आचरें
मालवण
मालवण सिंधुदुर्ग
कुडाळ
आंबोली घाट
वेंगुर्ले
सावंतवाडी
रेडी
तेरेखोलची खाडी
तपशील
पेट्यांचें गांव
तालुक्यांचें
सडक
नदी, खाडी

## रत्नागिरी

रत्नागिरी येथें किल्ला असून त्या किल्ल्यांत अद्याप वस्ती आहे. भगवती व भागेश्वर हीं देवालयें त्या किल्ल्यांत आहेत. हा किल्ला ब्रावडेकर अमात्यांच्या ताब्यांत होता. तो नंतर तुळोजी आंग्रे यानें हस्तगत केला (रत्नागिरीची त्यावेळीं आतांइतकी वाढ झालेली नव्हती.)

रत्नागिरीनंतर पूर्णगड येथें किल्ला असून तो साधारण पडक्या स्थितींत आहे. याशिवाय देवगड व मालवण येथें सिंधुदुर्ग व तेरेखोलनजीक रेडी येथें किल्ला आहे. विजयदुर्ग येथें आंगऱ्याच्या आरमाराचें एक मोठें ठाणें होतें.

याशिवाय **मंडणगड तालुक्यांत** बाणकोट येथें व्हिक्टोरीया, मंडणगड; **दापोली तालुक्यांत** गोवा, फत्तेगड, पालगड, कनकदुर्ग; **खेड तालुक्यांत** महिपतगड, समारगड, रसाळगड; **चिपळूण तालुक्यांत** गोवळकोट, जंगली जयगड, ( सह्याद्रींत ) बहिरवगड; ( सह्याद्रींत–पडक्या स्थितींत ) **गुहागर तालुक्यांत** गोपाळगड, ( अंजनवेल येथें ); विजयगड ( तवसाळ ) **संगमेश्वर तालुक्यांत** प्रचितगड किंवा उचितगड, ( शृंगारपूरजवळ ) महिपतगड, भवानगड ( चिखली गांवांत ) हे किल्ले आहेत.

**राजापूर तालुक्यांत** आंबूळगड, (नाटें गांवाजवळ) यशवंतगड (समुद्र किनाऱ्यावर); **देवगड तालुक्यांत**—देवगड, विजयदुर्ग, कोटकामते, (कामतें गांवाजवळ) बहिरवगड (सह्याद्रीच्या माथ्यावर–हा दुसरा बहिरवगड); **मालवण तालुक्यांत**—सिंधुदुर्ग, पदमगड, राजकोट, सर्जेकोट, (कांदळगांवाजवळ), भगवंतगड, (चिंदरगांवाजवळ) भरतगड (मसुरें गांवाजवळ), रामगड, सिद्धगड, पांडवगड, नान्दोसगड, वेताळगड; **वेंगुर्लें पेट्यांत**—रेडी येथें यशवंतगड, निवती (कोच्चरे गांवाजवळ इत्यादि किल्ले जुन्या ऐतिहासिक घडामोडींची साक्ष द्यायला खडे आहेत. शिवाय **कणकवली पेटा**—खारेपाटण येथें एक लहान किल्ला आहे.

**सावंतवाडी तालुक्यांत**—महादेवगड, हनुमंतगड, आवरें, नारायणगड (केळयें गांवाजवळ) हे किल्ले असून बांदे, सावंतवाडी येथें एक छोटासा किल्ला आहे.

**कुडाळ पेट्यांत** –रांगणा किल्ला, मनोहरगड, मनसंतोषगड, कुडाळ, हे किल्ले आहेत.

## गणपतिपुळें

रत्नागिरी शहराच्या उत्तरेस १२ मैलांवर गणपतिपुळें हें प्राचीन व प्रसिद्ध क्षेत्र आहे. येथें गणपतीचें देवालय आहे. या देवालयासंबंधीं अशी हकिगत उपलब्ध आहे कीं, इ. स. १६०० च्या सुमारास त्या गांवचे खोत बाळंभटजी भिडे हे रहात असत. त्यांचेवर कांहीं संकट आलें असतां त्यांनीं गणपतीची उपासना केली. गणपती प्रसन्न झाला व दृष्टांत झाल्याप्रमाणें तेथें डोंगरपायथ्याशीं असलेल्या केतकीच्या वनांत गणपतीची मूर्ति त्यांना आढळून आली. नंतर अनेक लोकांना या देवस्थानाच्या साक्षात्काराची प्रचीति आल्यामुळें दिवसेंदिवस त्याची प्रसिद्धी झाली.

नेवरें गांवचे एकूण १२ वाडे असून त्यांत गणपतिपुळें, वीरापुळें ऊर्फ मुसळपुळें व नेवरें हे साधारण तीन प्रमुख विभाग आहेत. गणपतिपुळें येथील गणपतीचें देवालय मुंबईच्या चौपाटीप्रमाणें अगदीं समुद्र किनाऱ्यावर आहे. सुमारें अडीचशें वर्षांपूर्वीं गोविंदपंत बुंदेल सरदार यानीं तेथें चिरेबंदी पाखाडी व धर्मशाळा बांधली आहे.

या ठिकाणीं शिवाजी महाराजहि दर्शनाला आले होते व त्यांनीं या देवालयाला वर्षासन दिलें असल्याचा उल्लेख आहे. देवालयाचा गाभारा शिवाजी महाराजांचे सचीव अण्णाजी दत्तो यानीं बांधला. थोरले माधवराव पेशवे यांच्या पत्नी सौ. रमाबाई पेशवे यांनींहि येथें एक धर्मशाळा बांधली आहे. छत्रपती राजाराम महाराज यांनीं देवालयाला जमीन इनाम दिली आहे. बडोद्याच्या गायकवाड सरकारनेंहि या देवालयाला देणगी दिलेली आहे.

पेशव्यांच्या वेळीं महाराष्ट्रांतील प्रमुख क्षेत्रांत गणपतिपुळ्याची गणना होत असे. पेशवेहि येथें दर्शनासाठीं येत असत. थोरले माधवराव पेशवे यांनीं केलेली नेमणूक अद्याप चालू आहे.

सांगली, मिरज, कुरुंदवाड, जमाखिंडी, तासगांव येथील पेशव्यांचे सरदार पटवर्धन हे सर्व ( पटवर्धन ) तर या गणपतीला आपलें कुलदैवत मानतात. या पटवर्धन वंशांतील श्री हरभटजी पटवर्धन हे देशावर प्रथम गेले. त्यानीं या स्वयंभू गणपतीची उपासना केली, तेव्हां त्यांना तो प्रसन्न झाला व त्यानें देशावर जाण्यास सांगितलें अशी कथा आहे.

या पटवर्धन सरदारांनीं व त्यांच्या वंशजांनीं या देवालयास अनेक देणग्या व नेमणुकी दिल्या आहेत. अद्यापहि त्यांचे वंशज दर्शनासाठीं गणपतिपुळें येथें जातात. येथें भाद्रपदांत गणेश चतुर्थीला व माघ शुद्ध चतुर्थीला मोठा उत्सव असतो. माघ महिन्यांत या उत्सवाला अनेक ठिकाणचे लोक येतात.

गणपतिपुळें येथील रहिवाश्यांची गणेश चतुर्थीला मातीची गणपतीची मूर्ति आणून पूजण्याची पद्धत नाहीं. ते या गणपतीची त्यावेळीं पूजा करतात. या गणपतीला समुद्रस्नान दरवर्षी घडतें, एकदां तर समुद्राचें पाणी गाभाऱ्यांत जातें.

गणपतीपुळें येथें गणपती अवतीर्ण होण्यापूर्वी तेथून दक्षिणेकडे सुमारें पंचवीस मैलांवर गुळें नांवाचें गांव आहे, तेथें गणपतीचें स्थान होतें. गुळें येथील गणपतीची मूर्ती गुप्त झाली व त्यावेळीं पुळ येथें प्रकट झाली, असें लोक सांगतात, आणि त्यामुळें गुळ्याचा गणपती पुळ्याला गेला असें तेथील लोक म्हणतात.

## कड्यावरचा गणपती

या जिल्ह्यांत दुसरें एक आंजर्लें ( तालुका दापोली ) येथें कड्यावरचा गणपती म्हणून गणपतीचें स्वयंभू स्थान आहे. येथें माघ शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत पांच दिवस मोठा उत्सव असतो. या उत्सवाला बऱ्याच दूरच्या ठिकाणाहून लोक येतात. हें स्थान देवाच्या टेकडीवर रम्य ठिकाणीं आहे. जवळच दुर्गादेवीचें एक देवस्थान आहे. दुर्गादेवीची चैत्र शुद्ध १ ते वद्य ४ पर्यंत मोठी यात्रा भरते.

## संगमेश्वर

संगमेश्वरजवळ कर्णेश्वराचें एक देवालय आहे. त्याचें बांधकाम प्रेक्षणीय आहे. हें देवालय चालुक्य घराण्यांतील कर्ण राजानें बांधलें म्हणून त्या देवालयास कर्णेश्वर नांव देण्यांत आलें. कोल्हापूराहून कर्ण राजा कोंकणांत गेला तेव्हां हें देवालय त्यानें बांधलें. हें देवालय शालिवाहन शके १०० च्या सुमारास बांधलें गेलें आहे. चालुक्यांनींच कोल्हापूरचें अंबाबाईचें देऊळ याच सुमारास बांधलें. या दोन्ही देवळांच्या बांधणींत बरेंच साम्य आहे. या कर्ण राजाच्या पदरीं शेष नांवाचा कवि होता. त्यानें संगमेश्वर महात्म्य म्हणून ९० श्लोकांचें एक काव्य केलें आहे.

संगमेश्वरच्या वायव्येस सुमारें १० मैलांवर वीर नांवाच्या एका गावांत **श्री लक्ष्मी मल्लमर्दन** नांवाचें देवस्थान आहे. तेथील मूर्ति सुमारें आठ नऊ फूट उंचीची व सुमारें चार साडेचार फूट रुंदीची असून तिचें कोरीवकाम पहाण्याजोगें आहे. ज्या दगडाची ही मूर्ति आहे तसा दगड त्या भागांत उपलब्ध नाहीं.

दुसरें एक रत्नागिरी तालुक्यांत कोळिसरे येथें **लक्ष्मीकेशव** नांवाचें देवस्थान असून तेथील मूर्तीसुद्धां तेथें न आढळणाऱ्या दगडाची दिसते. तीसुद्धां खाडींत सांपडल्याची आख्यायिका आहे.

वीर जवळच **पुन्यें** नांवाचें खेडें आहे. त्या खेड्यांत एक भुयार आहे. तें मानवनिर्मित नाहीं, नैसर्गिक आहे. एका डोंगरांत हें भुयार असून त्याला दोन समोरासमोर दरवाजे आहेत. एका दरवाज्यापासून दुसऱ्या दरवाज्याचें अंतर एक फर्लांगाचें आहे व या दोन दरवाजांमधील भागांत चांगला सपाट रस्ता आहे. परंतु आजूबाजूला गेल्यास माणूस चुकण्याचा संभव असतो. या भुयारांत तेथील शेतकरी दोरी हातांत धरून जातात. परंतु तें केवढें मोठें आहे याचा बरोबर अंदाज अद्याप कुणालाहि लागलेला नाहीं. वर दिसणारा डोंगरी भाग तेवढेंच खालीं भुयार असावें असें म्हणतात. भुयारांत कांहीं ठिकाणीं उभ्यानें चालतां येतें तर कांही ठिकाणीं बसून जावें लागतें. कुठेंकुठें सरपटत जावें लागतें. फार दूर गेल्यास हवा नसल्यामुळें कंदील विझतो.

वर निर्देश केलेल्या मूर्ति, देवळें व भुयार वगैरे संशोधन करण्यासारख्या गोष्टी आहेत.


## आमनायश्वर

संगमेश्वर तालुक्यांत बुरंबाड येथें आमनायेश्वर नांवाचें एक मोठें शंकराचें स्थान आहे. तेथें दर महा शिवरात्रीला जत्रा भरते. 'आमानी' नांवाचें कोंकणांत एक लहान झाड आहे, त्या झाडांच्या बनांत शंकर स्वयंभू आल्यामुळें त्याला आमनायेश्वर हें नांव पडलें अशी अख्यायिका आहे.


## परशुरामाचीं देवालयें

चिपळूण जवळ परशुराम (या गांवाचें मूळचें नांव पेढें) येथें व राजापूर तालुक्यांत देवाचें गोठणें या दोन्ही ठिकाणीं परशुरामाचीं देवालयें असून पेशव्यांच्या वेळीं ब्रह्मेंद्रस्वामीस या देवस्थानांसाठी पेंढे, नायसी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ..................



श्री परशुराम ( चिपळूण )



पुळ्याचा गणपति ( गणपतिपुळे )

( ता. संगमेश्वर ), डोरलें, महाळुंगे ( ता. रत्नागिरी ), कवळुशी, देवाचें गोठणें, आंबडस ( ता. खेड ) हे गांव इनाम मिळाले.

चिपळूणजवळच्या परशुरामाची पूजा रोज सकाळीं ९ वाजतां आटोपते व त्यावेळी तोफ उडविण्याची पद्धत होती. तोफेचा आवाज सुमारें २० मैलांवर ऐकला जातो. ही तोफ झाली कीं, कामाला सुरुवात करण्याची त्या भागांतील शेतकरी लोकांची पद्धत होती. तोफेचा आवाज म्हणजे शहरांतील गिरणीप्रमाणें कामावर रुजू होण्याचा आवाज समजत असत. ही तोफेच्या आवाजाची प्रथा १९३९-४० पर्यंत म्हणजे दुसरें महायुद्ध सुरू होईपर्यंत चालू होती.

सिंधुदुर्ग किल्ल्यांत **शिवाजी महाराज** व **भवानीचें देऊळ** आहे. कामते ( ता. देवगड ) येथें **श्री भगवतीचें** प्रसिद्ध देवस्थान आहे. आचरें ( ता. मालवण ) येथें **रामेश्वराचें** देवस्थान असून तेथें रामनवमीला मोठा उत्सव असतो. मसुरें ( ता. मालवण ) येथें तलावाच्या मध्यभागीं **देवीचें मंदिर** आहे. वालावल ( पेटा कुडाळ ) येथें **लक्ष्मीनारायणाचें** प्रसिद्ध मंदिर आहे. टाणोली ( ता. सावंतवाडी ) येथें **साटम महाराजांची समाधी** व तळवणें येथें सावंतवाडीचे पहिले राजे खेम सावंत यांचे **गुरु परशुराम यांची समाधि आहे.** बांदे येथें **सोहिरोबा आंबिये** या साधूची समाधी आहे.

संगमेश्वर तालुक्याच्या पूर्वेस सह्याद्रीच्या पायथ्याशीं मारळ नांवाच्या गांवीं **मारळेश्वर** नांवाचें देवस्थान आहे.हें स्थान अगदीं डोंगराळ भागांत आहे. तेथें जाण्यास रस्ता अत्यंत बिकट आहे. ठिकाण प्रेक्षणीय आहे.

गांवखडी ( ता. रत्नागिरी ) येथें **जुगादेवीचें** देवालय असून तेथें देवदिवाळीला मोठा उत्सव असतो.

आडिवरें (ता. राजापूर) येथें **महाकालीचें** मंदिर असून तें फार प्रसिद्ध आहे. तेथें नवरात्रांत मोठा उत्सव चालतो. धोपेश्वर ( ता. राजापूर ) येथें **धूतपापेश्वराचें** देवालय आहे.

राजापूर येथें बारा वर्षांनीं गंगा प्रकट होते असें म्हणतात. ही मुदत कमी-जास्तही होते, परंतु येथें गंगा प्रकट होते हें खरें आहे. जेथें गंगेचा उगम (झरा) होतो तेथें कुंडें बांधण्यांत आलीं असून गंगा येते तेव्हां भाविक फार दुरून तेथें येतात. ही गंगा येथें येण्याची प्रथा सुमारें २००-३०० वर्षांपासून आहे.

देवगडजवळ **कुणकेश्वर** हें प्रसिद्ध शंकराचें देवालय असून तेथें दर महाशिवरात्रीला मोठी जत्रा भरते.

जयगड ( ता. रत्नागिरी ) जवळ नांदिवडे येथें **कर्हाटेश्वर** नांवाचें शंकराचें देवालय आहे. गुहागर तालुक्यांत **वेळणेश्वर** येथें शंकराचें जुनें व प्रसिद्ध देवालय आहे.

वेंगुर्लें येथें **सातेरी** नांवाच्या देवीच देवालय प्रेक्षणीय आहे.

मालवण येथें **काळबादेवी** नांवाच्या देवीचें एक देऊळ असून समुद्रावर मासेमारीचा अगर नौकानयनाचा व्यवसाय करणारे लोक या देवीला आपलें दैवत मानतात.श्रावण महिन्यांत तिसऱ्या मंगळवारी येथें मोठी यात्रा भरते.

मालवण तालुक्यांत चिंद्रे येथें **श्रीदत्तात्रयाचें** देऊळ असून त्या ठिकाणीं दत्तजयंतीला मोठी यात्रा भरते. दुसरें मालवणमध्यें देऊळवाडा येथें **श्रीरामेश्वराचें** देऊळ असून तेंही मोठें प्रख्यात आहे.ह्या ठिकाणीं मोठी यात्रा भरते.

वेंगुर्लें पेट्यांत मठ येथें शिलालेख आहेत. दाभोली या ठिकाणी गौड ब्राह्मणांचा प्रसिद्ध मठ आहे.

## सवत कडा

परशुराम (ता. चिपळूण) देवालयाजवळ एक उंच पण लहान 'धबधबा' आहे. त्याला सवतकडा म्हणतात. पावसाळ्यांत त्याला पाणी असतें. हा कडा मोटारींतून जातांना दिसतो.

या कड्यासंबंधीं अशी आख्यायिका सांगण्यांत येते कीं, दोघी सवती या कड्याच्या माथ्यावर बसल्या होत्या. त्यापैकीं एकीच्या डोक्यांतील उवा मारण्याचें काम दुसरी करीत होती. त्यामुळें त्यापैकीं एक पुढें व दुसरी मागें बसली होती. जी उवा मारण्याचें काम करीत होती तिच्या मनांत होतें कीं, आपल्यापुढें बसलेली आहे तिला खालीं ढकलून द्यायचें व आपण निघून जायचें, म्हणजे ती मरेल. परंतु पुढें बसलेल्या बाईच्या मनांत संशय आला कीं ही आपली सवत आहे, तिनें कदाचित आपल्याला लोटलें तर आपल्याबरोबर तिलाहि मरण यावें म्हणून तिनें सवतीला कळूं न देतां आपल्या व तिच्या पदराच्या टोकाची गांठ मारून ठेवली. थोड्या वेळानें मागें बसलेल्या बाईनें तिला ढकललें, परंतु तिचाहि पदर बांधलेला असल्यामुळें त्या दोघीहि कड्याखालीं पडून मरण पावल्या. या प्रकारामुळें सदर कड्याला 'सवत कडा' नांव पडलें.

# रत्नागिरी जिल्ह्याची निर्मिती व भौगोलिक स्थिति

पेशवाईच्या अस्तानंतरचे ५०–६० वर्षांचे कागदपत्र पाहिले तर साधारणतः ८७५–७६ पर्यंत तरी हल्लींच्या ठाणें, कुलाबा व रत्नागिरी ह्या तिन्ही जिल्ह्यांचा एक 'कोंकण' जिल्हा मानला जात असे. सध्यांच्या दापोली खेड तालुक्याचें नांव 'तालुके सुवर्णदुर्ग' होतें. सध्यांचा चिपळूण व गुहागर तालुका धरून त्यावेळीं अंजनवेल तालुका होता. अर्थात मराठ्यांच्या राज्यांतील तालुक्याचे विभागच कांहीं वर्षे कायम होते हें दिसून येतें.

नंतर कांहीं काळ बाणकोट (हल्लीचा तालुका मंडणगड) येथें जिल्हा कलेक्टरचें ठाणें होतें. त्यामुळें बाणकोट बंदराची तेथें सुधारणा करण्यांत आली होती. त्या ठिकाणीं बोटी लावण्याचा धक्काहि बांधलेला आहे. परंतु सदर बंदर सावित्री नदीच्या मुखाशीं असल्यामुळें नदींतील गाळ तेथें सांचूं लागला. आगबोटीच्या वाहतुकीच्या दृष्टीनें तें बंदर निरुपयोगी झालें व तेथें आगबोटी थांबण्याचें बंद झालें. तथापि ही नदी महाडजवळ गेली असल्यामुळें तांदूळनिर्यातीचा व्यापार येथें जोरांत चालतो. त्यामुळें गलबतांची वाहतुक असते. शिवाय लॉंच सर्व्हिसहि दासगांव (जि. कुलाबा) पर्यंत रोज चालू असते.

बाणकोटनंतर रत्नागिरी येथें कलेक्टरचें ठाणें झालें, तेव्हां रत्नागिरी जिल्ह्यांत सध्यांचा महाड तालुका होता तो काढून कुलाबा जिल्ह्यांत घालण्यांत आला.

## रत्नागिरी जिल्ह्याची सीमा

रत्नागिरी जिल्ह्याच्या पूर्वेस पश्चिम घाट (सह्याद्री पर्वत) व पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेस सावित्री नदी (बाणकोटची खाडी), पलीकडे कुलाबा जिल्हा. दक्षिणेस तेरेखोलची खाडी व पलीकडे गोवें, याप्रमाणें चतुःसीमा असून दक्षिणोत्तर लांबी सुमारें १६० मैल व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें ४०–४२

मैल आहे. जिल्ह्याचें क्षेत्रफळ ५,००० चौरस मैल असून १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें लोकसंख्या १७,११,१२१ असून त्यांत ७,७१, ७४ पुरुष व ९,३९,९४७ स्त्रिया आहेत. हा जिल्हा संपूर्ण मराठी भाषिक असून मराठी भाषिकांचें प्रमाण ९६ टक्के आहे.(परिशिष्ट पहा) बाकीच्या ४ टक्के अन्यभाषिकांत उर्दूभाषिक व तेथें स्थायिक झालेले गुजराथी येतात. येथील मुसलमान आपली मातृभाषा 'उर्दू' म्हणून नोंद करीत असले तरी घरीं मराठींत बोलतात. त्यांचे बहुतेक व्यवहार मराठींतच चालतात.

## खडकाळ भाग

हा जिल्हा सर्वसाधारणपणें खडकाळ असून ठिकठिकाणीं बऱ्याच खाड्या आहेत; त्या नौकानयनास उपयुक्त आहेत. हवा दमट व थोडी आळस आणणारी असली तरी एकंदरींत आरोग्याला पोषक आहे. किनाऱ्यावर ८० ते १०५ इंचापर्यंत पाऊस पडतो, परंतु समुद्रापासून जसजसें पूर्वेस जावें तसतसें पावसाचें प्रमाण १४० इंचांहून अधिक आहे.

आज रत्नागिरी जिल्हा अन्नधान्य दृष्ट्या तुटीचा दिसला तरी १८२० पर्यंत तो स्वयंपूर्ण होता. त्यावेळीं थोड्या प्रमाणांत धान्य निर्यात होत असे. १८२० सालीं या जिल्ह्याची लोकसंख्या ६,४०,८५७ होती. १८७२ सालीं ती १०,१९,१३६ झाली व १९५१ सालीं १७,६६,१७१ इतकी झाली म्हणजे १८७२ पेक्षां १९५१ सालीं १८३·३ टक्के लोकसंख्या वाढली आहे. ( रत्नागिरी जिल्ह्याची निर्मिती १८३२ सालीं झाली. )

## जमीन

जिल्ह्यांत सुमारें ४६८९२ एकर जमीन जंगलानें व्यापलेली असून बीनलागवडीची ८,४२,१७८ एकर आहे. लागवडीखालीं आणण्याजोगी पडित जमीन ३५,६७७ एकर आहे. आंबा, फणस व इतर फळझाडांच्या लागवडीखालीं ११,३७९ एकर जमीन असून, नारळ माडांच्या लागवडीखालीं १५६०४ एकर जमीन आहे.

## शिक्षण

शाळेंत जाणाऱ्या मुलामुलींचें प्रमाण शेंकडा ५८ असून, मुलांचें प्रमाण शेंकडा ८९ व मुलींचें ३१·५ होतें असें १९५१ सालीं झालेल्या पाहणींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................



श्री महाकाली (आडिवरें)

दिसून आलें आहे. आतां सक्तीच्या प्राथमिक शिक्षणामुळें हें प्रमाण वाढलें असेल. १९५१ सालीं जिल्ह्यांत असलेल्या प्राथमिक शाळांची संख्या २२५७ असून मुलांची एकूण संख्या २,१३,१७१ व शिक्षकांची एकूण संख्या ५,१०१ होती. जिल्ह्यांत दुय्यम शाळा तालुक्याच्या ठिकाणीं व इतर कांहीं मोठ्या गांवांत असून रत्नागिरी येथें एक कॉलेज आहे.

## निसर्गरचना

रत्नागिरी जिल्ह्यांत मोटारनें अगर होडीनें कोठेंहि फिरलें तरी सपाट प्रदेश दिसणार नाहीं. मोटारनें फिरतांना तेथील रस्ते कांहीं ठिकाणीं डोंगरपठारावरून, तर कांहीं ठिकाणीं डोंगर उतारावर डोंगराला खांचा पाडून गेलेले आहेत असें दिसून येईल. कांहीं ठिकाणीं डोंगरपायथ्यानेंहि रस्ते गेलेले आहेत. कांहीं ठिकाणीं नद्या नाले तर कांहीं ठिकाणीं रस्त्याला लागून खोल दऱ्याहि असतात. घाटांतून प्रवास करतांना मोटारच्या बाहेर खालीं पाहिल्यास मोटार पडते कीं काय अशी भीति वाटते. पावसाळ्यांत सर्व डोंगरांवर गर्द झाडीची शोभा दिसत असते व त्यांतून मोटारनें प्रवास करतांना मधुनमधुन स्वच्छ पाण्याचे ओढे वाहत असतांना दिसतात. कांहीं ठिकाणीं लहान धबधबेहि आहेत. पाऊस पडत असला तर पुराचें पाणी लाल असतें. कारण तेथील मातीचा रंग लाल आहे. त्यामुळें पाण्याचा रंगहि लाल दिसतो. उन्हाळ्यात जातांना मोटारनें लाल धुरळा उडतो व त्यामुळें उतारूंचे कपडे लाल होतात. कोंकणांतून मनुष्य आला हें त्याच्या कपड्यांवर लाल रंगाचा जो धुरळा बसतो त्यावरून सहज ओळखतां येतें.

जिल्ह्याच्या पूर्व बाजूनें प्रवास करतांना सह्याद्रीच्या रांगा दिसतात, मधून मधून डोंगराचीं शिखरें आकाशाला भिडलेलीं दिसतात, तर पश्चिमेकडे प्रवास करतांना नारळ पोफळीचीं गगनचुंबी झाडें वाऱ्यानें डुलत असलेलीं दिसतात.

या जिल्ह्यांतील रस्ते नागमोडी वळणाचे व फार अरुंद आहेत. बऱ्याच ठिकाणीं दोन मोटारी परस्परविरोधी दिशेनें सहज हाकतां येत नाहींत. त्या जवळ आल्या कीं त्यांचा वेग थांबवून त्या एकमेकांजवळून सावधगिरीनें पार

पाडाव्या लागतात. त्यामुळें या भागांत ड्रायव्हर चांगला कसलेला असावयास पाहिजे, नाहींतर अपघातांची भीति फार असते.

## रस्ते

मुंबई–गोवा रोड हाच या भागांतील मुख्य राजमार्ग आहे. हा साधारणतः जिल्ह्याच्या मध्यभागांतून ( दक्षिणोत्तर ) जातो असें म्हणावयास हरकत नाहीं. हा रस्ता क्रॉंकीटचा करण्याची दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तरतूद केलेली आहे असें म्हणतात. या मार्गानेच मुंबईशीं मोटारनें मुख्यतः दळणवळण चालतें. या शिवाय देशा ( घाट ) ला जोडणारे चार पांच प्रमुख रस्ते आहेत. खेड सातारा रस्ता हा त्यापैकीं एक आहे. कुंभार्ली, आंबा, फोंडा व आंबोली हे चार घाट ( रस्ते ) प्रमुख असून या रस्त्यांनीं कोंकण व देश यांच्यांत मोठा व्यापार चालतो. कुंभार्ली घाट म्हणजेच चिपळूण कऱ्हाड रस्ता. चिपळूण कऱ्हाड अंतर साठ मैल असून चिपळूण हें उत्तर रत्नागिरींतील व्यापाराचें मोठें ठाणें आहे. कऱ्हाडहून कांदा, मिरची, गूळ वगैरे माल चिपळूणला येतो. हा रस्ता हल्लीं 'डांबरी' करण्यांत आला आहे. रत्नागिरी कोल्हापूर रस्त्याच्या कांहीं भागास आंबा घाट म्हणतात. हा कॉंक्रीट रोड तयार करण्यांत येत आहे. बहुतेक काम पूर्ण होत आलें आहे. फोंडा घाटानें कणकवली पेटा व देवगड तालुक्याचें दळणवळण चालतें व आंबोली घाटानें सावंतवाडी, वेंगुर्ला महालाचें बेळगांवशी दळणवळण चालतें. याशिवाय तिवरा, बावडा व अणस्कुरा घाट आहेत पण तेथें पाय रस्ते आहेत. सध्यां अणस्कुरा घाटाचें ( ता. राजापूर ) काम चालू झालें आहे.

## तालुके–पेटे

पूर्वीं या जिल्ह्यांत आठ तालुके व तीन पेटे होते पण आतां प्रादेशिक फेरफार करण्यांत येऊन ११ तालुके व ४ पेटे करण्यांत आले आहेत. ( १ ) ( उत्तरेकडे ) मंडणगड तालुका ( हा पूर्वीं दापोली तालुक्यांत पेटा होता ), ( २ ) खेड, (३) दापोली, (४) चिपळूण, (५) गुहागर ( पूर्वीं गुहागर पेटा चिपळूण तालुक्यांत होता. त्याचा स्वतंत्र तालुका बनविण्यांत आला. ), (६) संगमेश्वर, (७) राजापूर, (८) रत्नागिरी, (९) देवगड, (१०) मालवण, (११) सावंतवाडी (हें पूर्वीं संस्थान होतें,) पेटे लांजें ( हा राजापूर तालुक्यांतील कांहीं गांवें घेऊन

बनविण्यांत आला आहे.) (१२) कणकवली, ( देवगड तालुक्यांतील कांहीं गांवांचा बनविण्यांत आला, ) (१३) वेंगुर्लें, (१४) कुडाळ. ( सावंतवाडी तालुक्यांत ) ( पेट्याला-महाल असेहि म्हणतात. )

सध्यांच्या रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुका व कणकवली पेटा यांच्या दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यांतील ३०–३५ गांवें आहेत. परंतु हीं गांवें पंतअमात्य (बावडेकर) यांच्या जहागिरींतील असल्यामुळें व ती जहागीर कोल्हापूर छत्रपतींच्या कक्षेंत असल्यामुळें, कोल्हापूर संस्थान विलीन होऊन त्याचा जिल्हा बनविण्यांत आला. त्यावेळीं हीं गांवें कोल्हापूर जिल्ह्यांत गेलीं.

सावंतवाडीचा टापू व रत्नागिरी यांत विशेष फरक नाहीं व आतां तो रत्नागिरी जिल्ह्याचाच एक भाग झाला आहे. या भागांतहि लोखंड, अभ्रक वगैरेच्या खाणी निघूं शकतील येथें खनिज संपत्ती भरपूर आहे. सावंतवाडी हें शहर प्रेक्षणीय आहे. या ठिकाणीं लाकडाचीं रंगीत खेळणीं, पाट वगैरे करण्याचे कारखाने आहेत. येथून खेळणीं व पाट वगैरे मुंबईसारख्या शहरांत निर्यात होतात.

आंबोली घाट असून याच घाटानें बेळगांवला जाता येतें. या घाटांतील आंबोली हें गांव थंड हवेचें या भागांतील ठिकाण आहे व या दृष्टीनें त्याची सुधारणा सरकारनें करावयास पाहिजे.

## जलमार्ग

मुंबईतील भाऊच्या धक्कावरून कोंकण लाईनला रोज बोटी. सुटतात. दाभोळ, पूर्णगड, वेंगुर्लें या तिन्ही लाईनच्या बोटी सुटतात. बोटीनें गेल्यास सदर जिल्ह्यांतील हर्णै, दाभोळ, पालशेत, बोऱ्या, जयगड, तिवरी, रत्नागिरी, रनपार, पूर्णगड, मुसाकाजी, आचरें, मालवण, वेंगुर्लें ह्या बंदरांत उतरतां येतें. दाभोळ जयगड, विजयदुर्ग, मुसाकाजी हीं बंदरें नदीच्या मुखाशीं असल्यामुळें या बंदरापासून लॉंचनें पूर्वेकडे वीस पंचवीस मैल जातां येतें व तेथें लॉंच सर्व्हिसेस सुरू आहेत. मुंबईचा माल गलबतांनीं खाड्यांत व्यापारी नेतात त्यामुळें गलबतांची वाहतूक उन्हाळ्याचे दिवसांत आठ महिने चालू असते. आगबोटीची वाहतूकहि सप्टेंम्बर ते मेपर्यंत चालू असते. चार महिने वादळ अगर पावसामुळें बोटी बंद ठेवण्यांत येतात. खाड्यांतून होड्यांनीं स्थानिक दळणवळण चालू असतें.

## पिकें

जिल्ह्यांत मुख्य पिक भाताचें व त्याचे खालोखाल नागली, हरीक, वरी हीं पिकें असून इतर पिकें, फुलझाडें धरून एकुण ७४४,५८६ एकर जमीन पिकाखालीं आहे.

## मत्स्योद्योग

मत्स्योद्योग हा इकडील समुद्रकांठच्या मोठा धंदा आहे. रत्नागिरी. जैतापूर, देवगड, मालवण, वेंगुर्लें व शिरोडे येथें या धंद्याची केंद्रें असून तेथें 'शार्कलिव्हर ऑइल' काढण्यांत येतें. जिल्ह्यांत माशाचें दरसाल उत्पन्न सुमारें ८ लाख मण येतें, त्याची किंमत सुमारें ७०,००,००० रु. येते. मासे खारवण्याचें काम या जिल्ह्यांत चालतें. दरसाल सरासरी १२८,००० मण मासे खारवण्यांत येतात. जिल्ह्यांत ४ मत्स्योद्योग शाळा आहेत. मासेमारीचा धंदा करणाऱ्या सहकारी मंडळ्या असून येथून मासे मुंबई, कोल्हापूर वगैरे भागांत विक्रीसाटीं पाठविण्यांत येतात. या धंद्याचें अधिक प्रमाण जिल्ह्याच्या दक्षिण भागांत आहे.

## मिठागरें

पूर्वीं जिल्ह्यांत मिठागरें बऱ्याच ठिकाणीं होतीं व सध्यां मालवण, वेंगुर्लीं येथें लहान स्वरूपांत आहेत. मात्र शिरोडे येथें मिठागरें मोठ्या प्रमाणांत आहेत.

## इतर उद्योगधंदे

काताचा धंदा, कात तयार करणें, हिरडा, कातडी कमावणें, औषधें, बांबूचा धंदा, लाकडांची खेळणी तयार करणें वगैरे धंदे किरकोळ स्वरूपांत कांहीं ठिकाणीं चालतात

मालगुंड ( ता. रत्नागिरी ) व वेंगुर्लें भागांत कांही ठिकाणच्या वाळूंत इल्मिनाइट नांवाची धातू सांपडते असें आढळून आल्यामुळें तेथील वाळू परदेशीं पाठविण्यांत येऊं लागली आहे.

हातमागावर कापड विणण्याचे धंदे म्हासळ, दाभोळ, खेड, कणकवली, कुडाळ, जाभारी, माखजन या ठिकाणी पूर्वीं जोरांत चालत असत. परंतु मुंबईतून लोक कापड आणू लागल्यामुळें हे धंदे आतां तेथें अवशेषरूपानें दिसतात.

## उन्हाळीं

आरवली व राजवाडी ( ता. संगमेश्वर ) व राजापूर येथें गरम पाण्याचे झरे आहेत. तेथें लोक स्नानासाठीं जातात.

धामापूर ( ता. मालवण ) येथें मोठा तलाव आहे. काजुर्ली [ ता. गुहागर ] येथें सड्यावर [ कातळांत ] पांढऱ्या रंगाची चिकट माती आहे. त्या मातीच्या आसपासच्या आठ दहा गावांतील लोक भाद्रपदांत गणपतीच्या मूर्ती करतात व त्या मातीला गणपतीची माती असेंच तेथे म्हणतात. अशा प्रकारची माती आजूबाजूला त्या भागांत कोठें नाहीं.

## जांभा दगड

जांभा नांवाचा लाल रंगाचा दगड या भागांत सर्वत्र आढळतो. त्याचा इमारती बांधण्यासाठीं उपयोग होतो. परंतु त्या दगडाचे भिंतीला उपयुक्त असे तुकडे काढणें महाग पडतें; तें काम मशीनवर सुरू झाल्यास बांधकामाला स्वस्त भावात दगड उपलब्ध होईल.

जिल्ह्यांत एकूण ३० लाख एकर जमीनीपैकीं फक्त ७ लाख एकर जमीन लागवडीखालीं आणली जाते. पडित जमीन सुमारे १० ते १२ लाख एकर आहे. बिनलागवडीची किंवा लागवडीला उपलब्ध नसलेली जमीन ८ ते १० लाख एकर आहे.

इतर जिल्ह्यांची तुलना केल्यास असें दिसून येतें कीं, उपलब्ध असलेल्या एकूण जमिनीपैकीं सर्वांत कमी जमीन या जिल्ह्यांत लागवडीखालीं आणली जाते. बिनलागवडीच्या प्रदेशांत इतर जिल्ह्यांत जंगलें आहेत. त्या दृष्टीनें या जिल्ह्यांत जंगलेंही फार कमी आहेत.

या जिल्ह्यांत ३ लाख एकर जमिनीपासून भाताचें उत्पन्न सुमारें ८०,००० टन येतें, परंतु कुलाबा जिल्ह्यांत ३·१ लाख एकर जमिनीपासून १.४२ लाख टन उत्पन्न मिळतें. ठाणे जिल्ह्यांत ३.६ लाख एकर जमिनीपासून १.७२ लाख टन उत्पन्न मिळतें.

दुसरी विशेष गोष्ट म्हणजे लोकवस्ती फार दाट आहे. ती दर चौरस मैलास ३३८ असून सबंध राज्याची ( जुन्या मुंबई राज्याची ) सरासरी २७३ होती.

रत्नागिरीपेक्षां जास्त दाट लोकसंख्येचे जिल्हे म्हणजे सुरत, अहमदाबाद व खेड हे आहेत. परंतु ते सुपीक व संपन्न आहेत.

## प्रदेशाच्या विभागाची पद्धति

जुन्या काळीं अनेक गांवांची एक तर्फ, अनेक तर्फ मिळून एक महाल व अनेक महालांचा सुभा असे प्रदेशाचे विभाग असत. महालावरील अधिकाऱ्यांना मामलेदार म्हणत व सुभ्यावरील अधिकाऱ्याला सुभेदार म्हणत असत. कोंकण सुभ्याचें शाहूला आंगऱ्यांकडून दरसाल तीन लाख उत्पन्न मिळत असे.

ब्रिटिश अमदानींतहि बरेच दिवस कागदपत्रांतून तर्फ लिहिण्याची पद्धत असे. सध्यांच्या चिपळूण तालुक्यांतील सावर्डे' गुहागर तालुक्यांतील वेळंब, संगमेश्वर तालुक्यांतील फुणगूस हीं तर्फांचीं ठाणीं होतीं.

इंग्रजांचें राज्य आलें तेव्हां येथील गांवचे अधिकारी, महालाचे अधिकारी व त्यांचे अधिकार, त्याचप्रमाणें न्यायखातें वगैरे सर्व बाबतींत इंग्रजांनीं ठिकठिकाणीं पहाणी करून फेरफार करून नवीन व्यवस्था केली; नवीन अधिकारी नेमले. 'गांव पोलीसपाटील' ही जागा इंग्रजाच्या कारकिर्दींत निर्माण झाली.

रत्नागिरी जिल्ह्याच्या कांहीं भागांत परंपरेचे अधिकार अथवा जे सत्ताप्रकार होते त्यांत खोती हक्काचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. देशमुखीचे अधिकार आदिलशहाचे वेळीं असल्याचें आढळून येतें. कांहीं ठिकाणीं देशमुखी वतनें असल्याचे उल्लेख सांपडतात. परंतु शिवाजीनंतरच्या काळांत 'देशमुखी'चा हुद्दा दिसत नाहीं. अर्थात तो हुद्दा त्यावेळीं रद्द करण्यांत आला असावा. 'तर्फ' वरील अधिकाऱ्यांना शेखदार म्हणत. ब्रिटिश अमदानींतहि सरकारी कागदपत्रांतून 'तर्फ'चा उल्लेख आढळतो. परंतु तेथील अधिकाऱ्याचा मात्र कोठें उल्लेख दिसत नाही. (शिवाजीनें मुसलमानी राज्याच्या वेळीं असलेलें देशमुखपद नष्ट केलें असें म्हणतात.)

कांहीं गांवांत 'मोकासा' म्हणूनहि एक प्रकारचा हुद्दा असल्याचें आढळून येतें. कुळकर्णी, मिराशी, महाजन, मुकादम, चौघुला असेहि

तेथें हुद्दे होते.

## जमीन महसूल पद्धति

या मुलखाची मोजणी मलिकंबर यानें घालून दिलेल्या पद्धतीनें करण्यांत आली होती. सदाशिवराव भाऊ पेशवे यानीं नवीन मोजणी नव्या पद्धतीनें केली. त्यानीं जमिनीची पहाणी करून जमिनीची प्रत लावून कायमधारा केला. मलिकंबरच्या पद्धतीला तनखा व भाऊसाहेबांच्या पद्धतीला कमाल पद्धति म्हणत. तनखा पद्धती बऱ्याच ठिकाणीं सुरू होती. शालिवाहन शके १७०२ च्या सुमारास कोंकणांत कल्याणपर्यंत भाऊसाहेबांच्या पद्धतीनें मोजणी झाली. इंग्रजांशीं पुढें झालेल्या लढाईमुळें मोजणीचें काम स्थगित झालें. नंतर आठ वर्षांनीं नाना फडणिसांच्या हुकूमानें परशुराम रामचंद्र परांजपे, रघुनाथ त्र्यंबक बर्वे या मामलेदारांनीं सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरी व विजयदुर्ग या महालांची जमीन पहाणी केली.

पेशवाईत या भागांत 'ऐनजिनसी' जमीन महसूल देण्याची प्रथा होती. ब्रिटिश अमदानींतहि सुरवातीला कांहीं काळ ही पद्धत चालू होती.

## खोती हक्क

आदिलशाहींत युसुफ आदिलशहाच्या वेळीं रत्नागिरी जिल्ह्यांतील बराच भाग लागवडीखालीं नव्हता. त्यावेळीं तो भाग लागवडीखालीं आणण्यासाठीं कांहीं लोकांना 'खोती'च्या सनदा देण्यांत आल्या. या सनदा त्यावेळीं लष्करांत असलेल्या व सरकारी कारकून असलेल्या लोकांना बऱ्याच प्रमाणांत मिळाल्या आणि ते खोत झाले. या खोतांमध्यें मागाहून प्रत्येक माणसाच्या सामर्थ्याप्रमाणें बदल घडून आले आहेत. सामर्थ्यवान पक्षानें अल्पबळाच्या खोतांना नष्ट केल्याचे प्रकार अनेक ठिकाणीं घडले. रत्नागिरी जिल्ह्यांत ब्रिटिश अमदानींत सर्व सेटलमेंट होईपर्यंत (इ. स. १८७७ ते ७९) बहुतेक सर्व खोतीं गांव होते. या सर्व सेटलमेंटच्या वेळीं कांहीं गांवांतील लोकांनीं खोती पद्धत खालसा केल्याचें नोंदवून घेतलें. नंतर या खोतांच्या हक्कासंबंधीं प्रश्न निर्माण झाले. त्यावेळीं त्यांच्या अधिकारांत सुसूत्रता आणण्यासाठीं इ. स. १८८० सालीं 'खोती सेटलमेंट कायदा' अस्तित्वांत आला. यापूर्वी एकदां इ. स. १८७४ मध्यें खोतांचे हक्क काय आहेत

हें समजण्यासाठीं ब्रिटीश सरकारनें खोती कमिशन नेमलें होतें. नंतर भारत सरकारच्या कारकीर्दींत १९५० सालीं खोती हक्क नष्ट करण्यांत आला. संस्थानिकांनीं इंग्रजांना खंडणी दिल्यावर जसे अंतर्गत अधिकार संस्थानिकांच्या हातांत असत, त्याचप्रमाणें गांवचा जमीनमहसूल सरकारला भरल्यानंतर कांहीं विशिष्ट अधिकार (हक्क) खोताकडे असत. खोती हक्क वारसा, खरेदी अगर गहाणाच्या पद्धतीनें बदलत. त्यामुळें 'खोत' बदलत असत

१८८० नंतर खोती गांव नसलेल्या गांवांतहि ठराविक लोकाना खोत म्हणण्याची पद्धत होती व १८८० च्या पूर्वीच्या कागदपत्रांवरून तेथें खोती सत्ता असल्याचें स्पष्ट दिसून येतें. शेती या शब्दाच्या अर्थी हिंदींत वापरण्यात येणाऱ्या खेती या शब्दावरून 'खोत' शब्द निमाण झाला असावा. इ. स. १६०२ मध्यें खोती हक्कास प्रारंभ झाला असें दिसून येतें.

## रानटी जनावरें

रत्नागिरी जिल्ह्यांत वाघ, कोल्हा, तरस, रानडुकर हीं रानटी जनावरें प्रामुख्यानें आढळतात. हरीणाप्रमाणें 'भेकरें' म्हणून एक प्राणी आहे. खवल्या मांजर म्हणून एक मांजराप्रमाणे जनावर आहे. त्याचे अंगावर खवले (कठीण कवच) असतात. माणूस दिसला तर तो कांसवाप्रमाणे मान मागें नेतो. त्याच्या शरीरावर कुऱ्हाडीनें प्रहार केला तरी तो मरत नाहीं. याशिवाय वानर, माकडे, ससा, साळंदर हे प्राणी आहेत. साळंदर ही डोंगरांत गुहा तयार करून आंत रहात असते. तिची वस्ती बंद झाली कीं त्या ठिकाणीं वाघ आपलें आश्रयस्थान करतात.

खेड्यांतून कांहीं ठिकाणीं मगर, उदं व पाण्यांतील वाघुळ हे प्राणी आढळतात. पाण्यांत आढळणाऱ्या वाघळांना पंख नसतात. त्यांना एक शेपटी असते व त्या शेपटीच्या टोकाला एक कांटा असतो. सह्याद्री भागांत तुरळक प्रमाणांत घोरपडीहि आढळतात.

## साप

या भागांत नाग, फुरसें, मणियार, अजगर, चितई, नानेटी, घोणस, कांडर वगैरे जातीचे साप आहेत. या भागांतील नागांचा रंगपिवळा असतो. फुरसें हा साप सुमारें एक दीड फूट लांबीचा असतो. परंतु फार विषारी असतो हा साप सर्वत्र

आढळतो. त्याच्या अंगावर काळे ठिपके असतात. घोणस हा सुमारें चार पांच फूट असून तो जाड असतो. त्याच्याहि अंगावर काळे ठिपके असतात. तो प्रत्यक्ष सहसा दंश करत नाहीं, परंतु त्याच्या लाळेवर पाय पडला तर विष बाधतें असें म्हणतात.

नानेटी हा झाडावर असतो. त्याचा रंग हिरवा असतो. अजगर, चितई हे साप फार मोठे असतात. ते शेळ्यांना अगर माणसालाहि गिळूं शकतात. या शिवाय आधलें नांवाचा साप असतो; तो रविवारीं चावला तर त्याचें विष बाधतें, इतर दिवशीं त्याला विष नसतें असें म्हणतात. याशिवाय पाण्यांत असणारी एक बिनविषारी सापाची जात आहे.

'सरडा' नांवाचा सुमारें सहा इंच लांबीचा प्राणी आहे. त्याचें डोकें लाल असतें, तो माणसाप्रमाणे शीळ घालतो. चोपई नांवाचा सरड्याप्रमाणें एक प्राणी सर्वत्र आढळतो. हे प्राणी झाडावर जास्त प्रमाणांत असतात. खार हाही प्राणी सर्वत्र आहे.

## हापूसची जन्मकथा

या भागांतील हापूसचा आंबा प्रसिद्ध आहे. हापूस हें नांव कसें पडलें त्या बाबतची माहिती अशी सांगतात कीं, अल्फान्झो नांवाच्या पोर्तुगीज गृहस्थानें या आंब्याच्या कलमाचा प्रथम शोध लावला, नंतर त्याचा सर्वत्र प्रसार झाला. त्या गृहस्थाचें नांव कलमास लोकांनीं दिलें. तेव्हां अल्फान्झोचा अपभ्रंश 'हापूस' झाला.

## रामफळ

रामफळ म्हणून एक फळ या जिल्ह्यांतील कांहीं भागांत आहे. हें फळ साधारणतः आकारानें सीताफळापेक्षां जरा मोठें असून तें पिकल्यावर त्याचा रंग गुलाबी असतो. साल फार नाजूक असते. ही फळें पौष महिन्यांत तयार होतात.

## कोंकणाचा टोमॅटो (कोकम)

कोकमाचीं झाडेंहि या जिल्ह्यांत आहेत. यांना पाणी वगैरे लागत नाहीं. ती आंब्याफणसाच्या झाडाप्रमाणें होतात. कोकमाच्या बियांचें तेल काढतात, त्याचाहि कांहीं दुखण्यावर उपयोग होतो. कोकमाचें उत्पन्न चांगलें काढतां येण्याजोगें या भागांत आहे. कांहीं भागांत कोकमाच्या झाडाला 'रातांबी' व फळाला रातंबा म्हणतात व कोकम सोलांना 'आमसुलें म्हणतात. कोकम सोलांना मुंबईंत फार

मागणी असते. कोकमाचें फळ मध्यम टॉमेटोएवढें असतें. त्याचा रंग काळसर तांबूस असतो. शहरांतील लोक बोलतांना टोमॅटोची उपमा देतात तशी कोंकणांतील खेड्यांत कोकमची ( रातंब्याची ) उपमा देतात.

शेवरींचीं ( सावरीची ) झाडें या जिल्ह्यांत बऱ्याच प्रमाणांत सर्वत्र दिसून येतात. या झाडाच्या कापसाच्या गाद्या, उशांसाठी उपयोग होतो व लांकडाचा आगपेट्यासाठीं उपयोग होतो.

उंडीण व कवटी या नांवाचीं झाडें असून त्यांच्या फळांपासून जळणासाठीं तेल काढतात.

## वनस्पति व फळझाडें

रत्नागिरी जिल्ह्यांत वनौषधी बऱ्याच प्रमाणांत आहेत. त्याचप्रमाणें कांहीं ठिकाणीं इमारती लाकूडहि चांगले आहे. परंतु त्याची पद्धतशीर लागवड करण्यांत येत नाहीं व योग्य ती काळजी न घेतल्यामुळें त्याचें उत्पन्न तेथील लोकांना मिळूं शकत नाहीं.

आंबा व फणस ही कोंकणाला निसर्गाची देणगी आहे. कोंकणचे गरीब लोक आंब्यावर व फणसाची भाजी आणि गरे खाऊन सुमारें दोन महिने जीवन कंठतात. त्याशिवाय फणसाचें लांकूड इमारतीच्या उपयोगी आहे. आंब्याचें झाड पुष्कळ जुनें असलें तर त्याच्या फळ्या पाडून त्याचाहि घरांना उपयोग होतो. आंब्याच्या झाडाच्या होड्या करतात.

## साग

सागाचें झाड इमारतीच्या उपयोगी असून तो रत्नागिरी जिल्ह्यांत चांगला होतो. सागाची बी औषधी आहे, याशिवाय बिब्याचीं झाडें या जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं असून बिब्बा फार औषधी आहे. शरीरावर एखाद्या ठिकाणीं मार बसला तर बिब्बा कापून त्या ठिकाणी दाबतात, कधीं कधीं तो बिब्बा तापवून दाबतात. बिब्याचें तेल केस गळूं नयेत म्हणून खोबरेलमध्यें मिसळून डोक्याला लावतात.

कुचला ( काजरा ) चीं झाडेंहि ह्या भागांत भरपूर आहेत. खरूजेवर कुचल्याची बी उगाळून लावतात. ही बी कडू असून विषारी आहे.

आवळ्याचीं झाडेंहि बरींच असून आवळ्याचें लोणचें करतात व अनेक औषधांत आवळ्याचा उपयोग होतो.

हिरड्याचें झाड हें इमारतीला उपयोगी असून हिरड्यांचा उपयोग रंगासाठीं होतो. कोवळे हिरडे सुकवितात व त्याचा उपयोग औषधासाठीं करतात. त्यांना 'बाळहिरडा' असें म्हणतात. हिरड्यांची निर्यात या जिल्ह्यांतून बऱ्याच प्रमाणांत होते.

## वड–पिंपळ

वड व पिंपळाच्या झाडांचा विस्तार फार मोठा असतो. हीं झाडें या भागांत बरींच आहेत. पिंपळाच्या सालीचा औषधासाठीं उपयोग होतो. वड पिंपळ धार्मिक दृष्ट्या पवित्र वृक्ष आहेत. पिंपळाच्या झाडाच्या बुंध्याच्या सभोंवार चौथरा बांधून, त्याची मुंज करून, रोज पूजा करण्याची प्रथा आहे. वडाची पूजा मात्र वटपौर्णिमेला कांहीं ठिकाणीं स्त्रिया करतात. कांहीं लोकांत भिंतीवर वडाचें चित्र काढून वटपौर्णिमेला त्याची पूजा करतात. वडाच्या पानांच्या पत्रावळी लावतात.

आयन ( आईन ) किंजळ, मोहोटी, कुंभा हीं इमारतीला उपयोगी पडणारीं झाडें या भागांत आहत.

याशिवाय शेवग्याची झाडें आहेत. त्याच्या शेंगांची व फुलांची भाजी करतात.

पारिजातकाचीं झाडें कोंकणांत बरींच आहेत. सफेत चाफा ह्या भागांत सर्वत्र आढळतो. त्याचीं फुलें देवपूजेला वापरतात. विशेषतः ( फाल्गुन महिन्यांत ) ग्रामदेवतेच्या पालखींतील देवांना या चाफ्याच्या फुलांचे हार घालतात.

शतावरी, गुळवेल, दूधवेल, सारवट वगैरे अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती या भागांत भरपूर आहेत.

खैरांच्या लांकडाचा इमारतीला उपयोग होतो. त्याचप्रमाणें त्यापासून कात काढता येतो. म्हणून काताचे कारखानें उन्हाळ्यांत कांहीं ठिकाणीं त्या भागांतून दिसतात. बाभळीचीं झाडेंहि कांहीं ठिकाणीं आहेत.

सुरमाड म्हणून एक झाड आहे. त्याच्या झावळ्या फार शोभिवंत असल्यामुळें शुभकार्यप्रसंगीं मंडप शृंगारण्याकडे त्या झावळ्यांचा उपयोग करतात. या झाडापासून एक प्रकारचा कापूस काढतां येतो. त्या काप-

मान्त्रा उपयोग चकमकीवरून विस्तव पाडून तो पेटविण्यास होतो. होलिकोत्सवाच्या वेळीं हें झाड उचलून आणून उत्सवाच्या ठिकाणीं उभें करण्याची कांहीं ठिकाणीं प्रथा आहे.

जांभळाची झाडें या भागांत असून त्यांची इमारती लाकूड म्हणून गणना आहे. करवंदाचीं झाडें या भागांत सर्वत्र आहेत.

—०×०—


# बेडेकर मसाले




लोणचीं — पापड

आमच्या सर्व दुकानीं
मिळतात.

卐

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स, प्रायव्हेट लि.

मुगभाट मुंबई नं. ४.

दुकानें:— ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23060 वि: ...
क्रमांक 233 नों दि: 29/3/80

# जाती-जमाती

रत्नागिरी जिल्ह्यांतील निर्मिती व भौगोलीक स्थिति यांची मागल्या प्रकरणांत माहिती दिली. आतां या भागांतील लोकांच्या वसाहती व जाती यासंबंधी माहिती देत आहे.

या जिल्ह्यांत ब्राह्मण, मराठे, भंडारी, कुणबी, महार, (आतां नवबुद्ध) चांभार व मुसलमान असून कांहीं भागांत ख्रिश्चन आहेत.

ब्राह्मण समाजांत या भागांत चित्तपावन ( कोंकणस्थ ), कऱ्हाडे, देवरुखे या पोटजातींचे ब्राह्मण व सारस्वत ब्राह्मण प्रामुख्यानें दिसून येतात. देशस्थ ऋग्वेदी व देशस्थ यजुर्वेदी ब्राम्हणांची या जिल्ह्यांत सह्याद्रीच्या पायथ्याशीं गांवांत क्वचित ठिकाणीं वस्ती आहे. त्यांचे सोयरसंबंध देशावरील भागांत फार असतात व त्यांची वस्तीहि देशाला नजीक अशाच भागांत दिसून येते.

## ब्राम्हणांची वसाहत

या भागांत ब्राम्हणांची वसाहत बऱ्याच वर्षांपूर्वीची( इ. स. १०–११ व्या शतकापासून ) दिसून येते. १३ व्या शतकांतहि या भागांतील ब्राह्मणांची वागणूक कशी होती हें त्यावेळच्या एका प्रवाशानें लिहिलेल्या पुढील वर्णनावरून दिसून येतें. त्यावेळच्या पद्धतीशीं आजहि बरेंच साम्य दिसून येतें.

मार्को पोलो नांवाचा एक व्हेनिस नगरचा व्यापारी हिंदुस्थानांत १३ व्या शतकांत प्रवासासाठीं आला होता. त्यानें कन्याकुमारी येथें मुक्काम करून आपल्या प्रवासाचें वर्णन लिहिलें. तो कोंकण प्रांताबद्दल लिहितो कीं, “ या प्रांतांतील ब्राह्मणांइतके हुशार लोक सर्व जगांत मिळावयाचे नाहींत. केवढेंहि संकट आलें तरी ते खोटें बोलत नाहींत, दारू व मांस ह्यांस शिवत सुद्धां नाहींत. आपल्या नायकांशीं ते विशेष अनुरक्त आहेत. ते मूर्तिपूजक असून शकुनावर भरंवसा ठेवतात. ते यज्ञोपवीत धारण करतात. ताक भात खाऊन फार दिवस जगतात. शेंदीडशें वर्षे कोंकणी लोक जगल्याचीं

उदाहरणें आहेत. कित्येक लोक अंगाला भस्म फांसून साधुवृत्तीत राहतात. ते लोक जेवणास केळीचीं पानें वापरतात. ते जीवजंतु मारीत नाहींत. ( श्री. गो. स. सरदेसाईकृत मुसलमानी रियासत, भाग १ ला. )

वरील उताऱ्यावरून १३ व्या शतकांत सुद्धां कोकणांत ब्राह्मणांची वस्ती असून ते त्या काळांतहि बुद्धिमान समजले जात हें स्पष्ट होतें.

आजच्या काळांतहि हे लोक पुणें मुंबईंतच नव्हे, तर सर्व भारतांतील भागांत असून ते पुढें आलेले दिसतात.

## चित्तपावन

या भागांतील चित्तपावन ( कोंकणस्थ ) ब्राह्मणांचीं अनेक घराणीं पेशवाईच्या काळांत देशावर गेलीं व तीं कारकुनी व सरदारी या दोन्ही पेशांत सारख्याच तडफेनें चमकलीं. पेशव्यांच्या पूर्वीं मात्र या समाजांतील लोक फारसे पुढें आलेले दिसत नाहींत. त्याचें कारण या लोकांची वस्ती कोंकणांत होती व त्या काळांत लढाईचे प्रसंग देशावर घडले. त्यावेळीं सैन्यांत ब्राह्मण फारसे नसत. परंतु बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या उदयाबरोबर अनक कोकणांतील ब्राह्मणांनीं शिपाईगिरी पत्करली व कोंकणांतील आपलें दारिद्र्य हटविण्यासाठीं ते देशावर जाऊन कर्तबगारी करूं लागले. त्यांना संधि लाभल्यामुळें त्यांच्यांतील शक्ति व बुद्धी प्रकर्षानें झळकूं लागली. त्या समाजांत बरेच कर्तबगार योद्धे व मुत्सद्दी निर्माण झाले व महाराष्ट्राच्या पराक्रम व कीर्तीच्या क्षेत्रांत त्यांनीं मोलाची कामगिरी केली.

## कऱ्हाडे ब्राह्मण

कऱ्हाडे ब्राह्मणांची कोंकणांतील वस्ती फार पूर्वींची असावी. या समाजांतील लोकांचें आतां अस्तित्व नाहीं, अशा अनेक ठिकाणीं पौरोहित्य, ग्रामीण देवतेसंबंधीं व अन्य प्रकारचे हक्कदार हे लोक असल्याचें दिसून येतें. अद्याप बऱ्याच ठिकाणीं हे लोक निरनिराळ्या प्रकारचे पुरातन हक्कदार आहेत. या लोकांतील बऱ्याच घराण्यांत भवानीच्या नवरात्रीची प्रथा दिसून येते. खोत, कुळकर्णी, महाजन, इनामदार व पौरोहित्याचे अधिकारी या समाजांतील लोक बरेच असून साधारणतः १०–११ व्या शतकापासूनची त्यांची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यापूर्वींचीहि तेथें त्यांची वस्ती असावी असें वाटतें.

पेशवाईंत या समाजांतील बरींच घराणीं देशावर जाऊन लष्करी, कारकुनी व विद्वान म्हणून पुढें आलीं. 'मोकासा' म्हणून अधिकारीहि या लोकांत होते.

## देवरुखे ब्राह्मण

जयगड खाडींत ( संगमेश्वर, चिपळूण, रत्नागिरी, चिपळूण तालुक्याचा भाग ) देवरुखे ब्राह्मणांची प्रामुख्यानें वस्ती असून, दाभोळ खाडींतहि कांहीं वस्ती आहे.

खोत, कुळकर्णी व पौरोहित्याचे अधिकारी या समाजांतील लोक असल्याचें दिसून येतें. कोल्हापूरच्या भवानीच्या नवरात्राची प्रथा या समाजांतील बहुतेक घराण्यांत आहे. यावरून हे मूळचे करवीर प्रांतांतील असावेत असें मानतात. तथापि त्यांची कोंकणांत अनेक शतकांपूर्वींची वसाहत आहे. समाजाची सांपत्तिक परिस्थिति गरीबीची असली तरी त्यांची कणखर सरंजामी पद्धतीची वागणूक दिसून येते. पाटाच्या पाण्याच्या ठिकाणीं या लोकांची रहाण्याची पद्धत आहे. पाटाचें पाणी डोंगराळ भागांत उपलब्ध असतें, त्यामुळें डोंगराळ भागांतच या लोकांची घरें अधिक दिसतात. हे स्वतंत्र बाण्याचे लोक आहेत. यांना देवरुखे उर्फ देवर्षि ब्राह्मण असें संबोधतात.

कऱ्हाडे ब्राह्मणांच्या वस्तीच्या ठिकाणीं ही पाटाचें पाणी अधिक प्रमाणांत दिसून येतें. तर चित्तपावन ब्राम्हणांच्या वस्तीच्या ठिकाणीं विहिरीचें पाणी असतें हें त्याचें वैशिष्ट्य आहे.

## सारस्वत ब्राह्मण

सारस्वत ब्राह्मणांची वस्ती दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यांत जास्त दिसून येते. ते लोकहि खोत, कुळकर्णी व इतर तऱ्हेचे हुद्देदार दिसतात. त्यांच्यांतील लोक कारकुनींत व शिपाईगिरींत तडफेनें चमकलेले आहेत.

याशिवाय दैवज्ञ ब्राह्मणांची वस्ती या भागांत अधूनमधून कांहीं ठिकाणीं असून ते सोनेंचांदीचे दागिने करण्याचा व्यवसाय करतात. कान टोंचणें, लग्नप्रसंगीं ठराविक दागिने करणें असे त्यांचे हक्क आहेत. कांहीं ठिकाणीं हे लोक खोतहि आहेत.

## कोंकण, करहाटक

चित्तपावन, कऱ्हाडे, देवरुखे, देशस्थ हे शाकाहारी ब्राह्मण आहेत. रा. ब. काशीनाथ नारायण साने यांचें मत कोंकणांतील ब्राह्मणांच्या वसाहती संबंधी असे आहे कीं, कोंकण प्रांताची व्याप्ति पूर्वी सांप्रतच्या इतकी नव्हती. परशुरामानें केरळ, कुन्तल, करहाट, कोंकण, कीटक असे सात प्रांत समुद्र हटवून निर्माण केले. त्याप्रमाणें कोंकणची व्याप्ति चिपळूण, खेड, दापोली, संगमेश्वर, रत्नागिरी या तालुक्यांपुरती आहे. म्हणजे उत्तरेस सावित्री नदीपासून दक्षिणेस मुचकुंदी यामधील प्रदेश तेवढाच कोंकण होय. वाशिष्ठी नदीच्या दोन्ही बाजूच्या प्रदेशाला कोंकण म्हणत व त्यांत रहाणारे ते कोंकणस्थ. त्याच चार तालुक्यांत सांप्रत सुद्धां कोकणस्थांचा भरणा विशेष आहे. त्या कोंकणच्या दक्षिणेस लागूनच मालवणपर्यंतचा जो प्रदेश त्याला करहाट ही संज्ञा आहे. त्या प्रदेशांत रहाणारे ते करहाटे (कऱ्हाडे). कऱ्हाडे ब्राह्मणांचा भरणा राजापूर, देवगड तालुक्यांत विशेष आहे. त्याचे दक्षिणेस मालवण, वेंगुर्लें, सावंतवाडी, गोमंतक, कानडा या प्रांतांत गौड सारस्वत व सारस्वत यांचा भरणा विशेष आहे.

## जवळ वा खोत ब्राह्मण

जवळ वा खोत ब्राह्मण ह्या जातीचे ब्राह्मण विशेषतः दापोली, खेड तालुक्यांत कांहीं ठिकाणीं आहेत. सदर तालुक्यांतील बुरोंडी गांवाच्या आसपासच्या भागांस जवळखोरा म्हणतात. या ब्राह्मणांच्या वस्तीवरून हें नांव पडलें असावें.

अलिबागेस श्रीमंत बिवलकर सरदार यांच्याकडे, व भोर येथें पंत सचिव यांचे जवळ या ब्राह्मणांपैकीं बरेच नोकऱ्यांवर असत.

## भंडारी

रत्नागिरी जिल्ह्यांत समुद्र किनाऱ्याला भंडारी लोकांची वस्ती जास्त आहे. नारळ माडापासून माडी काढणें व दारू विक्रीचा व्यवसाय ब्रिटिशांच्या वेळी हे लोक करीत. कांही ठिकाणीं शेतीचा व नौका नयनाचाहि व्यवसाय ते करीत. हे लोक करारी वृत्तीचे, धाडसी व पराक्रमी असून कला कौशल्याचाहि गुण यांच्यांत प्रकर्षानें दिसतो.

या लोकांची वस्ती आदिलशाहीच्या पूर्वीची असावी असें दिसून येतें. शिवाजीच्या व पेशव्याच्या वेळीं या लोकांचा आरमारांत भरणा होता. गायक, वादक, नट. शिल्पकार म्हणून या समाजांतील बरेच लोक पुढें आलेले आहेत. पेशव्यांच्या वेळीं या समाजांतील लोकांचा आरमारांत भरणा असल्यामुळें राजापूर, देवगड तालुक्यांत या समाजांतील लोकांना जमिनी इनाम मिळालेल्या होत्या.

## चांद्रसेनीय कायस्थ प्रभु

चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंचीं घराणीं ('मराठ्यांच्या) ऐतिहासिक काळांत बरींच पुढें आलीं होतीं. त्यांची वस्ती मंडणगड, खेड व दापोली तालुक्यांत दिसून येते. ह्या लोकांतहि ' खोती ' व कुळकर्णीपदाचे हक्क होते.

## मराठे

या जिल्ह्याच्या सर्व भागांत कमी अधिक फरकानें मराठे लोकांची वस्ती आहे. आदिलशाहीच्या वेळीं सैन्यांत मराठ्यांचा बराच भरणा होता. कोंकणांतील मराठे हे बऱ्याच प्रमाणांत आदिलशाहींत व कांहीं थोड्या प्रमाणांत शिवाजीच्या वेळीं देशावरून कोंकणांत आलेले असावेत असें इतिहासावरून दिसतें. त्यांचीं उपास्य दैवतें देशावरचीं आहेत. या लोकांतील बरेच लोक खोत ' 'इनामदार' होते. हे लोक लढाऊ वृत्तीचे असून अजूनहि त्यांच्यांतील लोक बऱ्याच प्रमाणांत सैन्यांत नोकऱ्या करतात. परंतु त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीचा. एकंदरींत मराठ्यांनींहि देशावरून कोंकणांत येऊन वसाहती केल्या आहेत.

## कुळंबी किंवा कुणबी

कुणब्यांची वस्ती राजापूर ते कुलाबा जिल्ह्यांतील साधारण महाड तालुक्यापर्यंतच्या भागांत विशेष दिसून येते. हे लोक विशेषतः शेती करणारे व शेतांत प्रत्यक्ष कसणारे आहेत. परंतु त्यांच्या मालकीच्या जमिनी अत्यल्प आहेत. यांची वस्ती सरासरीनें पाहिलें तर या टापूत एकूण लोकसंख्येच्या ४० ते ५० टक्के आहे. हा समाज शिक्षणानें मागासलेला परंतु बुद्धीनें ठाणें जिल्ह्यांतील आदिवासीच्या दृष्टीनें पाहिल्यास कितीतरी सुधारलेला असून वृत्तीनें गरीब, प्रामाणिक, विश्वासू आहे. यांना कोकणांत ' कुळंबी,' 'कुणबी' किंवा ' कुळवाडी ' म्हणतात.

## कोंकण, करहाटक

चित्तपावन, कऱ्हाडे, देवरुखे, देशस्थ हे शाकाहारी ब्राह्मण आहेत. रा. ब. काशीनाथ नारायण साने यांचें मत कोंकणांतील ब्राह्मणांच्या वसाहती संबंधी असे आहे कीं, कोंकण प्रांताची व्याप्ति पूर्वी सांप्रतच्या इतकी नव्हती. परशुरामानें केरळ, कुन्तल, करहाट, कोंकण, कीटक असे सात प्रांत समुद्र हटवून निर्माण केले. त्याप्रमाणें कोंकणची व्याप्ति चिपळूण, खेड, दापोली, संगमेश्वर, रत्नागिरी या तालुक्यांपुरती आहे. म्हणजे उत्तरेस सावित्री नदीपासून दक्षिणेस मुचकुंदी यामधील प्रदेश तेवढाच कोंकण होय. वाशिष्ठी नदीच्या दोन्ही बाजूच्या प्रदेशाला कोंकण म्हणत व त्यांत रहाणारे ते कोंकणस्थ. त्याच चार तालुक्यांत सांप्रत सुद्धां कोकणस्थांचा भरणा विशेष आहे. त्या कोंकणच्या दक्षिणेस लागूनच मालवणपर्यंतचा जो प्रदेश त्याला करहाट ही संज्ञा आहे. त्या प्रदेशांत रहाणारे ते करहाटे (कऱ्हाडे). कऱ्हाडे ब्राह्मणांचा भरणा राजापूर, देवगड तालुक्यांत विशेष आहे. त्याचे दक्षिणेस मालवण, वेंगुर्लें, सावंतवाडी, गोमंतक, कानडा या प्रांतांत गौड सारस्वत व सारस्वत यांचा भरणा विशेष आहे.

## जवळ वा खोत ब्राह्मण

जवळ वा खोत ब्राह्मण ह्या जातीचे ब्राह्मण विशेषतः दापोली, खेड तालुक्यांत कांहीं ठिकाणीं आहेत. सदर तालुक्यांतील बुरोंडी गांवाच्या आसपासच्या भागांस जवळखोरा म्हणतात. या ब्राह्मणांच्या वस्तीवरुन हें नांव पडलें असावें.

अलिबागेस श्रीमंत बिवलकर सरदार यांच्याकडे, व भोर येथे पंत सचिव यांचे जवळ या ब्राह्मणांपैकीं बरेच नोकऱ्यांवर असत.

## भंडारी

रत्नागिरी जिल्ह्यांत समुद्र किनाऱ्याला भंडारी लोकांची वस्ती जास्त आहे. नारळ माडापासून माडी काढणें व दारू विक्रीचा व्यवसाय ब्रिटिशांच्या वेळीं हे लोक करीत. कांही ठिकाणीं शेतीचा व नौका नयनाचाहि व्यवसाय ते करीत. हे लोक करारी वृत्तीचे, धाडसी व पराक्रमी असून कला कौशल्याचाहि गुण यांच्यांत प्रकर्षानें दिसतो.

या लोकांची वस्ती आदिलशाहीच्या पूर्वीची असावी असें दिसून येतें. शिवाजीच्या व पेशव्याच्या वेळीं या लोकांचा आरमारांत भरणा होता. गायक, वादक, नट. शिल्पकार म्हणून या समाजांतील बरेच लोक पुढें आलेले आहेत. पेशव्यांच्या वेळीं या समाजांतील लोकांचा आरमारांत भरणा असल्यामुळें राजापूर, देवगड तालुक्यांत या समाजांतील लोकांना जमिनी इनाम मिळालेल्या होत्या.

## चांद्रसेनीय कायस्थ प्रभु

चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंचीं घराणीं ('मराठ्यांच्या) ऐतिहासिक काळांत बरींच पुढें आलीं होतीं. त्यांची वस्ती मंडणगड, खेड व दापोली तालुक्यांत दिसून येते. ह्या लोकांतहि' खोती ' व कुळकर्णीपदाचे हक्क होते.

## मराठे

या जिल्ह्याच्या सर्व भागांत कमी अधिक फरकानें मराठे लोकांची वस्ती आहे. आदिलशाहीच्या वेळीं सैन्यांत मराठ्यांचा बराच भरणा होता. कोंकणांतील मराठे हे बऱ्याच प्रमाणांत आदिलशाहींत व कांहीं थोड्या प्रमाणांत शिवाजीच्या वेळीं देशावरून कोंकणांत आलेले असावेत असें इतिहासावरून दिसतें. त्यांचीं उपास्य दैवतें देशावरचीं आहेत. या लोकांतील बरेच लोक खोत ' 'इनामदार' होते. हे लोक लढाऊ वृत्तीचे असून अजूनहि त्यांच्यांतील लोक बऱ्याच प्रमाणांत सैन्यांत नोकऱ्या करतात. परंतु त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीचा. एकंदरींत मराठ्यांनींहि देशावरून कोंकणांत येऊन वसाहती केल्या आहेत.

## कुळंबी किंवा कुणबी

कुणब्यांची वस्ती राजापूर ते कुलाबा जिल्ह्यांतील साधारण महाड तालुक्यापर्यंतच्या भागांत विशेष दिसून येते. हे लोक विशेषतः शेती करणारे व शेतांत प्रत्यक्ष कसणारे आहेत. परंतु त्यांच्या मालकीच्या जमिनी अत्यल्प आहेत. यांची वस्ती सरासरीनें पाहिलें तर या टापूत एकूण लोकसंख्येच्या ४० ते ५० टक्के आहे. हा समाज शिक्षणानें मागासलेला परंतु बुद्धीनें ठाणें जिल्ह्यांतील आदिवासीच्या दृष्टीनें पाहिल्यास कितीतरी सुधारलेला असून वृत्तीनें गरीब, प्रामाणिक, विश्वासू आहे. यांना कोकणांत ' कुळंबी,' 'कुणबी' किंवा ' कुळवाडी ' म्हणतात.

या लोकांची वस्ती आदिलशाहीच्या पूर्वीची किंवा त्यापेक्षां फार पूर्वीची असावी असें वाटतें. या लोकांचे गांवांत विशिष्ट ग्रामीण हक्क असतात. या लोकांत भुतांखेतांवर जास्त विश्वास दिसून येतो. हे लोक आठ महिने मुंबईत नोकरी धंदा करतात व पावसाळ्यांत चार महिने गांवीं जाऊन शेती करतात. न्हावी, धोबी याप्रमाणें हे लोक 'बलुतेदार' नाहींत. ( हल्ली तिल्लोरी कुणबी म्हणून ओळखण्यांत येणारे लोक हे याच ज्ञातीमधील आहेत. )

याशिवाय वैश्य वाणी या जिल्ह्यांत आहेत. व्यापार हाच त्यांचा पिढीजात व्यवसाय आहे. तेली, न्हावी, धोबी वगैरे बहुतेक लोक देशाप्रमाणें कोंकणांत आहेत. कांहीं ठिकाणीं उत्सवप्रसंगीं मिरवणुकींत अग्रभागीं मशाल धरण्याचा मान न्हाव्यांकडे असतो.

## महार-चांभार

महारांची वस्ती प्रत्येक गावांत असतेच व दोन तीन गांव मिळून एखाद्या गांवांत चांभारांची वस्ती असते. 'गांव तेथें महारवाडा' ही म्हण कोंकणांत प्रचारांत आहे. या म्हणीला कांहीं गांव अपवादहि आहेत महार चांभारांना पूर्वी अस्पृश्य म्हणून संबोधीत, नंतर त्यांना हरिजन हें नांव म. गांधींनीं दिलें. आतां या भागांतील बहुतेक महारांनीं बौद्ध धर्म स्वीकारला आहे.

( बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वी ) महारांचे हिंदू म्हणून कांहीं कर (अधिकार) आहेत. महारांना वेसकर म्हणतात. कारण पूर्वी त्यांचेकडे गांवपहाऱ्याचें काम असे. त्यामुळें वेस म्हणजे 'सीमा' यावरून वेसकर नांव पडलें.

लग्नाचे वेळीं नवरा नवरीसह आपल्या घरीं जातांना 'महार' त्याला अडवून जोहार [ रामराम ] करतो व त्यावेळीं पागोटें अगर १ रुपया देण्याची प्रथा कोंकणांत आहे. त्याचप्रमाणें गांवांची कांहीं ठराविक कामें करण्याबद्दलचा मोबदला म्हणून प्रत्येक घरामागें महारास दरसाल कांहीं धान्य देण्याची पद्धत आहे. या पद्धतीला कोंकणांत 'पुंज' म्हणतात.

ग्रामदेवीच्या उत्सवाच्या वेळीं ढोल वाजविण्याचें काम या महारांकडे असतें. त्याचप्रमाणें गांवांत सरकारी हुकुमाची 'दवंडी' देण्याचें काम महार ढोल वाजवून करतो.

## कांसार

त्वष्टा कांसार लोकांची कांहीं ठिकाणीं वस्ती असून ते तांब्यापितळेचीं भांडीं घडविण्याचा व भांड्यांना कल्हई लावण्याचा धंदा करतात. त्यांच्यापैकीं बरेच लोक मुंबईसारख्या शहरांत भांड्यांचे मोठे कारखानदार आहेत.

त्याशिवाय इकडे बांगडीवाले कासार म्हणून एक जात असून ते खेडेगांवांत बांगड्या विकण्याचा धंदा करतात. ते लोक जैन आहेत. जैन देवतांची ते पूजा करतात. त्यांचीं देवळेंहि आहेत. या लोकांची संख्या अगदीं तुरळक आहे.

## गुरव

या भागांत प्रत्येक ग्रामदेवतेची पूजा करणारे गुरव जातीचे लोक आहेत. या गुरवांमध्यें दोन प्रकार आहेत. एक भविक अथवा भाविक व दुसरे लिंगायत गुरव. भविक गुरव हे मांसाहारी असून लिंगायत हे शाकाहारी आहेत. लिंगायत गुरवांत मुंजीची प्रथा आहे. मुंजीच्या वेळीं ब्राह्मणांमध्यें जसे यज्ञोपवीत धारण करतात तसेंच लिंगायत गुरवांत मुंजीच्या वेळीं गळ्यांत शंकराचें लिंग घालतात. हें लिंग चांदीच्या करंड्यांत घालून तो करंडा दोऱ्यानें बांधून जानव्याप्रमाणें गळ्यांत घालतात. रोज ते त्या शिवलिंगाची पूजा करतात. सर्व शंकराच्या देवळांत हेच लोक पुजारी असतात. लिंगायत गुरवांच्या उपाध्यायांना ( पुरोहितांना ) जंगम म्हणतात. या लोकांचा पंथ कर्नाटकांतील वीरशैव लिंगायतांचा असावा. परंतु ते इकडे मिसळून गेलेले आहेत. कांहीं ग्रामदेवतांचे पुजारी लिंगायत तर कांहीं ठिकाणीं भविक गुरव आहेत

## मच्छीमारी व्यवसायिक

या जिल्ह्यांत कोळ्यांची ( समुद्र किनाऱ्याला ) दापोली तालुक्यांत वस्ती असून ते मासेमारीचा धंदा करतात. या कोळ्यांप्रमाणें ‘ खारवी ’ व भोई अशा दोन जातीचे लोक कांहीं ठिकाणीं आहेत. खारवी हे मासेमारी व होडी भाड्याचा धंदा करतात. भोई हे फक्त होडी भाड्याचा धंदा करतात. ( म्हणजे होड्या बाळगून खाडींतून लोकांना भाड्यानें इकडे तिकडे नेणें – मुंबईतील टॅक्सी व्हिक्टोरियाच्या धंद्याप्रमाणें ) समुद्रकांठचे कांहीं मुसलमानहि मासेमारीचा धंदा करतात. त्या मुसलमानांना ‘ दालदी ’ म्हणतात.

# सांस्कृतिक परंपरा

प्रत्येक प्रदेशाची विशिष्ट सांस्कृतिक परंपरा असते. महाराष्ट्राचा कोंकण हा एक भाग आहे व कोंकणचा रत्नागिरी जिल्हा हा प्रमुख घटक आहे. या जिल्ह्यांतील लोकांची परंपरा, चालीरीति बऱ्याच प्रमाणांत स्वतंत्र आढळून येतात. दर बारा कोसांवर भाषा बदलते असें म्हणतात, तें खरें आहे. रत्नागिरी जिल्ह्याची मराठी ही एकमेव प्रमुख भाषा आहे. परंतु तेथेंहि तीन चार प्रकार स्थानिक बोलींतून दिसून येतात.

रत्नागिरी जिल्ह्यांतील लोकांच्या वसाहतीच्या इतिहासाकडे लक्ष दिल्यास अनेक ठिकाणाहून लोक येथें येऊन स्थायिक झाले असेंच दिसून येतें. ते कोणत्या कारणानें आले ती प्रत्येकाचीं कारणें निराळीं असूं शकतील. या ठिकाणीं कांहीं लोक मूळचे रहिवासी होते. पण बऱ्याच प्रमाणांत देशावरून लोक येथें आले आहेत. या ठिकाणीं जैनहि तुरळक आहेत. हिंदूंचा प्रामुख्यानें भरणा असून त्यांच्या खालोखाल मुसलमान व ख्रिश्चनधर्मीय लोक आहेत.

एकंदर चालिरीतींवरून या ठिकाणीं उत्तर व दक्षिण संस्कृतीचा किंवा आर्यअनार्य संस्कृतीचा सुरेख मिलाफ दिसून येतो.

लग्नांत व इतर कांहीं धार्मिक बाबतींत होमहवनाला महत्व ही आर्यांची पद्धत, तर पिशाच्चयोनीवर अतिशय विश्वास ही अनार्यांची समजूत. परंतु येथील लोकांत दोन्ही गोष्टींवर भर देण्यांत येतो. आर्य पद्धतीनें धार्मिक कार्य करण्यांत येतात तर अनार्यांच्या पद्धतीनें तेथील स्थानिक स्वरूपांच्या ग्रामदेवतांची पूजा, शेतासाठी नैवेद्य म्हणून कोंबडें बळी देणें इत्यादि संस्कार चालू आहेत. आर्यांच्या पद्धतीनें दिवसा शुचिर्भूत होऊन देवाची पूजा करण्याची येथें पद्धत आहे. व रात्रींच्या वेळीं पिशाच्चांना नारळ, कोंबडी देण्याची प्रथा आहे. या दोन्ही पद्धतीवर लोकांची येथें श्रद्धा आहे. पिशाच्चाला देवाचें महत्त्व देण्यांतही येतें व तें माणसांच्या अंगांत येतें यावरहि लोकांची श्रद्धा दिसून येतें.

अंगांत पिशाच्च येतें त्यांना 'भगत' म्हणतात. देवाचा कौल घेण्यासाठीं ग्रामदुर्गेला फुलांच्या कळया लावण्याची पद्धत बऱ्याच ठिकाणीं आहे. येथें राम, भवानी, श्रीकृष्ण वगैरे देवतांचे उत्सव दरसाल गांवोगांव मोठ्या प्रमाणांत साजरे होत असतात. यावरून दोन्ही संस्कृतींचा कसा मिलाफ झालेला आहे हें लक्षांत येईल.

या भागांतील लोकांचे मोठे सण म्हणजे शिमगा ( हुताशनी पौर्णिमा ) व गौरीगणेशोत्सव.या दोन्ही सणांच्या वेळीं कोंकणांत जाण्याची बहुजन समाजाची रीघ लागलेली असते. शिमग्याच्या सणाचा तर प्रत्येक घराशीं संबंध येतो. गौरी गणेशोत्सवहि मोठ्या प्रमाणांत आनंदाचा सण समजतात.

रत्नागिरी जिल्ह्यांत ग्रामदुर्गा' म्हणजे प्रत्येक गांवाचें सार्वजनिक देऊळ असतें व त्या स्त्री देवतांचीं नांवें जाखाई, जुगाई, मानाय, वाघजाय तर पुरुष देवतांचीं नांवे वीर, केदार अशीं असतात. कांहीं गांवांतील देवळांत स्त्री देवता प्रमुख तर कांहीं ठिकाणीं पुरुष देवता प्रमुख समजल्या जातात. परंतु प्रमुख देवतांत स्त्री देवतांचा अधिक भरणा आहे. या देवळांतील देवतांना ग्रामदुर्गा हें सामान्य नांव आहे. अशा देवळांतील देवतांशीं त्या त्या गांवच्या स्थापनेच्या वेळच्या लोकांचा घनिष्ट संबंध असतो व गांव स्थापनेच्या वेळचे रहिवाशी हे तेथें मानकरी असतात ; म्हणजे त्यांचेकडे ग्रामदेवतेच्या उत्सवप्रसंगीं कांहीं हुकुमाचे अगर देवतेच्या पालखीचे मान असतात.

या देवतां या चांदीच्या प्रतिमा तयार करण्यांत येतात त्यांना 'रुपें' म्हणतात. शिमग्याच्या वेळीं त्या प्रतिमा पालखींत बसवून ती पालखी लोक खांद्यावरून मोठ्या हौसेनें नाचवितात. ही पालखी म्हणजे पूर्वी प्रचारांत असलेल्या मेण्यासारखी असते. त्या पालखींत देवतांच्या प्रतिमा घट्ट बांधून बसवितात. शिमग्याच्या उत्सवानंतर साधारणतः एक महिन्याच्या आंत ही देवाची पालखी प्रत्येकाच्या घरोघर पूजेसाठीं जाते.

गौरीच्या सणाच्या वेळीं इकडील कुणबी व तत्सम जातींतून नाचाची पद्धत आहे. यावेळीं होणारे नाच हे वाडी वाड्याचे असे गटाचे नाच असतात. मध्यें मृदुंगवादक व त्या सभोंवार [गोल] लोक नाचतात. या

नाचाला 'जाकडी' म्हणतात. विशेषत: गौरीपूजन व गौरीविसर्जन या दिवशीं हे नाच प्रत्येक गांवांतील घरोघरीं अर्धा तास तरी होतात. त्यावेळीं आरती करतात व त्या आरतींत यथाशक्ति पैसे ठेवण्याची पद्धत आहे.

शिमग्याचे वेळीं जे नाच असातात त्यांत खेळे हा महत्त्वाचा व प्रमुख लोकनृत्याचा प्रकार आहे. हा केवळ वाडीपुरता मर्यादित नसून तो सर्व गांव मिळून असतो. शिमग्याच्या (होलिकोत्सवानंतर) चार आठ दिवसांत प्रत्येक गांवांतील खेळे आपल्या गांवांतील पालखीप्रमाणें घरोघर फिरतात. त्यावेळीं त्यांना आरती देण्यांत येते, त्या आरतींत कांहीं पैसे देण्याची प्रथा आहे. 'खेळ्यां'मध्येंहि दोन प्रकारचे फरक दिसतात. पण विशेषत: राजापूर ते चिपळूण या भागांत खेळ्यांचा प्रघात अधिक आहे. या खेळ्यांचे पोषाख पाहिले तर सुमारें २०० वर्षापूर्वीच्या महाराष्ट्रीय पोषाखाशीं बरेंच साम्य दिसतें. अंगांत अंगरखा असतो तो पायघोळ, त्यावर उपरण्याप्रमाणें दुसरें कापड घेतात. गळ्यांत कांचेच्या मण्यांचे हार व डोक्यांत मोठें पागोटें असतें. हे पोषाख कांहीं ठिकाणीं रंगीत तर कांहीं ठिकाणीं सफेत असतात. पागोट्यांचा रंग बहुतेक ठिकाणीं तांबडाच असतो. कमरेला लहान साड्या पट्याप्रमाणें बांधतात. ह्यावरून पोषाख महाराष्ट्रीय पद्धतीचा या खेळाच्या सुरवातीला स्वीकारण्यांत आला हें स्पष्ट होतें. खेळे व गौरींच्या वेळेचा नाच हे दोन्ही नाच मुंबईंतहि पहावयास मिळतात.

खेळ्यांचा ग्रामदुर्गेशीं संबंध असतो. या नाचाला सुरुवात करायची तेव्हां प्रथम त्या देवळांत नाच करण्याची बऱ्याच ठिकाणीं प्रथा आहे.

"घाटीची लक्ष्मी उतारली कोंकणी" अशीं खेळ्यांतील गाणीं ऐकल्यावर वरच्या वर्गांतील बरेच लोक देशावरून आले असावेत हें कळून येतें. खेळ्यांच्या जुन्या गाण्यावरून पूर्वींच्या घटनांचा सुगावा लागतो. परंतु त्यांचीं गाणीं हीं लिहिलेलीं नसल्यामुळें त्यांचा अपभ्रंश होऊन गेला आहे, त्यामुळें त्यांत आतां बरीच विसंगति निर्माण झालेली आहे.

खेळ्यांत एक 'गोमू' अथवा कोळीण म्हणून स्त्री पात्र असतें, तें निरनिराळ्या सोंगांच्या वेळीं निरनिराळ्या स्त्री भूमिकेचें काम पार पाडतें. या पात्रावरून पुरुषांनीं स्त्री भूमिका करण्याची प्रथा फार पूर्वीपासून असावी असें वाटतें. खेळ्यांतील सोंगांना गणपतीच्या सोंगानें सुरुवात होते. त्यांतील बहुतेक

सोंगें रामायण महाभारतावर आधारलेलीं असून कांहीं विनोदी तर कांहीं आधुनिक सामाजिकही येऊं लागलीं आहेत. पौराणिक सोंगें आणतांना तोंडावर त्या त्या सोंगाचे लांकडी मुखवटे तयार केलेले असतात ते बसवितात.

हा लाकडी मुखवट्यांचा प्रकार कर्नाटकाच्या बाजूनें आलेला असावा. त्याचप्रमाणें कार्यक्रमांत मृदंग वाजविणें, हाही प्रकार कर्नाटकांतून घेतला गेलेला असावा असें वाटतें.

लग्न, मुंजीच्या दिवशीं खेळे नाचण्याचा कार्यक्रम करण्याची बहुतेक ठिकाणीं प्रथा आहे. बाहेरगांवी लग्न, मुंज झाली तरी मागाहून खेळ्यांचा नाच करण्याची पद्धत आहे. लग्नाचे अगर मुंजीच्या वेळीं त्यांना जेवण ( शिधा ) व नाचाच्या वेळीं आरतींत ठराविक पैसे ( परंपरा म्हणून ) टाकण्याची चाल आहे.

गोंधळ हा प्रकार मूळचा देशावरचा, परंतु देशावरील बरेच लोक कोंकणांत येऊन स्थायिक झाले व ते जमीनदारहि झाल्यामुळें सत्ता त्यांचेकडे आली. या लोकांचीं तुळजापूरची भवानी अगर कोल्हापूरची अंबाबाई हीं कुलदैवतें असल्यामुळें त्यांचेकडेहि मुंजींत, ( मुंज होत नाहीं त्यांच्यांत ) लग्नाचे वेळीं व देवीच्या नवरात्र उत्सव समाप्तीचे वेळीं गोंधळ करण्याची प्रथा आहे. प्रत्येक ग्रामदुर्गेच्या देवळांतहि दरसाल गोंधळाची प्रथा आहे, पण ती मागाहून म्हणजे देशावरून येथें स्थायिक झालेल्या लोकांच्या प्रभावामुळें पडली असावी. कुळंबी, महार वगैरे लोकांत गोंधळाची प्रथा दिसत नाहीं.

नवरात्रोत्सव व इतर उत्सवाच्या वेळीं ललित व दशावताराचे खेळ करण्याची पद्धत बऱ्याच ठिकाणीं आहे.

## दशावतार

मत्स्य, कर्म, वराह, नारसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध, आणि कलंकी हे दहा अवतार. यापैकीं चार मानवरूपी नाहींत व बाकीचे मानव स्वरूपांत झाले. कलंकीचा अवतार अजून व्हावयाचा आहे. सांप्रत बुद्धावतार आहे असें मानलें जातें. त्यांतहि राम आणि कृष्ण हे दोनच अवतार काय ते पूर्णावतार म्हणून समजले जातात. पुराणामध्यें या अवतारासंबंधीची माहिती सांपडते व तिच्या आधारेंच दशावताराचे प्रयोग केले जातात.

दशावतारी नाटकाचा प्रारंभ मध्यरात्रींच्या सुमारास होतो व तें थेट तांबडें फुटेपर्यंत चालतें. प्रथम सूत्रधार रंगभूमीवर येऊन ध्रुपद म्हणतो. ध्रुपदांत मुख्यत: विघ्नहर्त्या गजाननाला आवाहन करण्यांत येतें. ध्रुपद संपण्याच्या सुमारास गणपती रंगभूमीवर प्रविष्ट होतो. मागोमाग सरस्वती येते. ऋद्धि सिद्धि या नायिका गजाननाचे डावे उजवे हात सांभाळतात. स्तवनानंतर गजानन—सरस्वति पात्रांना आशीर्वाद देतात. हें सारें प्राथमिक झालें म्हणजे नाटकाच्या प्रत्यक्ष हाल-चालीस सुरुवात होते. सूत्रधार ‘ विंगेंत ’ जाऊन उभा राहातो. गणपति व सरस्वती रंगभूमीवरून निघून जातात. मग संकासुराचें पात्र येतें. या संकासुरानें ( शंखासुरानें ) वेद चोरून समुद्रांत लपवून ठेवले व विष्णूनें मत्स्यावतार घेऊन त्याचा वध केला अशी कथा आहे. साहजिकच संकासुराची आणि विष्णूची बोलाचाली होते. यथावकाश संकासूर मारला जातो व मत्स्यावताराचेंहि कार्य संपतें. कूर्म व वराह या अवतारांचीं नुसतीं रूपेंच दाखविलीं जातात.

एवढ्या प्रास्ताविकानंतर नारसिंहावतार रंगभूमीवर प्रगट होतो. या अवतारांत पांच पात्रें असतात. हिरण्यकश्यपु, कयाधू, प्रल्हाद, भालदार आणि नारसिंह. या अवताराच्या कथेंतील बरेचसे प्रसंग रंगभूमीवर करून दाखविण्यांत येतात.

नंतर वामनावतारांत वामन व बलि हीं दोनच पात्रें दाखविलीं जातात. परशुरामावताराचा नुसता उल्लेख करण्यांत येतो.

यापुढील राम, कृष्ण यांच्या अवतारांच्या कथांतील नानाविध प्रसंग अत्यंत नाट्यपूर्ण रीतीनें सादर केले जातात.

बुद्ध व कलंकि हे शेवटचे दोन अवतार मात्र रंगभूमीवर करून दाखविले जात नाहींत.

१७२८ सालीं श्यामजी नाईक काळे नांवाचे गृहस्थ कर्नाटकांतून कोकणांत आडिवऱ्यास आले, तेव्हां त्यानीं बरोबर ‘ दशावतार ’ नाटक हें नवी चीज म्हणून आणून तें लोकांपुढें ठेविलें असा उल्लेख श्री. चिं. कृ. दीक्षित यांच्या ‘आडिवऱ्याची महाकाली’ या पुस्तकांत आढळतो. आडिवऱ्याहून हीं नाटकें कोकणांत ठिकठिकाणीं पसरलीं.काळे यांचें हें ऋण दशावतारी नाटकवाला विसरला नाहीं. त्यांच्या स्मृतीला वंदन म्हणून ‘ काळेबुवा दशावतारास

ऱ्चला' असें सुरुवातीला ओरडण्याचा प्रघात पडला. काळेबुवा हेच दशावताराचें आदिदैवत व नाटकाच्या यशस्वी संपादणीसाठीं या दैवताचें स्मरण केलेंच पाहिजे अशी दशावतार नाटक 'कंपण्यां'ची भावना होती. १७३६ सालीं आंग्रे दरबारनें फकिरजी आंग्रे यांच्या लग्नांत काळे यांस दशावतारांचें नाटक करून दाखविण्यासाठीं खास निमंत्रण दिलें होतें. या दशावतारी नाटकांचें स्वरूप आधुनिक नाटकांइतकें परिणत नसलें तरी पूर्ण अर्थानें तें 'नाटक' याच सदराखालीं मोडलें जाण्यास प्रत्यवाय नाहीं.

## पोषाख

रत्नागिरी जिल्ह्यांतील लोकांत पोषाखाच्या बाबतींत बरीच विविधता दिसून येते. इकडे मुसलमानखेरीज सर्व समाजाच्या स्त्रिया सकच्छ नेसतात. ब्राह्मणांखेरीज इतर सर्व समाजांतील स्त्रियांत डोक्यावरून पदर घेण्याची पद्धत आहे. कांहीं शेतकऱ्यांच्या स्त्रिया साधारणतः गुडघ्याखालीं तर कांहींच्या गुडघ्यापर्यंत नेसतात. प्रत्येक समाजांतील स्त्रियांच्या नेसण्याच्या पद्धती निरनिराळ्या आहेत. पुरुषांचे पोषाखांतही निरनिराळे फरक आहेत, पण ते थोड्या प्रमाणांत असतात. कांहीं शेतकरी रुमाल नेसतात तर कांही धोतरहि नेसतात. कांहीं अंगांत कुडतें घालतात.

ग्रामदुर्गा किंवा ग्रामदेवतेच्या देवळांत गांवांतील रहिवाश्यांना विशिष्ट अधिकार असतात. ग्रामसंस्था म्हणजे हल्लींच्या भाषेंत स्थानिक स्वराज्य किंवा ग्रामराज्य होतें. गांव स्थापनेच्या वेळीं सर्वांचें सहकार्य मिळून कारभार चालावा म्हणून प्रत्येक जमातीला अधिकार देण्यांत आले. हें लोकशाहीचें मूळ म्हणावयास हरकत नाहीं. परंतु पुढें पुढें प्रमुख अधिकाऱ्यांत सर्वाधिकारी आपण व्हावें अगर आपल्या तंत्रानेंच सर्व चालावें अशी प्रवृत्ति निर्माण झाली व त्यामुळें पूर्वी न्यायाचीं त्याचप्रमाणें इतर कामें व्यवस्थित पण ग्रामदेवीच्या देवळांत चालत, त्यांना ओहोटी लागली. आतां तर त्या कार्यांचे फक्त अवशेष शिल्लक आहेत असें म्हणावें लागतें.

या भागांतील लोक तल्लख बुद्धीचे यांत शंका नाहीं. गेल्या शंभर दीडशें वर्षांत महाराष्ट्राला नेत्यांचा, विद्वानांचा पुरवठा रत्नागिरी जिल्ह्यानें बऱ्याच

प्रमाणांत केला आहे. डॉ. सर रामकृष्ण भांडारकर हे मालवणला जन्मले. लोकमान्य टिळक ह्यांचा जन्म रत्नागिरीला झाला. त्यांचा मूळ गांव चिखलगांव ( ता. दापोली ) हा होय. गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म गुहागर तालुक्यांत कोतळूक येथें झाला. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक हे व महर्षि धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे हे मुरुडचे, ( ता. दापोली ) रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे मुर्डीचे ( ता. दापोली ), साने गुरुजी हे याच तालुक्यांतील पालगडचे. अजूनहि रत्नागिरी जिल्ह्यांतील लोक बऱ्याच क्षेत्रांतून पुढें आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यांतून महान नेते निर्माण झाले व अजूनहि ही परंपरा थोड्याफार प्रमाणांत कायम आहे. येथील लोक मुंबईसारख्या ठिकाणीं अनेक चळवळींत आघाडीवर होते व आहेत, परंतु एक वैशिष्ट्य लक्षांत ठेवण्याजोगें आहे तें हें कीं, देशाचें नेतृत्व करणारे लोक येथून मिळतात व चळवळींतही भाग घेतात, असें असतां कोणतीहि चळवळ रत्नागिरी जिल्ह्यांत सुरू होत नाहीं अगर ती टिकत नाहीं, म्हणजे मूळ धरीत नाहीं. याचें कारण सर्व लोकांची ‘ स्वतंत्र वृत्तीची प्रकृति ’ हेंच आहे.

या जिल्ह्यांतील लोक आदरातिथ्य करणारे असून येथील मुख्य अन्न भात आहे. गरीब शेतकरी वर्गांत नागलीची भाकर व मासे हें मुख्य अन्न आहे.

या जिल्ह्यांतील लोकांत आपसांत भांडणें असतात. परंतु भांडणाचें पर्यवसान हातघाईत होत नाहीं. आपल्या तंट्यासाठीं कोर्टांत जाण्याची प्रवृत्ति फार दिसून येते. त्यामुळें या जिल्ह्यांत फौजदारी खटल्यापेक्षां दिवाणी खटल्यांचें प्रमाण जास्त असतें.

——०×०——

# आजच्या गरजा

रत्नागिरी जिल्ह्यांत मुख्य पीक भाताचें मानण्यांत येत असलें तरी तो जिल्हा अत्यंत डोंगराळ असल्यामुळें इतर जिल्ह्यांचे मानानें तेथें भाताचें पीक अत्यंत कमी येतें. तेथील परिस्थितीवरून विचार केला तर भाताचें पीक पाहिजे तितकें व इतर जिल्ह्यांशीं स्पर्धा करून वाढविणें हेंहि शक्य नाहीं. त्यामुळें तो जिल्हा शेतकीप्रधान ठरवितां येणार नाहीं. तेथील नैसर्गिक रचना लक्षांत घेऊनच विकासाचे मार्ग आंखले पाहिजेत.

या भागांत हापूस, पायरी आंबे चांगले असतात. त्यांना मागणी भरपूर आहे. तेव्हां वरकस जमीनींतून आंब्याच्या कलमांची झाडें पद्धतशीर पद्धतीनें लावलीं तर त्याचा फायदा तेथील गरीब लोकांना मिळूं शकेल. अर्थात हें काम पैशांशिवाय होणार नाहीं, त्यामुळें सरकारनें यासाठीं आर्थिक मदत केली पाहिजे.

या भागांतील रायवळ आंबा व फणस तर तेथेंच फुकट जातो. वहातुकीची व्यवस्था नसल्यामुळें आंबा, फणस मुंबईला वेळेवर जाऊं शकत नाहीं.

काजूचें पीक या जिल्ह्यांत चांगलें येतें. विशेषतः देवगड, मालवण, वेंगुर्लें या भागांत काजूच्या झाडांची पद्धतशीर लागवड केलेली असून त्या भागांत काजूच्या बिया फोडण्याचे कारखानेहि आहेत. काजूला अमेरिकेंत फार मागणी आहे. काजूच्या झाडांना पाणी वगैरे लागत नाहीं. त्यामुळें या काजूच्या झाडांची लागवड जिल्ह्यांतील सर्व भागांत केली तर ती फायदेशीर ठरेल.

याशिवाय बिब्बा, आवळा वगैरे वनौषधीहि या जिल्ह्यांतील कांहीं भागांत भरपूर आहेत. त्यामुळें औषधांचे कारखाने काढता येतील. अशा प्रकारचा एक कारखाना आंजर्लें ( ता. दापोली) येथें आहे.

सागाचें झाड इमारतींसाठीं अत्यंत उपयुक्त असतें. सागाचीं झाडें रत्नागिरी जिल्ह्यांत चांगलीं होतात. त्यांची किंमतहि चांगली येते. जर सागाची पद्धतशीर लागवड करण्यांत आली तर तीही एक उत्पन्नाची बाब आहे.

नारळ हा कोंकणचा कल्पवृक्ष समजतात. त्याच्या झावळ्यांचा उपयोग घरें शाकारण्यासाठीं होतो. काथ्याचीं दोरखंडें व हिरांचें झाडू होतात. सुपारी हेंहि नारळाप्रमाणेंच या भागांत महत्वाचें उत्पन्न आहे. नारळ सुपारीच्या बागा समुद्र किनाऱ्याच्या टापूंत अधिक आहेत.

देवगडच्या आसपास लांब धाग्याचा चांगला ताग होतो. देवगडी ताग म्हणून तो प्रसिद्ध आहे. आतां बंगालचा भाग पाकिस्तानांत गेल्यामुळें या भागाकडे अधिक लक्ष देऊन तागाचें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा देशाला फायदा होईल.

## खनीज संपत्ती

रत्नागिरी जिल्ह्यांतील लोक परिस्थितीनें गरीब राहिले आहेत हें खरें असलें तरी खनिज संपत्तीनें रत्नागिरी जिल्हा श्रीमंत ठरणार आहे. परंतु त्यासाठीं त्या भागाची भूगर्भ पहाणी सरकारनें ताबडतोब केली पाहिजे.

विशेषतः दक्षिण भागांत लोखंड, पोलाद, कोळसा व अभ्रक भरपूर आहे. त्यामुळें तेथें खाणी व कारखाने काढतां येतील. सबंध जिल्ह्यांतील बहुतेक ठिकाणीं रंगाला उपयुक्त अशी माती आहे. तेव्हां त्याबाबत संशोधन करून रंग तयार करण्याचे कारखाने सुरू करणें जरूर आहे. याशिवाय कांचेसाठीं लागणारी वाळू या जिल्ह्यांत आहे. उत्तर रत्नागिरींत समुद्रकाठीं बॉम्बसाठीं उपयोगांत येणारी काळी वाळू आहे व कांहीं ठिकाणीं युरेनियम आहे. इल्मानाईट धातूसाठीं मालगुंड भागांतील वाळू परदेशांत निर्यात करण्यांत आली होती. मंगलोरी कौलांसाठीं लागणारी माती त्या जिल्ह्यांत असून मंगलोरी कौलांचा कारखाना कशेळी ( ता. रत्नागिरी ) येथें सुरू करण्याची योजना त्या जिल्ह्यांतील लोकांनीं आंखली आहे.

जिल्ह्यांत एकूण ३१ लाख एकर जमीन असून त्यांपैकीं सुमारें साडे तीन लाख एकर जमीन भातशेतीखालीं आहे. बाकीची वरकस व कातळ आहे. कातळाचा लोक कांहीं उपयोग करीत नाहींत, फक्त सरकारसारा भरीत असतात. या जिल्ह्यांत लाल रंगाचा दगड सर्वत्र आहे. त्याला जांभा दगड म्हणतात. तो नरम असून त्याचा उपयोग या भागांत घराचा पाया व भिंतीसाठीं करितात. परंतु ह्या दगडाचे चिरे हातानें पाडावे लागतात, त्यामुळें फार महाग पडतात.

हे चिरे काढण्यासाठीं यंत्रनिर्मिती करून त्या यंत्रानें चिरे काढावयास सुरुवात केली तर चिरे लोकांना स्वस्त दरात मिळूं शकतील व मालकांनाहि त्यांच्या जमिनीचा कांहीं प्रमाणांत फायदा मिळूं शकेल.

मोठीं धरणें अगर पाटबंधारे बांधण्यासारखी परिस्थिती रत्नागिरी जिल्ह्यांत नसली तरी सह्याद्रीच्या भागांत अनेक ठिकाणीं पाणी फुकट जातें. त्याचप्रमाणें अनेक खेड्यांतहि पाणी फुकट जातें. तेथें छोटे पाटबंधारे, विहिरींना पंप बसविणें ( लिफ्ट इरिगेशन ) वगैरे बाबतींत सरकारनें लक्ष दिलें तर सध्यापेक्षां उत्पादनांत निश्चित वाढ होईल व त्या दृष्टीनें सरकारनें अवश्य लक्ष दिलें पाहिजे. इरिगेशनच्या बाबतींत रत्नागिरी जिल्ह्याच्या वांट्याला अद्याप कांहीं आलेलें नाहीं. तरी यापुढें तरी, लिफ्ट इरिगेशन ' ची योजना सरकारनें आंखावी.

बांबू या भागांत चांगले होतात. येथून बांबूची निर्यात दरसाल होत असते. तेव्हां बांबूची लागवड अधिक केली जाणें जरूर आहे. हिरडाहि दरसाल या भागांतून बराच निर्यात होतो. हिरड्याचेंहि उत्पादन वाढविण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे.

शेतीपेक्षां फळफळावळ व इमारती लाकूड यांचें उत्पादन या जिल्ह्यांत वाढवून विकास करतां येईल, ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे.

## बंदरें

रत्नागिरी जिल्हा खडकाळ असल्यामुळें दळणवळणाच्या दृष्टीनें अत्यंत अडचणी आहेत, परंतु त्याला समुद्र किनारा ही एक नैसर्गिक देणगी आहे. त्यामुळें जलमार्गाची सोय चांगली आहे. जलमार्गानें मालाची वाहतुक कमी खर्चांत होऊं शकते. शिवाय या भागांतील नद्या पश्चिमवाहिनी असल्यामुळें या जिल्ह्यांत बऱ्याच खाड्या आहेत. त्यामुळें समुद्र किनाऱ्यापासून पूर्वेकडे सुमारें तीस मैलापर्यंत खाड्यांतून वाहातुक चालते.

बाणकोटची खाडी ( सावित्री नदी ) दाभोळची खाडी ( वाशिष्ठी नदी ) जयगडची खाडी ( शास्त्री नदी ), जैतापूरची खाडी, विजयदुर्गची खाडी, या खाड्यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे.

दाभोळच्या खाडींतून चिपळूणपर्यंत, जयगडच्या खाडींतून संगमेश्वर व माखजनपर्यंत, जैतापूर खाडींतून राजापूरपर्यंत, विजयदुर्गच्या खाडींतून कणकवलीपर्यंत वाहतूक चालते.

चिपळूण, संगमेश्वर, राजापूर हीं ठिकाणें पूर्वीपासून व्यापाराच्या दृष्टीनें प्रसिद्ध असून हल्लींसुद्धां त्या ठिकाणीं देशावरून माल येतो व हीं ठिकाणें त्या त्या भागांतील बाजार पेठा म्हणून ओळखलीं जातात.

बाणकोट, हर्णै, दाभोळ, पालशेत, बोऱ्या, जयगड, तिवरी, रत्नागिरी, पूर्णगड, जैतापूर, विजयदुर्ग, देवगड, आचरें, मालवण व वेंगुर्ले ही बंदरें आहेत.

खाडीच्या मुखाशीं असलेल्या जयगड, दाभोळसारख्या बंदरांत गाळ सांचल्यामुळें बंदरें व त्याचप्रमाणें खाड्यांतून गाळ साचल्यामुळें खाड्या वाहतुकीला दिवसेंदिवस निरुपयोगी होत आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तो गाळ काढून टाकून प्रत्येक बंदरांत धक्का अगर जेटी बांधण्याची सरकारनें योजना आंखली आहे.

या खाड्यांतून अगर बंदरांतून या जिल्ह्यांत मालाची आयात निर्यात गलबतांनीं मुंबई व इतर ठिकाणाशीं चालू असते. या बंदरांतून दरसाल लाखों रुपयांचा माल निर्यात होतो. मालवाहू बोटी रत्नागिरीजवळ मिर्या या ठिकाणीं व जयगड ( धामणखोल ) येथें उभ्या राहू शकतात. विजयदुर्ग बंदर दक्षिण रत्नागिरी भागांत वादळाच्या दृष्टीनें सर्वांत सुरक्षित आहे. त्याचप्रमाणें उत्तर रत्नागिरी भागांत जयगड बंदर निवाऱ्याचें व सुरक्षित असें बारमाही बंदर आहे. या गोष्टी लक्षांत घेऊन त्यांची सुधारणा सरकारनें केली पाहिजे.

## कोंकण रेल्वे

रत्नागिरी जिल्ह्यांत ज्या वस्तु होतात त्या मुंबईसारख्या मोठ्या बाजारपेठेच्या ठिकाणीं पाठविण्यास वाहनांची सोय नसल्यामुळें वेळेवर माल जाऊं शकत नाहीं. त्यामुळें तेथील लोकांना आपल्या वस्तूंपासून आर्थिक फायदे मिळवितां येत नाहींत. रत्नागिरी जिल्ह्याच्या विकासासाठीं सर्वांत प्रथम जर कांहीं आवश्यक असेल तर दळणवळणाच्या सोयी वाढविणें हें होय. सदर जिल्ह्यांत अशीं कांहीं खेडीं आहेत कीं त्या खेड्यांच्या आसपास आठ दहा

मैलांत मोटार तर नव्हेच पण बैलेगाडीहि जाण्यास रस्ते नाहींत. तेव्हां त्या भागांत रस्तेबांधणीवर अधिक भर देणें अत्यंत जरुरीचें आहे. त्याचप्रमाणें 'कोंकण रेल्वे' ही तर कोंकणची मुख्य गरज आहे. कोंकण रेल्वे कोंकणची भाग्यविधाती ठरणार आहे. सदर रेल्वे अ. बा. वालावलकर योजनेप्रमाणें मध्यभागांतून नेली पाहिजे. (समुद्रकिनाऱ्यापासून पूर्वेस वीस मैलांवरून) हें अंतर जिल्ह्याच्या दोन्ही बाजूच्या लोकांना सारखेंच पडेल. जिल्ह्याच्या पश्चिमेला खाड्या फार आहेत व पूर्वेस डोंगर फार असल्यामुळें मध्य भागांतून रेल्वे नेणेंच सोयीस्कर ठरेल. कोंकण रेल्वेकडे भारत सरकारनें तांतडीनें लक्ष दिलें पाहिजे. रस्ते, रेल्वे व बंदर सुधारणा ह्या कोंकणच्या प्राथमिक निकडीच्या गरजा आहेत.

## बोटींचा मार्ग हवा

रेल्वे आली तरी बोटीच्या मार्गाची आवश्यकता राहणारच. समुद्र किनाऱ्याच्या भागांतील लोकांना बोटीचा मार्ग सुखावह आहे व त्यांची रहदारी भरपूर आहे. तेव्हां बंदरांत धक्के बांधणें, खाड्यांतील गाळ काढणें या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

आज रत्नागिरी जिल्ह्यांतील सुमारें सहा लाख लोक मुंबंइत नोकरी धंद्यानिमित्त आहेत. रत्नागिरींतील खनिज संपत्तीचा विचार करून तेथें ठिकठिकाणीं खाणी व कारखाने काढल्यास इतक्या लोकांना आपलीं घरेंदारें सोडून मुंबईत यावें लागणार नाहीं. तेथेंच ते उद्योगधंदा करूं शकतील.

## कोयना योजना

रत्नागिरी व सातारा जिल्ह्याच्या हद्दीवर कोयना नदीवरील धरणाचें काम चालू असून, रत्नागिरी जिल्ह्यांत (पोपळी, ता. चिपळूण) येथें पॉवर हाऊस बांधण्यांत येत आहे. तेथें निर्माण होणारी वीज मुंबईला नेण्यांत येणार आहे व तेथें सोडण्यांत येणारें पाणी वाशिष्ठी नदींतून वाहून जाणार आहे. तेव्हां हें कोयनेचें पाणी वाशिष्ठी नदींतून फुकट वाहूं न देतां तें पोपळी भागाच्या आसपासच्या गांवांना शेतीसाठीं मिळण्याची कांहींतरी योजना आंखल्यास त्या भागांतील सुमारें २०–२५ मैलाच्या टापूंत उत्पादन वाढवितां येणें शक्य आहे.

'जमीन' बाबतींत त्याचप्रमाणें इतरहि कांहीं बाबतींत रत्नागिरी जिल्ह्याची स्थिति इतर जिल्ह्यांपेक्षां भिन्न स्वरुपाची असल्यामुळें या जिल्ह्याचे सर्व प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें येथील खासदार, आमदार व कांहीं प्रमुख व्यक्तींचें मुंबई सरकारनें एक कमिशन नेमावें व त्या कमिशनच्या अहवालानुसार जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची योजना आंखावी. त्याचप्रमाणें विशिष्ट कालापर्यंत कांहीं सवलतीच्या तरतुदी करणें आवश्यक आहे.

एवंच रत्नागिरी जिल्हा हा खडकाळ, नापीक जिल्हा समजून त्याची उपेक्षा न करतां त्याच्या विकासासाठीं वर लिहिलेल्या मार्गानें पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आले तर भावी काळांत तो स्वतः वैभवशाली होऊन महाराष्ट्रालाहि वैभवाच्या शिखरावर नेऊन बसवील यांत तिळमात्र शंका नाहीं.

---*०*---


# अर्नाळकर ब्रदर्स

आमच्या येथें **डोळ्यांची मोफत तपासणी** करून शास्त्रोक्त चष्मे **वेळेवर** तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर,
**मुंबई. ४.**

: मालक :
**बाबूराव अर्नाळकर**

# परिशिष्ट

## पेशव्यांचा मूळ गांव

पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट हा देशावर प्रथम गेला व स्वपराक्रमानें चढत शाहूचा तो पेशवा झाला. बाळाजी विश्वनाथ हा जंजिरा राज्यांतील श्रीवर्धन ( हल्लीं कुलाबा जिल्ह्यांत श्रीवर्धन तालुक्याचें ठाणें आहे ) येथील देशमूख त्यांचा श्रीवर्धनकर देशमूख. असाहि उल्लेख तत्कालीन कागदपत्रांतून आहे. श्रीवर्धन येथें पेशव्यांचा चौथरा आहे. श्रीवर्धन हा प्रदेश मराठी राज्यांत समाविष्ट व्हावा अशी सर्व पेशव्यांची ( त्यांची मूळ जन्मभूमी असल्यामुळें ) इच्छा होती व त्यासाठीं अतोनात प्रयत्न त्यांनीं केले, पण त्यांना इंग्रजांमुळें यश आलें नाहीं. आतां सत्कार्य सेवा समाजातर्फे श्रीवर्धन येथील पेशव्यांच्या चौथऱ्यावर एक पेशवे मंदिर उभारण्यांत येणार आहे ही स्मारक योजना एक लाखाची आंखण्यांत आली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासांत पेशव्यांचें स्थान लक्षांत घेतां त्यांच्या मूळ गांवी स्मारक होणें महाराष्ट्राच्या दृष्टीनें महत्वाचें आहे.

थोरले माधवरावांच्या वेळेपर्यंत त्यांचें देशमूखीचें वतन श्रीवर्धन येथें होतें; माधवराव आजारी पडले तेव्हां तें वतन त्यांनीं हरिपंत फडक्यांच्या नांवावर करून दिलें.

## कुडाळदेशकर ब्राह्मण

कुडाळ देशकर ब्राह्मणांची वस्ती रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागांत आहे. ज्या गौड ब्राह्मणांनीं प्रथमतः कुडाळ देश वसविला त्यांना कुडाळ देशकर हें नामाभिधान प्राप्त झालें चालुक्यांच्या ताम्रपटांत या ज्ञातीच्या ब्राह्मणांचे उल्लेख आहेत. सावंतवाडीच्या सावंत भोसल्यांच्या पूर्वी, १४ व्या शतकांत कुडाळपासून देशापर्यंत सर्व राजसत्ता कुडाळ देशकर ब्राह्मणांच्या हातीं म्हणजे प्रभुदेसाई यांच्या हातीं होती. या ज्ञातींतील आदिलशहाच्या दरबारांतहि कांहीं पुरुष होते. या समाजांतील लोक शूर व बुद्धिमान होऊन गेले. खोत, कुळकर्णी,

महाजन व इतरहि ठिकठिकाणचे निरनिराळे मानमरातबदार या समाजांतील होते. पेशवाईंत या समाजांतील कांहीं लोक देशावर जाऊन तेथें मोठ-मोठ्या हुद्यावर चढले.

## शिलाहार राजांनीं वसविलेलीं शहरें

चार शिलाहार राजांनीं चार शहरें रत्नागिरी जिल्ह्यांत वसविल्याचें सांगतात. त्यापैकीं तीन पुढीलप्रमाणें आहेत : गोग्गि शिलाहारनें गुहागर, सोमेश्वर शिलाहारनें सोमेश्वर (ता. रत्नागिरी) व केशीदेव शिलाहर यानें केसपुरी (ता. रत्नागिरी). शहर वसविलें. सोमेश्वर येथील सोमेश्वराचें देऊळ सुमारें चारशें वर्षांपूर्वीं बांधलेलें आहे असें सोवनी कुलवृत्तांतांत म्हटलें आहे.

## रत्नागिरी जिल्ह्यांतील खनिज संपत्तीची माहिती

**फेल्स्पार**—कडावलच्या परिसरांत.

**खनिज स्फटिकें**—बहुतेक सर्व दक्षिण भाग.

**माती**—मालवण तालुका, कुडाळ व वेंगुर्ला पेटे व सावंतवाडी तालुका.

**सिलिका**—वेंगुर्ला, मठ, वेतोरें, वालावल, तेंडोली, आचरें, मिठबांव, नेताडें आणि इतर अनेक ठिकाणीं.

**अभ्रक**—कडावलच्या परिसरांत.

**क्रोमाईट्**—कणकवली भाग.

**बॉक्साईट्**—आंबोलीचा घाट.

**मँगनीज**—बांदा, कळणें, डिंगणें, फोंडीये, ( सावंतवाडी तालुका )

**लोखंड**—रेडी, (वेंगुर्ला पेटा) मोरगांव, माजगांव-(सावंतवाडी तालुका)

**गार्नेट**—कुडाळ पेटा.

**शिसें**—फोंडाघाट.

**पायराईट्**—कणकवली व वेंगुर्ला पेटे.

**चुनखडी**—हनुमान घाट व तळेरे ( कणकवली पेटा )

**स्टीएटाईट् व मौलिक जवाहिरें**—कुडाळ पेटा, मालवण तालुका.

**ॲसबेस्टॉस**—कुडाळ आणि कणकवली पेटा.

## मुंबई राज्य विधान सभेवर रत्नागिरी जिल्ह्यांतून निवडून आलेले खासदार, आमदार

**प्रेमजीभाई आसर**—हे चिपळूणचे रहिवासी. जनसंघाचे महाराष्ट्र विभागाचे कोषाध्यक्ष, सं. म. समिती पुरस्कृत जनसंघीय उमेदवार म्हणून उत्तर रत्नागिरी मतदार संघांतून लोकसभेवर निवडून आले.

**बॅ. नाथ पै**—प्रजा समाजवादी कार्यकर्ते, उत्कृष्ट वक्ते. गोव्याच्या चळवळींत फार मोठी कामगिरी त्यांनीं केली आहे. सं. म. समिती पुरस्कृत प्र. स. पक्षाचें उमेदवार म्हणून दक्षिण रत्नागिरी मतदार संघांतून लोक सभेवर निवडून आले.

**श्री. शिवराम सावंत खेम सावंत भोसले**—हे सावंतवाडीचे महाराज. ते लष्करांत लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यावर होते. जनतेच्या अडचणी सोडविण्यास तत्पर असतात, जनतेंत अत्यंत लोकप्रिय आहेत. ते सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून सावंतवाडी मतदार संघांतून निवडून आले. ते कट्टर सं. म. वादी असून धडाडीचे व तडफदार कार्यकर्ते आहेत.

**श्री. भास्कर बाळकृष्ण सावंत** बी.ए. एलएल. बी.—हे नरडवें (पेटा कणकवली) येथील रहिवाशी. ते सुरवातीपासून शेतकरी कामगार पक्षांत असून, पुणे विद्यापीठाच्या कोर्टाचे सभासद व बहिःश्याल शिक्षण मंडळांत व्याख्याते (लेक्चरर) आहेत. सहकारी चळवळींत त्यांचें कार्य फार मोठें आहे. सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून कणकवली कुडाळ मतदार संघांतून ते निवडून आले.

**श्री. नारायण महादेव चमनकर**— उभादांडा, वेंगुर्ले येथील रहिवाशी. ते प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते व गेलीं दहा वर्षे रत्नागिरी जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद आहेत. सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून कुडाळ, वेंगुर्ले मतदार संघांतून निवडून आले.

**डॉ. श्रीधर बाळकृष्ण मांजरेकर**— जनसंघीय, सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून मालवण मतदार संघांतून निवडून आले. हे तेथील

म्युनिसीपालिटीचे सभासद बरींच वर्षे आहेत.

**श्री. जगन्नाथ रामकृष्ण तावडे** बी. ए. एल्. एल्. बी.– यांचा गांव नरडवें (पेटा कणकवली) हे मुंबईत ब्रॅडले नाईट हायस्कूलमध्ये मॅट्रिकपर्यंत शिकले. नंतर पोस्ट ऑफिसांत नोकरी करून त्यांनीं कॉलेजचें शिक्षण घेतलें. शेतकरी कामगार पक्षाचे सभासद. गेलीं २२ वर्षे जिल्हा लोकलबोर्डाचे सभासद आहेत. तीन वेळां ते लो. बोर्डाचे अध्यक्ष झाले. ८ वर्षे अध्यक्ष म्हणून काम केलें. ते सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून देवगड मतदार संघातून निवडून आले.

**डॉ. प्रभातकुमार कुळकर्णी**— हे प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते असून सं. म. समितीचे पुरस्कृत म्हणून राजापूर मतदार संघांतून निवडून आले. (त्यांचें नांव प्रभात महादेव कुळकर्णी आहे, पण ते प्रभातकुमार कुळकर्णी म्हणून प्रसिद्ध आहेत.)

**श्री. शशिशेखर काशीनाथ आठल्ये गुरुजी**— हे देवळे (ता. संगमेश्वर) गांवचे रहिवाशी. स्वातंत्र्य चळवळींत १९३० पासून अनेकवेळां तुरुंगवास भोगला आहे. तिल्लोरी कुणबी वर्गाच्या शैक्षणीक व आर्थिक उन्नती साठीं यांनी बहुविध प्रयत्न केले आहेत. लांजे भागांतील ते प्रजासमाजवादी कार्यकर्ते असून सं. म. समितीपुरस्कृत उमेदवार म्हणून लांजें मतदार संघांतून निवडून आले.

**श्री. अर्जुन बापूजी विचारे**— यांचा गांव कवंडर काळसूर (ता. गुहागर) हे प्रजासमाजवादी कार्यकर्ते, परंतु सयुक्त महराष्ट्रवादी स्वतंत्र उमेदवार म्हणून संगमेश्वर मतदार संघांतून निवडून आले. नंतर विधानसभ समिती पक्षांत सामील झाले.

**श्री. आत्माराम वासुदेव मोडक गुरुजी**— हे मूळचे पुण्याचे पण त्यांचें कार्यक्षेत्र रत्नागिरी जिल्हा. ते कांहीं काळ रत्नागिरी जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. हिंदीप्रचार, भूदान क्षेत्रांत विधायक कार्य त्यांनीं केलें आहे. ते सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून रत्नागिरी मतदार संघातून निवडून आले.

**श्री. शंकर गणू तांबिटकर**— हे मूळचे पेंढांबे (ता. चिपळूण) येथील. पण मुंबईत गेलीं ३० वर्षे कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. आतां ते जिल्ह्यांत शेतकरी संघटनेचें कार्य करितात. सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार या

नात्यान चिपळूण मतदार संघातून ते निवडून आले.

**श्री. जी. वी. कांबळे** बी. ए. (ऑनर्स) हे फणसोप (ता. रत्नागिरी) येथील रहिवाशी. ते रत्नागिरी जिल्हा रिपब्लीकन पार्टीचे अध्यक्ष आहेत. ते चिपळूण मतदार संघांतील राखीव जागेवर सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार या नात्यानें निवडून आले.

**श्री. दत्ता विलणकर**—पालशेतचे रहिवाशी. (ता. गुहागर) त्या भागांतील सामाजिक कार्यकर्ते, लोकल बोर्डाचे सभासद, समिती पुरस्कृत जनसंघीय उमेदवार म्हणून गुहागर मतदार संघातून निवडून आले.

श्री. **जगन्नाथ शिवराम पाटणे**—हे खेडचे. शेतकरी कामगार पक्षाचे. आतां ते रिपब्लिकन पार्टींत गेले. गेलीं २० वर्षे लोकल बोर्डाचे सभासद. ९ वर्षे स्कूल बोर्डाचे सभासद, खेड म्युनिसिपालीटीचे १२ वर्षे सभासद, ३ वर्षे अध्यक्ष. पुणे विद्यापीठाच्या कोर्टाचे सभासद असून सं. म. समिती पुरस्कृत म्हणून खेड मतदार संघांतून निवडून आले.

**डॉ. पुरुषोत्तम वासुदेव मंडलिक**— हे प्रजासमाजवादी कार्यकर्ते सं. म. समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून दापोली, मंडणगड मतदार संघांतून निवडून आले.

———०×०———

## वीर सावरकर

अंदमानहून आणून रत्नागिरीला स्वातंत्र्यवीर वि. वि. सावरकर यांनाहि ब्रिटीशांनीं रत्नागिरी येथें नजरकैदेत ठेवलें होतें. रत्नागिरी येथें असतांना वीर सावरकर यांनीं अस्पृश्योद्धाराचें बरेच कार्य रत्नागिरीचे दानशूर गृहस्थ श्री. भागोजी कीर यांच्या सहकार्यानें केलें.

रत्नागिरींत श्री. भागोजी कीर यांनीं सावरकरांच्या प्रेरणेनें ' पतीत पावन ' नांवाचें एक अस्पृश्यांकरितां देऊळ बांधलें आहे. १९३७ सालीं जमनादास मेहता, कूपर मंत्रिमंडळ आलें त्यावेळीं वीर. सावरकरांची सुटका झाली. श्री. भागोजी कीर यांचें घर रत्नागिरी येथील किल्ल्यांत आहे. रत्नागिरी शहरांत ठिकठिकाणी त्यांचें नांव दिसतें. त्यांनीं सढळ हातानें पैसा खर्च करून रत्नागिरींत फार मोठें कार्य केलें आहे.

## भाषावार लोकसंख्येचें प्रमाण.

| | पुरुष | स्त्रिया | | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ७३६,१८६ | ८९९,८१६ | सिंधी | २० | ४ |
| उर्दू | ३०३०९ | ४०१०१ | इंग्रजी | ११ | ५ |
| कोंकणी | ११२० | १२९७ | चिनी | १२ | ० |
| गुजराती | ६३७ | ३२७ | ग्रीक | १० | ० |
| तेलगू | ३७० | २९५ | नेपाळी | ५ | ० |
| कानडी | ३२५ | २२८ | आफ्रिकन | ४ | ० |
| हिंदी | २१० | १०२ | बंगाली | ३ | १ |
| कच्छी | १६१ | ५९ | अरबी | २ | १ |
| राजस्थानी | १२५ | ७२ | स्विडीश | ० | २ |
| मल्याळी | ६० | ३ | पंजाबी | १ | ० |
| पोर्तुगीज | ३५ | ११ | स्पॅनिश | १ | ० |
| तामीळ | २८ | ५ | | | |

१९५१ च्या शिरगणती प्रमाणें.(मराठी भाषिकांचें जिल्ह्यांतील प्रमाण ९६ टक्के आहे.)


# श्री. दत्तात्रय रामकृष्ण टिकेकर

## लायसन्स्ड प्लम्बर अॅण्ड बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर

दादा महाराज वाडी, खाडिलकर रोड,

मुंबई ४

सर्व प्रकारचीं प्लम्बरचीं कामें, रंगाचीं व बिल्डिंगचीं

कामें समाधानकारक केलीं जातात.

## धर्मवार लोक संख्या ( १९५१ च्या शिरगणतीनुसार )

| | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| हिंदू | ७१८७६५ | ८७२७७३ |
| शीख | २१ | २ |
| जैन | ११९९ | ११८९ |
| बुद्ध धर्मीय | १२ | ० |
| झोरोस्ट्रेयन्स | ११ | ३ |
| मुसलमान | ४३०८३ | ६०२६८ |
| ख्रिश्चन | ६५४४ | ८०९३ |
| ज्यू | ० | १ |
| एकूण... | ७६९६३५ | ९४२३२९ |
| शेडयूल्ड कॉस्ट | ५९२५७ | ६९५९२ |
| शेडयूल्ड ट्राइब्स | [illegible] | १६७४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 230600 दि: 25/4/87
क्रमांक 233 नों दि: 2/7/31/4/1

**जी. बी. देवरुखकर अॅण्ड ब्रदर्स**

आमच्या येथें निरनिराळ्या डिझाईनच्या मनपसंत मोत्यांच्या बांगड्या, कुडीं, नथ वगैरे आर्डरप्रमाणें बनविण्यांत येतील; तसेंच नथीच्या टीका व कुड्यांचे घाट तयार मिळतील.

टि. ३९/४१ पारशी गल्ली, धनजी ट्रीट, धनजी मुलजी हाऊस, दुकान नं.५, मुंबई नं ३.

10980

## तालुकावार लोकसंख्या (१९५१ च्या शिरगणतीनुसार)

| तालुके | गांव | शहरें | एकूण संख्या | पुरुष | स्त्रिया. |
|---|---|---|---|---|---|
| १ मंडणगड तालुका | ९१ | ० | ४८९५६ | २१७९९ | २७१५७ |
| २ दापोली तालुका | १५१ | ० | १२९१०५ | ५७००० | ७२१०५ |
| ३ खेड तालुका | १४६ | १ | १२४८६१ | ५६९१५ | ६७९४६ |
| ४ चिपळूण तालुका | १३१ | १ | १५३१०२ | ६९२०८ | ८३८९४ |
| ५ गुहागर तालुका | ७८ | ० | ८७८८६ | ३७३०१ | ५०५८५ |
| ६ संगमेश्वर तालुका | १६९ | १ | १४८३३१ | ६६६७७ | ८१६५४ |
| ७ लांजे महाल | ८४ | ० | ७७९२१ | ३५१२१ | ४२८०० |
| ८ रत्नागिरी तालुका | १२१ | १ | १५९३७७ | ७१६८० | ८७६९७ |
| ९ राजापूर तालुका | १४४ | ३ | १४६५४१ | ६५००५ | ८१५३६ |
| १० देवगड तालुका | ६४ | ० | ९७९१८ | ४३५९९ | ५४३१९ |
| ११ कणकवली महाल | ६७ | ० | १०३१०१ | ४६४३८ | ५६६६३ |
| १२ मालवण तालुका | ५७ | १ | १२९८१४ | ५७४६७ | ७२३४७ |
| १३ वेंगुर्ला महाल | १७ | १ | ७९२१५ | ३६३०४ | ४२९११ |
| १४ सावंतवाडी तालुका | १२० | २ | १२४२९१ | ५८४५२ | ६५८३९ |
| १५ कुडाळ महाल | ७५ | २ | १०१५४५ | ४६६९ | ५४८७६ |
| एकूण ... | १५१४ | १३ | १७,११,९६४ | ७,६९,६३५ | ९,४२,३२९ |

रुचकर व स्वादिष्ट स्वयंपाकासाठीं

❀ —नेहमीं— ❀

# कुबलचेच

# ताजे मसाले वापरा.

❀

**मेसर्स के. टी. कुबल आणि कं. प्रायव्हेट लि.**

**हेड ऑफीस**

**४० फोरास रोड, मुंबई ८.**

**शाखा;**

लालबाग, गोलपिटा, दादर, परेल, लालबाग मार्केट,
नायगांव, ताडदेव, वरळी मार्केट, व सातरस्ता.

# हरी केशव गोखले

## सोन्या-चांदीच्या हिऱ्याच्या व कल्चर मोत्यांच्या तयार मालाचे व्यापारी

आमच्या येथें सर्व तऱ्हेचा **सोन्याचा** व **चांदीचा** सुबक माल तयार असतो. उंची कल्चर्ड मोत्यांचाहि सर्व माल तयार. शिवाय ऑर्डरबरहुकूम माल नमुन्याप्रमाणें मनपसंत बनवून दिला जातो.

मुगभाट — **मुंबई नं. ४**



तारेचा पत्ताः– योगायोग मुंबई १४ टे. नं. c/o २५४५८२

# इंडिया टेक्सटाईल ट्रस्ट

## जानकी निवास, ६९ ज्यो. फुले रोड, मुंबई १४

**गिरण्यांसाठी** —

**'डायमंड'** छाप स्टँपिंग पेस्ट, रोलर वॉर्निश, स्टेन्सील मार्किंग इंक, तसेंच कोहिनूर मील्सचे स्पिंडल टेप, लेदर पिकर्स, बफर्स, चेक स्ट्रॅप्स्, पिकिंग बॅन्ड्स्, वायर हील्ड्स्, वगैरे सामान.

**लिथो प्रेसीससाठी**—

कर्सी फ्लॅनेल रबर व वुलन ब्लॅकेंट्स् झिंक शीट्स्, स्पंज, ब्लॅक जपान कापड, पॉलिशींग स्टोन्स्, ट्रॅन्सफर पेपर्स वगैरे.

# सुपर वॉच कंपनी

"स्पेशालिस्ट"

आमचे येथें सर्व तऱ्हेचीं **घड्याळें** दुरुस्त करून मिळतात

व मागणीप्रमाणें विकत मिळतात.

मालकः— **मो. ग. मुळये**

२२० खाडिलकर रोड, ( कांदेवाडी ) गिरगांव, **मुंबई नं. ४.**



# मराठी नाटकांचें माहेरघर

**आजच पत्र पाठवून यादी मागवा**

**निंबकर आणि मंडळी**

**माधवबाग, मुंबई ४.**



# दिनकर कृष्णाजी जोशी ॲन्ड सन्स

टिळक आळी, रत्नागिरी.

**सर्व प्रकारच्या मंगलौरी कौलांचे व्यापारी**

**ॲसबेसटॉस सीमेंट कंपनी**

**एसोसिएटेड सीमेंट कंपनी**

यांचे

रत्नागिरी जिल्ह्यांतील एकमेव विक्रेते

Bolinjkar
REGD. TRADE MARK

# स्टील बेल्ट लेसिंग

मजबूतपणा, कार्यक्षमता, टिकाऊपणा, बचत यासाठीं
आमच्या स्टील लेसिंग प्रसिद्ध आहेत.

रेल्वे व … या, व
देशभर … ांतून
स … .

REFBK-0010197

सर्वत्र प्रमुख दुकानांत मिळतात.

कारखानदार

## बोलिंजकर मेटल वर्क्स

प्रायव्हेट लि., मुंबई ७.

फोन : ६११९०२ ग्रॅम : HEDMETS

# हेदवकर मेटल प्रेसिंग वर्क्स

प्रोप्रायटर्स : संभू भाऊ हेदवकर आणि कंपनी

भवानीशंकर क्रॉस रोड, दादर, मुंबई २८.

हिंदुस्थानांतील जुने व अनुभवी मशिनरीचे कारखानदार

## मेटल प्रेसिंग अँड कटिंग मशिनरी

● ड्राईंग प्रेस नं. २॥ व १ ● पावर कटिंग प्रेस २२ व १६ टन कॅपसिटीचे ● डबल बॉडी प्रेस नं. २ व ६ ● हँडफ्लाय प्रेस नं. १ ते ७

**देशी भांडवल, देशी कारागीर**

सर्व तऱ्हेचे यंत्राचे सुटे भाग तज्ज्ञ कामगारांच्या देखरेखीनें कोणत्याहि कसोटीस पूर्ण उतरतील असे व परदेशीच्या तोडीचे तयार करून दिले जातात. नव्या भव्य कारखान्यांतील मोठ्या प्रमाणावरील उत्पन्नामुळें कमी खर्चांत व वेळेत जास्तींतजास्त उत्पादन होऊं लागलें. सर्व हिंदुस्थानभर खप, अनेक वर्षांचा अनुभव.

**ऑर्डरबरहुकूम कोणत्याहि धातूंची भांडीं तयार करून देण्यांत येतील.**

नांगर छाप

# प्रदीप स्लेट, पेन्सीलस् ॲण्ड चॉक वर्क्स

卐

- सर्व शाळा व कॉलेज वापरतात.
- लिहिण्यास चांगला.
- लिहितांना मोडत नाहीं.
- इतरांपेक्षां स्वस्त.
- तीन प्रकारांत मिळतो. ( कठीण, मध्यम, मऊ )
- पांढरे तसेच रंगीत.

卐

**साठेज प्रदीप स्लेट, पेन्सीलस् अँड चॉक वर्क्स**

२१ मुरलीधर निवास, मोरबाग रोड, नायगांव मुंबई १४.